# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक ११.१२.२०१८ रोजी (का.प.क्र.२३) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक ११ डिसेंबर २०१८ रोजी (का.क्र.प.२३) मा.महापौर, श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.४० वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,भाप्रसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १५. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १६. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १७. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १८. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १९. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| २०. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २१. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २२. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २३. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २४. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २५. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २६. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २७. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २८. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| ३०. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| ३१. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३२. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३३. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३४. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३५. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३६. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३७. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३८. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३९. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ४०. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४१. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४२. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४३. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४४. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४५. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४६. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४७. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४८. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ४९. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५०. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५१. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५२. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५३. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५४. | स.स. श्री.गादगे शितल विरभद्र |
| ५५. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५६. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५७. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५८. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५९. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ६०. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ६१. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६२. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६३. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६४. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६५. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६६. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |

| | |
|---|---|
| ६७. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६८. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६९. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७०. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ७१. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७२. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७३. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७४. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७५. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७६. | स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन |
| ७७. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७८. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७९. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ८०. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ८१. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ८२. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ८३. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८४. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८५. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८६. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८७. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८८. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८९. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ९०. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ९१. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९२. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९३. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९४. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९५. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.कैलास गायकवाड :माजी उपमहापौर श्री.प्रशांत देसरडा यांचे काका व राष्ट्रीय आयुर्वेदीक मेडीकल संस्थेचे सदस्य श्री.शांतीलाल देसरडा यांचे दु:खद निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

यास स.श्री.प्रमोद राठोड, श्री.गजानन बारवाल, श्रीमती मनीषा मुंढे, श्री.भाऊसाहेब जगताप, श्री.राजगौरव वानखेडे, श्रीमती शिल्पाराणी वाडकर यांनी यास अनुमोदन दिले.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: स.माजी सदस्य श्री.आगा खान यांच्या धर्मपत्नी श्रीमती शमा आगा खान यांचे निधन झाले. त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

(या वेळी सभागृहात स्व.शांतीलाल देसरडा व स्व.शमा आगा खॉन यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.प्रमोद राठोड :मागिल ८-१० दिवसात रस्त्याच्या कडेला भंगार स्थितीत असलेल्या गाड्या उचलण्याची जी मोहिम प्रशासनाने राबविली. एक चांगले काम प्रशासनाने केले. त्या बद्दल प्रशासनाचे व त्यांच्या टीमचे अभिनंदन करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :त्या टीमचे प्रमुख श्री.पानझडे होते. त्यांचे व त्या टिम मधील सर्वाचे अभिनंदन करावे. तसेच शासनाने मराठा समाजाला आरक्षण दिले. त्याबद्दल मा.मुख्यमंत्री महोदय तसेच सर्व मंत्री महोदय मंडळाचे अभिनंदन करावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :जो ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. शासनाने मराठा समाजाला आरक्षण दिले. त्यासाठी ५८ मोर्चे काढावे लागले, ४२ लोकांना बलिदान द्यावे लागले मराठा समाजाला आरक्षण देणेसाठी जे विधेयक मांडले त्यास सर्व पक्षाचे आमदार यांनी पाठींबा दिला. सर्वाचे अभिनंदन करावे.

(यास श्री.कैलास गायकवाड, श्री.गजानन बारवाल,श्री.प्रमोद राठोड,श्रीमती मनीषा मुंढे यांनी अनुमोदन दिले.)

श्री.राजेंद्र जंजाळ :मराठा समाजाला आरक्षण द्यावे म्हणून प्रथमतः आंदोलन या शहरातून सुरू झाले होते. त्यानंतर महाराष्ट्रात ५८ मोर्चे निघाले. मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली तेव्हा सुध्दा सरकारने आरक्षण दिले नाही. त्याचाच परिणाम म्हणून ४५ मराठा बांधवानी आत्महत्या केली. प्रथम काकासाहेब शिंदे यांने आत्महत्या केली. मराठा समाजाला आरक्षण दिले. त्याबद्दल सरकारचे अभिनंदन परंतु आरक्षण सहजा-सहजी दिले नाही. आरक्षण मिळविणेसाठी मराठा समाजाच्या १५ हजार तरूणांना स्वतः गुन्हे दाखल करून घ्यावे लागले. श्री.काकासाहेब शिंदे यांचे कुटूंबीयांना रु.१० लक्ष देण्याचे जाहीर केले. ती रक्कम अजुनही दिली नाही. ज्यांनी आत्महत्या केल्या त्यांना सुध्दा आर्थिक मदत देण्याचे कबूल केले. त्याचे कूटूंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी देण्याचे आश्वासन दिले. अद्याप कार्यवाही केली नाही. ज्यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. त्यांनी या सर्व गोष्टी मंजूर करून घ्याव्यात आणि ते मंजूर झाल्यानंतर शासनाचे अभिनंदन व्हायला पाहिजे. सर्व प्रश्न प्रलंबीत आहेत मा.कोर्टात या निर्णयाला आवाहन देणारी याचिका सुध्दा दाखल झाली आहे. शासन त्यांचे स्तरावर उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे. मनपाने जी मदत देण्याचे जाहीर केले होते ती तात्काळ द्यावी. तसेच मागिल १९ फेब्रुवारी २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याची उंची वाढविण्याचे उद्घाटन केले होते. त्या बाबतीत पुढील कार्यवाही काय झालेली आहे?

श्रीमती ज्योती मोरे :मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी ज्यांचे बलिदान गेले त्यांचे परिवारास आर्थीक मदत देण्याचे जाहीर केले होते. ती मदत द्यावी.

श्री भाऊसाहेब जगताप :मराठा आरक्षणासाठी बलिदान देणारे चार लोकांच्या कुटूंबीयांना आर्थीक मदत देण्याचे मंजूरी या सभागृहाने दिली. अद्याप आर्थीक मदत दिली नाही. तसेच

काल होऊ घातलेल्या काही राज्यात निवडणूकीत कॉग्रेस पक्षाने आघाडी घेतली त्याबद्दल मा.श्री.राहुल गांधी यांचे अभिनंदन करावे.

श्री.जमीर कादरी :शासनाने मराठा समाजाला आरक्षण दिले अभिनंदन आहे. परंतु मुस्लिम समाजासाठीही आरक्षण द्यावे. आरक्षण मिळणेसाठी मराठा समाजाला आंदोलने बलिदान द्यावे लागले.

मा.महापौर :रस्त्याच्या कडेला ज्या भंगार गाड्या होत्या. त्या उचलण्याची कार्यवाही केली. त्याबद्दल प्रशासनाचे व त्यांचे टीमचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.राजेंद्र जंजाळ :ज्यांनी ज्यांनी या आरक्षणासाठी पाठींबा दिला. त्यांचे अभिनंदन करावे.

मा.महापौर :आताच सुचना मांडल्यानुसार सर्व पक्षाचे प्रतिनिधी व मा.मुख्यमंत्री महोदय यांचे सर्व सहकारी मंत्री महोदय यांचे अभिनंदन करण्यात येते. ज्या ज्या लोकांनी मराठा आरक्षाणासाठी बलिदान केले त्यांचे कुटूंबीयांना आर्थीक मदत देण्याचे या महापालिकेने ठराव मंजूर केले. त्यांना आर्थीक मदत करावी. औरंगपूरा येथील शौचालय सुरू केले. त्याच प्रमाणे इतर ठिकाणीही स्वच्छतागृह सुरू करावे. ज्या ज्या पक्षाने विधानसभा निवडणुकीत आघाडी घेतली. त्या सर्व पक्षांच्या नेत्याचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.राजू शिंदे :छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची उंची वाढविणेबाबत जाहीर केले होते. एक वर्ष होत आहे अद्याप कार्यवाही झाली नाही.

उपअभियंता(श्री.काझी) :या पुतळयाची उंची वाढविण्याच्या संचिका प्राप्त करून घेतल्या. संचिका अपुर्ण होत्या. पुर्ण केल्या एकूण १.८४ कोटीचे अंदाजपत्रक आहे.

(या वेळी सभागृहात स.श्री.सय्यद मतीन प्रवेश करतात. वेळ १२.१० वाजता)

श्री.प्रमोद राठोड :श्री.सय्यद मतीन हे सभागृहात आलेले आहे त्यांना सभागृहाच्या बाहेर जाण्यास सांगावे.

श्री.राजगौरव वानखेडे :त्यांना बाहेर जाण्यास सांगावे. त्यांना येऊ देण्यास मनाई केलेली आहे.

श्री.विजय औताडे :स.सदस्य श्री.मतीन यांना सभागृहात प्रवेश देऊ नये. असा ठराव पारीत केला. सभागृहात गोंधळ न होता त्यांना बाहेर जाण्यास सांगावे.

श्री.प्रमोद राठोड :महत्वाचे विषय चालू आहेत ते पुन्हा अपशब्द बोलण्याच्या अगोदर त्यांना बाहेर जाण्यास सांगावे.

मा.महापौर :महापालिका कामकाज नियमावली प्रकरण १ कलम १ नुसार महानगरपालिकेचे कामकाज नियम करणे संबंधीच्या तरतुदी यास अधीन राहून भाग-ई नुसार अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यांनी कोणतीही व्यक्ती कामकाजात व्यत्यय आणील अशा व्यक्तीस कोणत्याही वेळी बाहेर काढण्याची व्यवस्था करता येईल. या अधिकाराचा वापर करून पीठासीन अधिकारी म्हणून मी श्री.सय्यद मतीन यांना आदेशीत करतो की, त्यांनी सभागृहाच्या बाहेर थांबवावे.

श्री.राजू शिंदे :छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयाची उंची वाढविणे बाबत काय झाले?

उपअभियंता-श्री काझी :रू.१.८४ कोटीचा पुर्ण अंदाजपत्रकाचा प्रस्ताव आहे. उपआयुक्त सिडकोची यास मान्यता पण घेतली. सभागृहाची मान्यता असेल तर लवकरच निविदा प्रोसेस करून कार्यवाही करण्यात येईल.

मा.महापौर :कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. निविदा प्रोसेससाठी हे सभाग्रह कार्योत्तर मान्यता देते.

श्री.राजू शिंदे :मागिल सभेत ३० तारीख अंतिम प्रशासनाने दिली होती. कार्यवाही का केली नाही? बजेट मध्ये तरतूद नाही म्हणून हे काम कुणी घेणार नाही? हे काम कोणत्या लेखाशिर्ष मधून करणार आहे? वार्डातील काही कामाचे पाच पाच वेळेस टेंडर झाले काम घेण्यास तयार नाही. हे काम कोणी घेतील का? एक तर तदतूद करावी किंवा शासनाकडून मदत घ्यावी किंवा डीपीडीसीतून निधी घ्यावा.

मा.महापौर :प्रशासकीय मान्यता अंतिम टप्प्यात आहे. दोन दिवसात निविदा प्रसिध्द करावी. मनपाच्या निधीतून तरतूद केली आहे. शासनाला सुध्दा पत्र दिले आहे. अनेक ठेकेदार निविदा घेतील निविदा प्रक्रिया होईल.

श्री.विकास जैन :जे रु.१.८४ कोटी लागणार आहे. ती रक्कम बाजूला ठेवण्यास सांगावे इतर कामासाठी खर्च होऊ नये. दोन दिवसात निविदा काढण्याचे आदेशीत करावे.

श्री.राजू शिंद :शासनाकडून रु.२ कोटीची मागणी करावी.

मा.महापौर :इतर काही प्रोजेक्टसाठी निधी मिळावा म्हणून पालकमंत्री महोदय तसेच मा.मुख्यमंत्री महोदय यांना पत्र दिले आहे. निविदा कालावधी ३० दिवसांचा आहे. तो कालावधी कमी करावा. विशेष बाब म्हणून कार्यवाही करावी. लेखा विभागाला पत्र देऊन निधी राखीव ठेवण्याचे सांगावे. आता गोवर रूबेला लसीकरणा बाबत आयुक्त माहिती देतील. त्यानंतर श्री.मुजीब सय्यद हे माहिती देणार आहे

मा.आयुक्त :गोवर रूबेला ही लसीकरण मोहिम शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात चालू आहे. काही शाळांच्या माध्यमातून ही लस दिली जात आहे. काही शाळेत याला रिफ्युजल येतो आहे. ४६ टक्के शाळांमध्ये पालक मुलांना या लसीकरणासाठी आणत नाही. त्यांचा काही गैरसमज झालेला असेल. सोशल मिडीयांच्या माध्यमातूनही काही लोकांचा गैरसमज या लसीकरणाच्या बाबतीत झाला. सर्व उर्दु माध्यमाच्या टिचरशी चर्चा केली. आता डॉ.मुजीब हे माहिती देतील ते वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनशी ते संबंधीत आहेत. ते सभागृहात ही लस का घ्यावी? व घेण्याचे फायदे काय? याची माहिती देतील. त्यानुसार सर्व सदस्यांनी त्यांचे वार्डातील शाळामधील मुलांना व जे नागरीक असतील त्यांनाही लसीकरण देणे बाबत प्रवृत्त करावे व महापालिकेला त्यानुसार सहकार्य होईल.

(या वेळी डॉ.श्री.मुजीब सय्यद, एम.बी.बी.एस.एम.डी. हे गोवर रूबेला लसीकरणासंदर्भात सभागृहात माहिती देतात.)

मा.महापौर :गोवर रूबेला लसीकरण संदर्भात सर्व सदस्यांनी जनजागृती करावी. डॉ.मुजीब सय्यद यांचे मार्गदर्शन घ्यावे. काही शाळेत शिक्षक आहे त्यांचीही मदत घेता येईल सर्व मुलांनी लस टोचून घेतली पाहिजे अशी कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल नाइकवाडी :वार्डात बॅटमिंटन हॉल मधील मीटर काढून नेले. तेथे लाईट नाही. एक वर्षापासून सांगतो कार्यवाही होत नाही.

श्री.अब्दुल मं.नाविद :या लसीकरणामूळे दोन मुलांचा मृत्यू झाला. हे सत्य आहे का? नियोजन कसे राहणार आहे? महापालिकेचे डॉक्टर यांनी सदस्यांना विश्वासात घेतले पाहिजे.

मा.महापौर :याचे चार महिन्यापासून नियोजन चालू आहे. यात कोणतीही मनुष्यहाणी होत नाही. यात लोकांचा गैरसमज झालेला असेल. त्यामूळे काही पालक मुलांना लस देत नाही.

श्री.जमीर कादरी :शहरातील सर्व शाळेची बैठक बोलवावी तेथे सर्वांना मार्गदर्शन करावे. या लस बाबत काही खाजगी डॉक्टरांनी गैरसमज पसरविला आहे. जे की, त्याचा व्यवसाय व्हावा. जास्तीत जास्त सर्व शाळेतील शिक्षक, पालक यांची बैठक बोलवून चर्चा सत्र ठेवून योग्य ती मोहिम राबवावी.

श्रीमती सिमा खरात :सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन मोहिम राबवावी. जो चार्ट दिला त्यात ११४६ विद्यार्थी त्यापैकी २१६ मुलांनी लस घेतली एका शाळेत २१९ पैकी १० मुलांनी लस घेतली ही लस बाहेर रु.७८० आहे. मुलांना लस दिली तर त्यांना मुलबाळ होणार नाही. असा गैरसमज पसरविलेला आहे. सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन ही मोहिम राबवावी.

श्रीमती सुरेखा सानप :उर्दु माध्यमाचे पालकांनी असा गैरसमज पसरविला की, ही लस दिली तर मुलींना मुले होणार नाही. परंतु लस दिल्यानंतर कसल्याही प्रकारचा त्रास होत नाही असे जनतेला आवाहन करावे.

श्रीमती मिना गायके :ज्ञान प्रकाश शाळेत लस दिल्यानंतर एका मुलास चक्कर आली असे होत असेल तर याची जबाबदारी कुणाची असेल?

श्री.जफर खान :प्रत्येक वार्डात स्पिकर रिक्षा लावून जणजागृती करावी. शिक्षकही स्वत: सांगत आहे की, ज्यांना लस घ्यायची त्यांनी लस घ्यावी. शिक्षकही माहिती देण्यास सक्षम नाही. सदस्यांना विश्वासात घेऊन ही मोहिम राबवावी.

श्री.अब्दुल म.नाविद :नागरीकांपर्यंत जाऊन सविस्तर माहिती द्यावी.

तज्ञ सल्लागार श्री.मुजीब सय्यद:२७ नोंव्हेबर पासून कॅम्पीशीयन सुरू होईल. त्याचे प्रिपरेशन सुरू झाले. जून पासून सर्व शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांना प्रशिक्षण दिले प्रत्येक शाळेत बैठक घेतली.

श्री.अजीम अहेमद :पालकांना सविस्तर माहिती दिली जावी. लस दिल्याने काहीही होत नाही. याचे मार्गदर्शन लोकांना करणे आवश्यक आहे.

श्रीमती ज्योती अभंग :मुलांना लस दिली पाहिजे. चकरा वगैरे काही येत नाही. जो नागरीकांमध्ये गैरसमज पसरला आहे तो दूर करावा.

मा.महापौर :पालकांना विश्वासात घेऊन लस देणेची कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :काल उर्दु शिक्षकांबरोबर एक बैठक घेतली. जबाबदारीचा हा विषय आहे ती घेण्यास तयार आहोत. स.सदस्य यांनी या मोहिमेसाठी मदत करावी. डॉ.मुजीब यांचा फोन सर्वांना मिळेल. लस देणार नाही तर काहीचा मृत्यू होतो आहे. लस देऊन मुलांचा जीव वाचवावा.

श्री.त्र्यंबक तुपे :जवाहर कॉलनी व इतर भागात ५३-१ अंतर्गत काही नागरीकांना ज्यांचे बांधकाम १+१, १+२ असेल अशांना नोटीसा देऊन आपले बांधकाम अनधिकृत आहे व १५ दिवसाच्या आत उत्तर दिले नाही. तर कार्यवाही का करण्यात येऊ नये? अशा नोटीशी दिल्या. ज्याचे गुंठेवारी झाले त्यांनाही नोटीसा दिल्या. अतिक्रमण विभागाने नोटीस दिली.ज्या नागरीकांनी ८-१० वर्षापुर्वी गुंठेवारी

करणेसाठी पहिला जो हफ्ता भरणा त्यांनाही नोटीस दिल्या त्या कोणत्या बेसवर व कोणत्या नागरीकांना दिल्या.

सहा.संचालक-न.र :दिनांक ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत अनधिकृत बांधकाम आहे. त्यांना प्रशमित संरचना म्हणून ते नियमित करण्याचा एक जीआर शासनाचा आलेला आहे. यासाठी पेपरला जाहीरात दिली. विशेषतः कमर्शियल जे बांधकाम केले आहे त्यांनी नियमितीकरणासाठी पुढे यावे म्हणून नोटीस दिल्या.

श्री.त्र्यंबक तुपे :श्रीमती सुलोचना कमलानी, उत्तमनगरचे नागरीक त्यांचे मुख्य रस्त्यावर शॉप आहे. सन-२०११ मध्ये गुंठेवारीसाठी संचिका दाखल केली. त्यांनी रु.१८२९२/- चा पहिला हफ्ता भरला आहे. ते पैसे मनपा वापरते. त्यांनी पाठपुरावा करून सुध्दा त्यांची गुंठेवारी केली नाही. जर गुंठेवारी करून देत नसेल व दुसरीकडे ते अतिक्रमण आहे. असे म्हणणे योग्य आहे का?

सहा.संचालक-(न.र) :ज्यांनी पहिला हफ्ता भरला. त्यांची संचिका दाखल आहे. असे उत्तर त्यांनी दिले तर अशा सर्व संचिका मागवून घेतल्या जातील व ते नियमित होत असेल तर कार्यवाही केली जाईल.

श्री.त्र्यंबक तुपे :ज्यांनी गुंठेवारीच्या संचिका दाखल केल्या. त्याचे रेकॉर्ड मनपाकडे असेल. निर्णय न घेता अनधिकृत बांधकाम आहे म्हणून नोटीस दिल्या जाते. हे योग्य नाही. दुसरे चलन दिले जात नाही. अशा किती संचिका आहे? नवीन नियमानुसार गुंठेवारी करणे अशक्य आहे. परंतु जुन्या संचिकेवर निर्णय का घेत नाही? त्या विभागाकडे लक्ष दिले जात नाही. नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण केले.

मा.महापौर :सर्व गुंठेवारीच्या संचिका एकत्रित करून घ्याव्यात. प्रशमित शुल्क बाबत या सभेने निर्णय घेतला. त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :त्या विभागात कर्मचारी नाही. ५० टक्के भाग गुंठेवारीत येतो. ज्यांच्या संचिका दाखल आहे ते लोक चकरा मारतात. नविन नियम आले. त्यानुसार गुंठेवारी होत नाही. अशी उत्तरे दिली जाते. ज्या जुन्या संचिका दाखल आहेत त्यावर निर्णय घ्यावा लागेल. ५३-१ नुसार नोटीस दिल्या. त्याचा अर्थ काय होतो? सन- २०११मध्ये नागरीकांनी पहिला हफ्ता भरला. तरीही लिगल करून देत नाही.

सहा.संचालक-(न.र) :त्याचा अर्थ असा की, दिलेल्या मुदतीत नियमितीकरणाचा प्रस्ताव दाखल करावा. नियमानुसार नियमितीकरण होत असेल तर केले जाईल.

मा.महापौर :जुन्या संचिका आहे. त्यांना प्रशमित संरचना नुसार काय सवलत देता येईल? ते पहावे.

श्री.त्र्यंबक तुपे :जुन्या संचिकेवर निर्णय घ्यावा लागेल. संचिका दाखल आहेत. अनेक वेळा कॅम्प लावले होते. यातून पैसा मिळणार आहे तेथे आजही सुविधा देतो.

मा.महापौर :ज्या जुन्या संचिका आहे प्रलंबीत आहे. त्यांना क्लिअर करू शकतो का? ते काम अगोदर करावे.

श्री.राजू शिंदे :ज्यांनी संचिका दाखल केल्या. त्यांना नोटीशी दिल्या जाते. ज्यांनी दाखल केल्या नाही. त्यांचे सर्रास बांधकाम चालू आहे. त्यांच्या बाबतीत काय कार्यवाही होणार आहे? कॅम्प लावले. काहींनी पहिला हफ्ता भरला त्यांना नोटीस दिल्या

जातात हे योग्य नाही. जेथे इल्लिगल बांधकाम होते तेथे कर्मचारी जात नाही. गुंठेवारीत ही सर्व सुविधा दिल्या जात आहे. गुंठेवारीचा हफ्ता भरून सुध्दा त्यांना पत्र गेले. विभागातून पत्र जातांना रेकॉर्ड बघत नाही का? नोटीस देणे योग्य नाही.

श्री.नासेर सिद्दीकी :ज्या संचिका दाखल आहेत त्यांचे रेकॉर्ड मागवावेत. ज्यांचेकडे दुसरा हफ्ता बाकी आहे त्यांना नोटीस देऊन रेग्यूलर करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :नवीन नियम येण्या अगोदर संचिका दाखल आहे. त्यावर निर्णय का होत नाही? उत्पन्न मिळणारा विषय आहे. तेथे सुविधा देतो आहे. किती संचिका प्रलंबीत आहेत? त्या विभागात कर्मचारी द्यावे अनेक नागरीक चकरा मारतात. अर्धे शहर गुंठेवारीत आहेत. नोटीस देणे योग्य नाही. सर्व संचिका मंजूर कराव्यात. जास्तीत जास्त टॅक्स लावतो तेही उत्पन्न मिळणार आहे. ज्या संचिकेचा रेकॉर्ड आहे. त्या गुंठेवारीत करावे. जे नवीन प्रकरणे येतील तेही नियमित करावे.

श्री.सिताराम सुरे :सन-२००६ मध्ये गुंठेवारीचा सर्व्हे करण्यासाठी तीन एजन्सीला काम दिले होते. प्रभाग-ब मध्ये क्र.२ वार्ड होता. त्यामध्ये आता तीन वार्ड झाले. त्या वेळेच्या संचिका आता झोन क्र.५ मध्ये जमा आहे. तेथे मनुष्यबळ नसल्यामूळे तेथे काही लोकांनी पहिला हफ्ता भरला. परंतु कर्मचारी संख्या कमी असल्यामूळे काही नागरीकांना चलन दिले नाही. कर्मचारी कमी आहे. आऊट सोर्सींगचे लोक काय काम करतात? माहिती नाही. तेथे महिला कर्मचारी आहेत. नागरीकांना उडवा-उडवीची उत्तरे देतात. ३१ मार्च २०१८ पर्यंत जेवढ्या संचिका जमा आहेत. त्या निकाली काढाव्यात व त्यानंतरच्या संचिका ह्या नवीन प्रशमित शुल्कानुसार निकाली काढाव्यात. अनेक नागरीक पैसे भरण्यास येतात. चकरा मारतात. परंतु तेथे कर्मचारी काम करीत नाही. काही धोरणामूळे कार्यवाही होत नाही.

श्री.सुभाष शेजवळ :एजन्सी नेमल्या त्या महापालिकेच्या हितासाठी काम करीत नाही. वार्डात २५ टक्के लोकांनी गुंठेवारी भरली आहे. काहीना ही जागा रस्त्यात येते असे सांगून पैसे भरून घेतले जात नाही व नवीन नियमावलीनुसार दाखल करावे ज्याचे नियमितीकरण करायचे त्या जागेची सरकारी मोजणी पाहिजे असे सांगतात. जर गट क्रमांक मध्ये १० एकरचा ले-आऊट असेल त्यात क्र.४ चा प्लॉट असेल तर तो मोजणी नुसार येतच नाही. नियमित करता येतो की नाही? अशा प्रकरणात कोणती संचिका मंजूर केली. एजन्सी पैसे घेऊन काम करीत आहे. सन-२०१५ पर्यंच्या संचिका नियमित करणार आहेत का? एक ही संचिका निकाली काढत नाही. फक्त एनए-४४ प्लॉट असेल तर नियमितीकरण होते नियमावलीतील एक नियम आहे तो शिथील करावा. जेणे करून सर्व मिळकती नियमित होतील व मनपासही उत्पन्न मिळेल. एजन्सी पैसे कशासाठी घेते? टॅक्स मध्ये जी सुट दिली. त्यामूळे रु.१० कोटी उपलब्ध झाले. मा.महापौरांचे अभिनंदन करतो. आणखी मोहिम राबविणे बाबत मुदत वाढवावी.

श्री.प्रमोद राठोड :नवीन भागात जाऊन मालमत्ताचे टॅक्स ॲसेसमेंन्टसाठी सर्वेक्षण करण्याची मोहिम राबविली जाते. माझे वार्डात गुंठेवारीमध्ये अनेक घरे त्यात १०X२०,२०X३० ची आहे. सर्वेक्षण केल्यानंतर काही बीले देण्यात आली. त्यात

रू.२२००/-, रु.१७००/- टॅक्स लागलेला आहे व मागिल ८-१० वर्षाचा टॅक्स लागणार आहे. असे म्हटले. याचा अर्थ ज्याचे २०X३० चे घर आहे त्यास रु.१ लक्ष पर्यत टॅक्स भरण्याचे सांगितले. जर टॅक्स भरून घ्यायचा असेल तर या लोकांना येथून पुढे टॅक्स भरून घ्यावा लागेल. नसता मागिल रु.१ लक्ष व यापुढेही टॅक्स घेणार. असे होत असेल तर कुणीही कर भरणार नाही. येथून पुढील टॅक्स घ्यावा. मागिल टॅक्स बाबत पॉलीसी डिसीजन घ्यावे. धोरण ठरवावे. जे की, ते त्या ठिकाणी किती वर्षापासून राहतात, काही पुरावा आहेत का ते बघावे. हे लोक आधी पासून गुंठेवारी करण्यास तयार होते ती केली नाही. आता त्यांना सांगण्यात येते की सन-२०१२ पासून भरावे. हे योग्य नाही. जो नवीन टॅक्स लागतो आहे. तो तेव्हा पासून पुढचा असावा.

श्री.त्र्यंबक तुपे :काही घरांना टॅक्स लागलेला आहे. काहीना कमी असेल तो चालू नियमानुसार घेतला तरी चालेल.

मा.महापौर :यात धोरण ठरवावे लागेल. ज्यांना रेग्युलर करायचे त्यांना दुप्पट कर लावतो. तो कर कमी करून रेग्युलर करावे लागेल.

श्री.त्र्यंबक तुपे :काहीना डबल टॅक्स लावण्यात आला. आता पुन्हा तेथे सर्व्हे करीत आहे. १०००  असेल तर २००० रेग्युलर करणेसाठी घेतो आहे. गुंठेवारी रेग्युलर झाल्यानंतर जे जास्तीचे दंड म्हणून घेतले ते परत करू असे सांगण्यात आले होते. नवीन मोजणी होऊन पुन्हा टॅक्स वाढवून येतो आहे. जो दंड आकारला तो कमी होत नाही. काटेकोरपणे पालन करावे. नवीन टॅक्स लावतांना मागिल दंड कमी झाला पाहिजे. नसता लोक पैसे भरणार नाही. नवीन वर्षापासून नवीन पध्दतीने टॅक्स घ्यावा. जे लोक समोर येत नाही. त्याचे प्रकरण कर्मचारी त्यांचे पध्दतीने सोडवून घेतात. ज्यांना सवलत दिली. त्याचे रेकॉर्डला पुन्हा तो टॅक्स येणार नाही. याची दखल घ्यावी.

श्री.राजू शिंदे :मोहिम राबविली ७५ टक्के व्याज माफी केली. आता डिमांड नोटीस जातांना ते मायनस होऊन डिमांड जावी. नागरीकांची फसवणूक होऊ नये. कोणत्या नियमाच्या आधारे ही सुट दिली? ती सुट देण्यास प्रशासनाची मान्यता आहे का?

श्री.त्र्यंबक तुपे :जी सुट दिली त्याचे रेकॉर्डवर यायला पाहिजे नुसते पावतीवर नको.

श्रीमती सुरेखा सानप :एनए-४४ एरीया नो-नेटवर्क झोनमध्ये येतो का? वार्डात एनए-४४ भाग आहे तेथे जाणूनबुजून नो-नेटवर्क झोन असल्याचे नमूद केले.

श्रीमती आशा निकाळजे :वार्डात ५० फुटी रोडवर अतिक्रमण झाले काढले नाही.

मा.महापौर :जी सुट दिली. ती नियमानुसार होती. असा स.सदस्य श्री.शिंदे याचा प्रश्न आहे. मी घोषणा केली लोकांनी भरले पुन्हा वसूल करणार असे होऊ नये. या बाबत खुलासा करावा.

श्री.त्र्यंबक तुपे :नंतर रेकॉर्डवर कमी होणार नाही. अशी नागरीकांची भावना झाली आहे. तोही खूलासा करावा.

मा.महापौर :गुंठेवारी रेग्युलर झाल्यानंतर जो डबल दंड म्हणून टॅक्स वसुल केला तो कमी व्हायला पाहिजे. मागणी पत्र देताना जो इल्लिगल आहे म्हणून ॲड केलेला होता. तो कमी करून दिला जावा. याचा विचार करावा. घर तेथे कर लागला

पाहिजे. कर हा येथून पुढे लागला पाहिजे. मागील टॅक्स लावला तर कुणीही समोर येणार नाही.

कर निर्धा.व संकलक :एप्रिल ते जून पर्यत कराची शास्ती व दंड यामध्ये ७५ टक्के सुट दिली होती. आताही १२ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर हा सप्ताह पाळला होता. त्यामध्येही अशी सुट दिली आहे. यासाठी मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. ज्या बातम्या आल्या होत्या त्या चुकीच्या होत्या.

श्री.राजू शिंदे :जी डिमांड देणार आहे ती मायनस म्हणूनच देणार आहे का?

कर निर्धा.व संकलक :होय, सन-२०१९ पर्यंत सर्व कर भरणार आहे. त्यांचेसाठी ही सुट लागू होती. त्यांना बेबाकी दिलेले आहे.

श्री.राजू शिंदे :एजन्सी नेमल्या आहेत का? रु.५,७ हजार घेऊन टॅक्स लावून देत आहे. हे खरे आहेत का? माहिती घ्यावी. तसे होत असेल तर कार्यवाही करावी. एजन्सी नेमली नसेल ते तपासावे माहिती घ्यावी. एजन्सी नेमली नसेल तर तशी नागरीकांसाठी माहिती द्यावी.

कर निर्धा.व संकलक :सर्वेक्षणसाठी कोणतीही संस्था नेमली नाही. महापालिकेच्या माध्यमातून सर्वेक्षण करतो आहोत. ज्या मालमत्तेला टॅक्स लागलेला नाही. त्याचे ॲसेसमेन्ट करून घेतो आहे. पैसे घेऊन कुणी टॅक्स लावत असेल तर तशी तक्रार आली तर कार्यवाही केली जाईल.

श्री.राजू शिंदे :कोणतीही संस्था अधिकृत केली नाही. असे नागरीकांसाठी पेपरला देऊन कळविण्यात यावे.

मा.महापौर :गुंठेवारी नाही म्हणून जो दंड लावला आहे. तो रेग्यूलर गुंठेवारी झाल्यानंतर मायनस व्हायला पाहिजे. तसेच येथून पुढे टॅक्स लावता येईल का धोरण ठरविले पाहिजे. जे निर्णय झाले त्याची अंमलबजावणी करावी. प्रलंबीत ज्या संचिका आहे जे की, पहिले चलन दिले दुसरे देणे बाकी आहे. त्या संचिका निकाली काढाव्यात. स.सदस्य श्री.सुरे यांनी म्हटल्या प्रमाणे ती सुचना विचारात घ्यावी. स.सदस्य श्री.शेजवळ यांनी म्हटल्याप्रमाणे मोजणीचा विषय असेल मालकी हक्काचे कागदपत्र असेल तर त्यासाठी ही सवलत आहे. त्या सर्वाचा विचारात घेऊन कार्यवाही करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :जुनी योजनेनुसार गुंठेवारीची कार्यवाही चालू आहे की बंद आहे? ज्यांची संचिका पुर्ण आहे. त्यांनी पैसा भरला आहे. त्यांना प्रमाणपत्र दिले जात नाही. कर्मचारी वाढीव द्यावे.

सहा.संचालक-(न.र) :जुन्या ज्या संचिका नगर रचना विभागाकडून निकाली काढल्या आहे. आठ दिवसात उर्वरीत संचिका वार्ड अधिकारी यांचेकडून मागवून घेतो.

मा.महापौर :एक विशिष्ट कक्ष यासाठी ओपन आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. १ जानेवारी पासून नियोजन करू. ज्या प्रलंबीत संचिका आहे. त्यासाठी १५ दिवसाचा वेळ देण्यात येतो. प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :यात प्रशासनाचे काय मत आहे. गुंठेवारी रेग्यूलर केले नाही. तरी लोक बांधणारच आहे अशी घरे आपण तोडणार काय? हजारो संचिका प्रलंबीत आहे नागरीकांनी ८-१० वर्षापासून पैसे भरलेले आहे. नेमके काय करणार प्रशासनाचे काय म्हणणे आहे. नागरीकांची यात चूक नाही. संचिका तयार आहे. परंतु

प्रमाणपत्र देण्यास तयार नाही. रेग्युलाईज करावे. ज्या ठिकाणी डीपी रोडचे मार्कीग करावे. बाजूचे घरे असतील ते गुंठेवारीमध्ये करावे. असे ठरले होते तरी कार्यवाही होत नाही. पहिले चलन भरलेले आहे पावत्या दिल्या. पुन्हा अनधिकृत आहे असे म्हणून पाडण्यास निघालो. हे बरोबर नाही. सादर झालेल्या एकूण संचिका किती आहे. सन-२०११ ला पैसे भरल्याची पावती आता दिली जाते. दुसरा हफ्ता दिला नाही.

श्री.राजू शिंदे :धोरण ठरवून योग्य निर्णय घ्यावा लागेल. संचिका सादर केल्या. आता सांगता की अनधिकृत आहे? गुंठेवारी रेग्युलाईज करणेसाठी उशीर झाला. तसे शासनास कळवावे. योग्य धोरण ठरवून निर्णय घ्यावा.

श्री.राजू शिंदे :कॅम्प लावले फक्त संचिका जमा करून घेतल्या त्याची छाननी केली नाही. जमा करून तशाच पडलेल्या आहे.

श्री.विकास जैन :संचिका सादर करून घेतल्यानंतर थांबविण्याचे कारण काय?

श्री.मनोज बल्लाळ :काहींनी पहिले चलन भरले तेव्हा एक मजला होता, आता दुसरे चलन देत नाही. तरी लोकांनी तीन तीन मजले बांधले.

श्री.खान जहागीर :माझे वार्डात कमर्शियल भाग असूनही एकही संचिका केली नाही. तेथे सर्व सुविधा दिल्या जातात. रेग्युलाईज करण्यास हरकत नाही. मनपास उत्पन्न येईल.

श्री.राजू शिंदे :काही लोक स्वत:हून टॅक्स भरणेस तयार आहे. टॅक्स लावावा जे भरीत नाही त्यांचे मागे लागतो.

श्रीमती मनीषा मुंढे :चार वर्षात नाल्याचे काम होत नाही. लोकांना मोठा त्रास होत आहे. नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. काम होत नाही. १० लोकांना घाणीमूळे डेग्यू झाला. तेथे एक बळी गेला. पत्र देऊनही कार्यवाही होत नाही.

या वेळी स.सदस्य डायस समोर खाली बसतात.

श्रीमती मिना गायके :माझे वार्डातील अतिक्रमण काढले जात नाही. अनेक अपघात त्या रस्त्यावर होत आहे.

अतिक्रमण अधिकारी :पाहणी करून घेतली जाईल. कार्यवाही होईल.

श्रीमती सुरेखा सानप :राजेंद्रनगर भागात मोठे. प्लॉटींग केले ते काढले जात नाही.

मा.महापौर :स.श्रीमती गायके, श्रीमती सानप यांचे वार्डात असलेले अतिक्रमण बाबत श्री.देशमुख, श्री.डीपी कुलकर्णी, श्री.पाठक, श्री.काथार यांनी उद्या सकाळी १०.०० वा.जाऊन योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.विकास जैन :अतिक्रमण विभागात सक्षम अधिकारी द्यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :अतिक्रमण, नाल्यातील अतिक्रमणाचा विषय असेल प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्तांनी ते काम पाहिले पाहिजे. आयुक्तांनी सर्व कामे सांभाळली पाहिजे. मनपाच्या जागेवरही अतिक्रमण होते. याकडे दुर्लक्ष होते. आऊट सोर्सीगचे कर्मचारी कडेही काम सोपवावे.

श्रीमती मनीषा लोखंडे :वार्ड १६ मध्ये मुख्य रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे. त्यामूळे रस्त्याची कामे थांबली आहे.

श्री.राजू शिंदे :शहरातील अतिक्रमणे काढणेसाठी प्रशासनाने टीम तयार करावी कार्यवाही करावी.

श्रीमती सिमा चक्रनारायण:अतिक्रमण नाल्यावरील काढले जात नाही. पावसळ्यात काढत नाही. आता काढण्यास काय अडचण आहे?

श्री.नितीन साळवी :माझे वार्डातही नाल्यावरील अतिक्रमण काढले जात नाही. भुमिगत गटार योजनेचे काम थांबलेले आहे.

श्री.गोकुळ मलके :मनपाच्या शाळेची भिंत तोडून तेथे रेती व डब्बर विक्रीचा व्यवसाय चालू आहे. कार्यवाही होत नाही.

मा.महापौर :स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्यानुसार श्री.डी.पी.कुलकर्णी तसेच श्री.पाठक यांनी कार्यवाही करावी. अतिक्रमण विभागासाठी विभाग प्रमुख म्हणून उपआयुक्त दर्जाचे अधिकारी नेमावेत.

मा.आयुक्त :गुंठेवारीचे प्रकरण प्रलंबीत आहे. आढावा घेऊन लवकर कार्यवाही करण्यात येईल. टीपी व अतिक्रमण विभागाचे सुसुत्रीकरण करणेसाठी कार्यवाही केली जाईल. पुर्वी एक अधिकारी श्री.अभंग होते त्यांचेकडे एक पदनिर्देशीत अधिकारी असे अतिक्रमणात होते. दोन्ही विभागाचा पत्रव्यवहार होत होता. शहरात ३०-४० टक्के इमारती अनधिकृत आहे. त्यांना अनेक वर्षापासून कार्यवाही न करणे यात नागरीकांचीही जबबादारी आहे. ते विभाग आता मर्ज केले आहे. तीन अधिकारी ३-३ झोनसाठी नेमले आहे. त्यात आऊट सोर्सींगचे लोक असणार नाही. नऊ झोन मध्ये किमान एक जेई व आणि इमारत निरीक्षक यांचेवर त्या झोनची पुर्ण जबाबदारी असेल. तशी ऑर्डर काढलेली आहे. जे अनधिकृत स्ट्रक्चर झाले. ज्याची मनपाकडे नोंदच नाही ते सुध्दा तपासणी होणे आवश्यक आहे. यासाठी इ.निरीक्षक व जेई यांना संयुक्त रित्या जबाबदारी देण्यात आलेली आहे. ते अनधिकृत स्ट्रक्चरची यादी करतील त्याच नियमित आढावा घेतला जाईल. ३०५९ इमारती अनधिकृत सापडल्या आहेत. काहीना नोटीस दिल्या चांगले काम व्हावे म्हणून इमारत बांधकाम परवानगी मॅनेजमेंन्ट सिस्टम ऑनलाईन केली आहे. अनेक वेळा असे होते की, अर्ज स्विकारतो परंतु कागदपत्र सोबत नसतात. ती प्रकरणे प्रलंबीत असतात. ऑनलाईन मध्ये सर्व कागदपत्र असेल तरच तो अर्ज ॲग्री होतो. अशी ६७ प्रकरणे दाखल झाली आहे. जुने प्रकरण जे इमारत परवानगी, प्रमाणपत्र देणे व लेआऊट आहे त्याचा आढावा घेतो आहे. लवकर प्रकरणे निकाली निघतील. गुंठेवारी प्रकरणाचा आढावा घेऊ त्यासाठी ज्या सुचना आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करणेसाठी स्वतंत्र सेल उघडण्यात येईल. कॅम्प घेऊन निकाली काढले जाईल. जुन्या संचिका आहे त्या मान्य किंवा अमान्य करणे बाबत निर्णय होईल. टी पी विभागाने गुंठेवारीच्या अशा संचिका निकाली काढाव्यात. उत्पन्नासाठी ह्या सर्व प्रकरणाची कार्यवाही सुरू केली आहे. मागिल वर्षी रु.६० कोटी उत्पन्न होते आता रु.३४ कोटी उत्पन्न आहे. प्रशमित शुल्काच्या मार्गाने जास्तीत जास्त उत्पन्न वाढवावे असे प्रशासनाचे मत आहे.

मा.महापौर :आता सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ दु.२.१५ वा.पुन्हा ३.१० वाजता सभेला सुरूवात)

श्रीमती सरिता बोर्डे :विषय क्रमाक ७४६,७६० मंजूर करण्यात यावेत.

मा.महापौर :ठिक आहे मंजूरी देण्यात येते.

श्रीमती सरवत बेगम :आमच्या वार्डात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली आहे नियोजन काय होत आहे?

मा.महापौर :अनेक व्यक्तीना कुत्र्याने चावा घेतला त्या बुढ्ढीलेन येथील एका मुलास कुत्र्याने चावा घेतला.त्यांना मारता येत नाही निर्मितीकरण यासाठी ॲक्शन प्लॅन काय केला आहे.

पशुधन अधिकारी (श्री.कोल्हे):कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्मितीकरण करणे यासाठी पुर्वी आठवडयामध्ये १०-१५ किंवा दररोज २-४ शस्त्रक्रिया करण्यात येत असे. परंतु नजीकच्या काळात दर दिवशी १५-२० तर कधी २८ शस्त्रक्रिया होत आहे. मागिल वर्षी १४९२ शस्त्रकिया झाल्या. दि.१-१२-२०१८ पासून २५१ शस्त्रक्रिया केल्या. यामध्ये ब्ल्यू क्रॉस एजन्सीला दररोज ३०-४० शस्त्रक्रिया केल्या पाहिजे असे टारगेट दिले. आणखी दोन गाड्या खरेदी केल्या आहे. त्याची बॉडी बिल्डींग तयार झाली. पासींग झाल्यानंतर रात्री सुध्दा कुत्रे पकडण्याची कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :पिसाळलेल्या कुत्र्यांबाबत काय कार्यवाही होते? कमेटी काय काम करीत आहे? पिसाळलेल्या कुत्र्यांना मारले पाहिजे.

पशुधन अधिकारी :पिसाळलेले व न पिसाळलेले कुत्रे ओळखणे अवघड आहे. मोकाट कुत्रे पकडणे हे मनपाचे काम आहे. या बाबत लवकरच कमेटीची बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल.

श्री.राजू शिंदे :संबंधीत अधिकारी यांना आपल्या कॅबीन मध्ये बोलवून चर्चा करावी. कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्याचे नियोजन करावे. एकाच ठिकाणचे कुत्रे पकडून इतर भागात नेऊन पकडल्या सारखे दाखवितात हे योग्य नाही. चिकलठाणा भागात कचरा प्लॅन सुरू केला. तेथे मोठी संख्या आहे

श्रीमती किर्ती शिंदे :मोकाट कुत्र्यामूळे लहान मुले शाळेत जाण्यास घाबरतात. मनपा मुख्यालया समोर कुत्रे आहे पकडले जात नाही. मानवजात की कुत्रा जात महत्वाची या नियमात बदल करणे आवश्यक आहे. जो खर्च करतो तो वाया जातो आहे.

मा.महापौर :संपूर्ण देशास हीच अडचण आहे. मा.न्यायालयात मॅटर आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :मा.न्यायालयास विनंती करून नियमामध्ये बदल करण्याचे सुचवावे.

पशुधन अधिकारी :दोन गाड्या नव्याने घेत आहोत. त्याची पासींग घेत आहोत.

श्री.गंगाधर ढगे :शहरात कुत्र्यांची संख्या वाढली आहे. माझे वार्डात १० वर्षाच्या पिंजारी नामक मुलाचा कुत्र्याने चावा घेतल्याने मृत्यू झाला. किती कुत्रे एका दिवसात पकडतात? व शस्त्रक्रिया किती कुत्र्यांवर होते? ती संस्था चांगले काम करीत नाही. त्यांचेवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.

मा.महापौर :त्या ठिकाणी मी स्वत: आलो होतो. त्या बालकाच्या कुटूंबीयांना आर्थीक मदत दिली जाईल. ब्ल्यू क्रॉस या संस्थेला नियोजन करण्याची ताकीद द्यावी. चांगले काम करण्याचे आदेशीत करण्यात येते.

श्री.राजू शिंदे :जी मदत दिली जाणार ती संस्थेकडून घ्यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:रात्रीच्या वेळी रस्त्यावरील कुत्रे पकडण्यात यावे.

पशुधन अधिकारी :दोन वाढीव गाड्या येत आहे. ते आल्यानंतर झोन वाईज कोणत्या दिवशी गाडी कुठे जाईल? याचे नियोजन करून कार्यवाही करणार आहोत.

श्री.राजगौरव वानखेडे :प्राणी संग्रहालयाची मान्यता रद्द करण्याच्या बातम्या आलेल्या होत्या. तेथे काही अत्याधुनिक सुधारणा करण्याच्या सुचना प्राधिकरणाने दिल्या होत्या. त्या सुधारणा केल्या नाहीत म्हणून आता तेथील कामाचे काय नियोजन केले आहे?

मा.महापौर :काही त्रुट्या होत्या. त्या बाबत सन-२०१५ मध्ये महापालिकेला संबंधीत प्राधिकरणाचे संचालक यांनी नोटीस दिली होती. त्याचा आधार घेऊन २८ नोव्हेंबर २०१८ रोजी म्हणजेच मधल्या तीन वर्षात काय सुधारणा केली? त्याचा अहवाल त्यांना पाठवला. तो त्यांनी समावेश केला नाही. १२ झु ची परवानगी रद्द केली व ३० दिवसाची अपील करणेसाठी मुदत दिली. उद्या त्यासाठी स.पाच पदाधिकारी व दोन संबंधीत अधिकारी आम्ही दिल्लीला जात आहोत. त्यास स्थगिती आणली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :रु.१८.५० कोटीचे नियमबाहय बील अदा करण्यात आले. त्याबद्दल मागील बैठकीत चर्चा केली. चौकशी समिती नेमली होती. पुढे काय कार्यवाही केली?

श्री.राजू शिंदे :या बीलाची चौकशी करावी. परंतु मागिल जे श्री.थोरात श्री.दुर्राणी पाटणी लेखाधिकारी होते त्या वेळी ही रु.४० कोटी वाटप केले होते ते अगोदरचे झालेले कांड आहे. ती चौकशी करावी. ते कशातून वाटप केले? ज्येष्ठता यादी काय होती? माहिती मी मागीतली ती दिली नाही व त्यानंतर रु.१८-५० कोटीची चौकशी व्हावी.

श्री.प्रमोद राठोड :मागील बैठकीत मुख्यलेखाधिकारी यांना प्रश्न केला होता की, ज्येष्ठता यादी कशी आहे? व काय आहे? त्याचे सीसी केव्हा आले होते? असा फॉर्मेट मा.आयुक्ताकडे दिला होता. त्यावेळी श्री.केंद्रे यांनी असे सांगण्यात आले की, वेब-साईटवर बघून घ्यावे. परंतु आजपर्यत तसे वेब-साईटवर काहीही दिसत नाही. त्या फॉर्मेटमध्ये यादी प्रसिध्द करणार होते का दिली नाही? यात संस्थेचे प्रमुख म्हणुन आयुक्तांनी खुलासा करावा. काही पक्षाच्या सदस्यांच्या वार्डातील जाणूनबूजून पेमेंन्ट थांबविलेले आहे. ती माहिती लपविली जाते. चौकशी समितीला महिती दिली जात नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :सभेत निर्णय होतो तर अंमलबजावणी का होत नाही.

श्री.राजू शिंदे :११५ वार्डाची यादी तयार केली असेल. हा विषय प्रशासनाचा आहे. सदस्यांचे काम हे आहे की, वार्डात कामे करून घ्यायची.

मा.महापौर :या सभेला पण काही अधिकार आहे. सर्वसाधारण सभा आदेशीत करेल त्यानुसार प्रशासन काम करेल.

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.प्रमोद राठोड :या सभेत चर्चा झाली. आयुक्तांनी बैठका घेतल्या. जे रु.१८.५० कोटीचे बील काढले. कोणत्या हेड मधून बील दिले? समितीने काय अहवाल दिला? दिलेल्या चार्ट नुसार बील कसे दिले? ते वेबसाईटवर देणार होते दिले नाही. काही अधिकारी चुकीची माहिती देऊन सदस्यामध्ये भांडण लावत आहे. आयुक्तांनी लक्ष दिले पाहिजे चुकीचे पेमेंन्ट दिले असेल तर कार्यवाही केली पाहिजे. ही वेळ का आली?

श्री.राजू शिंदे :पेमेंन्ट काढणे न काढणे हा प्रशासनाचा विषय आहे. सदस्यांच्या वार्डात कामे झाली पाहिजे हा विषय आहे. पेमेंन्ट काढणे हे गुत्तेदाराचे काम आहे. कोणत्या

वार्डाचे किती पेमेन्ट विकास कामाचे दिले जाहीर करावे. अगोदर रु.२२ कोटी त्यानंतर रु.४० कोटी वाटप केले. त्यावेळी कुणी तक्रार केली नाही?

श्री.त्र्यंबक तुपे :जे पेमेन्ट दिले त्याची चौकशीचे आदेश केले होते अहवाल आला का? पेमेन्ट काढण्यामध्ये सदस्याचा रोल नाही. सदस्य वैयक्तिक काम सांगत नाही. रु.१८ कोटीचे नव्हे तर मागच्या वेळेस श्री.थोरात असेल श्री.पाटणी असेल त्यावेळेसही वाटप केलेल्या रक्कमेची चौकशी करावी. ते कुठे दिले गेले? याची माहिती द्यावी ते देतांना ज्येष्ठता पाळली का? भेदभाव झाला का? हे रु.१८ कोटीचे नव्हे तर मागील रु.४०-५० कोटी वाटप केले ती माहिती घ्यावी. मा.महापौरांना माहिती दिली नसेल आणि पेमेंन्ट दिले असेल तर चुकीचे आहे. चुक झाली असेल तर चौकशीचा अहवाल काय आला? ते ही विचारात घ्यावे. चुक एकाने करायची व दुसऱ्यावर अन्याय होऊ नये. याची दखल प्रशासनाने घ्यावी. ज्येष्ठतेनुसार दिली का? ते ही पहावे. जो विभाग प्रमुख असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. खालचे अधिकारी यात दोषी नसतात. लेखा विभागाने आयुक्तांना माहिती दिली आहे की नाही? तो ही शोध घ्यावा.

श्री.जमीर कादरी :रु.१८ कोटीची बिले दिली. त्याची यादी माझेकडे आहे त्यात दोन महिन्यापुर्वी आलेली बिले सुध्दा दिली. यात १४ कामाचे बिल हे स.पदाधिकारी यांचे सांगण्यानुसार दिले असे आहे. ते चौकशी करण्याची गरज नाही. कार्यवाही करावी. यात ज्येष्ठता नाही. जर चौकशी करायची होती तर आजपर्यंत का केली नाही? श्री.विकास भगवान महाजन, चेक काढले रु.६ लक्ष दुसरा श्री.मंजुळे मनोज हिरामन, तिसरा श्री.जहागिरदार शहाउद्दीन तसेच श्री.सतीश चुन्नीलाल कामेकर रु.१२.५७ चा चेक आहे. असे १४ कामाचे आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :या यादीत एका ठेकेदाराचे दोन तीन बिले काढली आहे. एका व्यक्तीच्या दोन तीन एजन्सी आहे. चौकशी यासाठी लावली की, कुणाचे एमबी केव्हा आले? चौकशी समितीचे काम कुठपर्यत आले समितीला कागदपत्र दिले जात नाही.

श्री.जमीर कादरी :कोणत्या पदाधिकारी यांचे सांगणेनुसार बिल दिले माझे वार्डातील तर यात नाही. दोन महिन्यापूर्वी आलेले बील असे २५ बील काढले.

मुख्य लेखा परीक्षक :स्थायी समितीमध्ये हा विषय झाला होता चौकशी समितीचे अध्यक्ष श्री.भालसिंग साहेब आहे. लेखा विभागाकडून माहिती मागविली मिळाली नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :मुख्य लेखा परीक्षक यांनी पत्र देऊन सुध्दा लेखा विभाग चौकशी करणेसाठी माहिती देत नाही. एक महिना झाला माहिती देत नाही. चुकीच्या पध्दतीने बील दिले आहे फॉरमेट दिला. त्यानुसार माहिती का दिली जात नाही? सभेच्या निर्णयाची अंमलबजावणी का होत नाही?

श्री.त्र्यंबक तुपे :श्री.पाटणी यांचे कार्यकाळात रु.४० कोटीची बीले वाटप केली. त्याचीही चौकशी व्हावी.

मा.महापौर :दि.१.११.२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत कामाचे धनादेश वाटप केल्या प्रकरणी मा.आयुक्त यांनी अतिरिक्त आयुक्त-१,मुख्यलेखा परीक्षक उप आयुक्त महसूल व संबंधीत प्रमुख या चौघाची चौकशी समिती नियुक्त केली आहे. चौकशी समिती त्यांना काही अभिलेखे मिळाले नाहीत म्हणून काम करू शकली नाही. परंतु आता पुन्हा सभागृहाच्या माध्यमातून प्रशासनाला आदेशीत

करण्यात येते की, स.नगरसेवक श्री.तुपे साहेबांनी जी श्री.महावीर पाटणी यांच्या कार्यकाळात देयके देणेबाबतची अतिनियमीतता झाली त्याची तात्काळ चौकशी करून अहवाल द्यावा.

श्री.गोकुळ मलके :श्री.पाटणी मुख्यलेखाधिकारी होते त्या कालावधीतही रु.४० कोटीचे चेक वाटप केले. त्याचीही चौकशी करण्यात यावी.

मा.महापौर :स.गोकुळ मलके यांची सुध्दा तिच मागणी आहे. तात्काळ वरिष्ठ स्तरावरून चौकशी व्हावी व तात्काळ अहवाल सभागृहासमोर सादर करावा. विषय क्रमांक ७७३ जो व्यापारी संकुल रजिस्ट्रेशनचा विषय आहे. तो सोडून बाकी सर्व ऐनवेळचे प्रशासनाचे व सदस्याचे विषय मंजूर करण्यात येत आहे ही सभा पुन्हा आठ दिवसानंतर घेण्यात येईल.

**<u>विषय क्रमांक ७३५:-</u>** **(नगर सचिव विभाग)**

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) (सुधारणा) नियम-२०१२ चे नियम ४,५ व ७ अन्वये निर्वाचित पालिका सदस्यांव्यतिरीक्त मान्यता प्राप्त, नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या शिफारशी वरून नियम ५(२) च्या तरतुदी प्रमाणे रिक्त झालेल्या एका नामनिर्देशित सदस्याच्या जागेवर एका नामनिर्देशित पालिका सदस्याचे नामनिर्देशन करणे.

**(मा.आयुक्त यांच्याकडून प्राप्त प्रस्तावानुसार)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा दिनांक ०६.०८.२०१८, विषय क्रमांक-५७८ संदर्भात मा.आयुक्तांनी फेर तपासणी करून त्या बाबतचा अहवाल पुढील सभेत सादर करण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार विषय क्रमांक-६४६ नुसार दिनांक ११.०९.२०१८ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता, सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तुत प्रस्तावाबाबत व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला होता.

**<u>ठराव:-</u>** “प्रस्तुत प्रकरणात व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या प्रस्तावाच्या संदर्भात श्री.प्रमोद राठोड यांनी महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम ५(२) मधील २ च्या मधील तरतुद निदर्शनास आणुन दिली आहे. ज्या पध्दतीने आधीच्या स.सदस्यांची नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून नियुक्ती झाली होती. याबाबतीत पुर्नतपासणी करीता सभागृहात काही सदस्यांनी मागणी केली होती आणि तसे आदेश सुध्दा देण्यात आले होते. त्यानुसार प्रशासनाने पुर्नविचार करणेबाबत सभागृहाच्या आदेशान्वये दिनांक ११.०९.२०१८ रोजीच्या सर्वसाधारण सभेत पुनश्चः प्रस्ताव ठेवला असता व स.पालिका सदस्यांच्या मागणीनुसार महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे सर्व नियम व कायदेशीर ज्या बाबी आहेत त्यांचा दाखला देऊन व स.सदस्यांनी सभागृहात केलेल्या सुचनेनुसार ५(२)२ मधील सगळ्या तरतुदी, कलम ४ मधील (क) ते (छ) यामधील असलेल्या तरतुदीस अनुसरून सदरील प्रस्तावाबाबत आदेश देण्यात येतो की, हा विषय संपुर्ण मागदर्शनाकरीता महाराष्ट्र निवडणूक आयोगाकडे पाठवण्यात यावा व महाराष्ट्र निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर परत या सभागृहासमोर विचारार्थ ठेवण्यात यावा.”

तथापि, रिट याचिका क्रमांक-११०५०/२०१८ अबुल हसन अली खुर्रम अली हाशमी विरुध्द महानगरपालिका औरंगाबाद या प्रकरणात दिनांक २४.१०.२०१८ रोजी मा.उच्च न्यायालयाने निकाल दिला आहे की, “सदरील प्रकरणी महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर योग्य तो निर्णय घेणेस आदेशीत केले आहे.”

तसेच दिनांक ०६.०८.२०१८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने समिती स्थापन करून अहवाल तयार केला असता, प्राप्त झालेल्या शिफारशीचे पत्र व प्राप्त नामनिर्देशनापैकी नियम ५ कलम (२) नुसार श्री.हाशमी अबुल हसन अली खुर्रम अली यांच्या नावाची इत्तेहाद (एकता) आघाडी कडून करण्यात आलेली शिफारस ही वैध आहे.

करीता, श्री.हाशमी अबुल हसन अली खुर्रम अली यांची इत्तेहाद (एकता) आघाडी कडून स्विकृत सदस्य म्हणून नियुक्ती होणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

## मा.आयुक्तांकडून आलेले प्रस्ताव

**विषय क्रमांक ७३६:-** **(कार्यकारी अभियंता-ड्रेनेज विभाग)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

**अहवाल:-**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, देशातील सर्व शहरे हागंदारी मुक्त करुन शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) दिनांक ०२ ऑक्टोबर २०१४ पासुन राबविण्यास सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्गत जे नागरिक उघड्यावर शौचास जाण्याची पध्दत वापरतात व ज्या नागरिकांकडे वैयक्तिक शौचालय नाही. फक्त अशाच नागरिकांना सदर योजनेतुन वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी शासनामार्फत र.रु.१२०००/- प्रति शौचालय एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर अनुदानामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा रक्कम रु.४०००/- व राज्य शासनाचा हिस्सा र.रु.८०००/- इतका आहे. या संदर्भाने सदरील अभियानाअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत असून आतापर्यत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी अनुदानास पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याची कार्यवाही सुरु असून आजपर्यंत ७४९७ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे ७२६३ लाभार्थ्यास अनुदानाचा पहिला हफ्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत २३४ पात्र लाभार्थी यांना पहिल्या हफ्त्याची रक्कम RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यत लाभार्थ्यास पहिल्या हप्त्याच्या अनुदानापोटी एकुण रक्कम रु. ४,३५,७८,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच या व्यतिरीक्त क्रेडाई औरंगाबाद या बांधकाम व्यावसायिक संस्थेस वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम करण्याचे काम देण्यात आलेले असून आतापर्यत त्यांचे बॅकेत खात्यावर एकूण १२९३ लाभार्थ्याचे पहिल्या हप्त्याचे अनुदान रु.६०००/- प्रति लाभार्थी प्रमाणे एकुण रक्कम रुपये ७७,५८,०००/- इतके RTGS करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच आतापर्यत वैयक्तीक शौचालयाच्या बांधकामासाठी अनुदानाचा पहिला हफ्ता (वैयक्तीक लाभार्थी व क्रेडाई संस्था मिळून) एकूण ८५५६ इतक्या लाभार्थी संख्येस RTGS करण्यात आले असून एकुण पहिल्या हप्त्याचे अनुदानापोटी र.रु.५,१३,३६,०००/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

तसेच आजपर्यत एकुण ६४९६ लाभार्थ्यानी शौचालय बांधकाम पूर्ण केलेले असून १०५२ लाभार्थ्याचे शौचालयाचे बांधकाम सुरु आहे तसेच १००८ लाभार्थ्यामार्फत शौचालयाचे बांधकाम सुरु करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. बांधकाम पूर्ण केलेल्या ४७५९ लाभार्थ्यास अनुदानाचा दुसरा हफ्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. आतापर्यत एकुण ४७५९ लाभार्थ्यास दुस-या हप्त्याच्या अनुदानापोटी एकुण रक्कम रु. २,८५,५४,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे. पहिल्या व दुस-या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकूण रक्कम रु.७,९८,९०,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

आजपर्यत एकूण ९३५८ लाभार्थ्याचे फॉर्म तसेच शौचालय बांधकाम पूर्ण झालेल्या ६४९६ लाभार्थ्यांपैकी ६१११ लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेले आहेत. उर्वरित लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो व फॉर्म अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे.

व्यतिरिक्त स्वच्छ महाराष्ट्र अभियानअंतर्गत उपलब्ध निधीतून वार्ड क्र-९० येथील राजनगर (मुकूंदवाडी) येथे १० बैठकीचे सामुदायिक शौचालय बांधण्यात आलेले असून त्यामध्ये पुरुष व स्त्रीयांसाठी प्रत्येकी ०५ बैठकी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या शौचालयावर रु.१३.८२ ऐवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

| | जनगणना सन २०११- नुसार शौचालय बांधकाम करावयाचे उद्दिष्ट | | वार्ड कार्यालय | | | | | | | ११९९७ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ क्र | तपशिल | झोन-१ अ | झोन-२ क | झोन - ३ एन-६ | झोन - ४ एन-११ | झोन -५ ब | झोन-६ ई | झोन-७ फ | झोन -८ सातारा | झोन- ९ड | एकुण |
| अ | १ | वार्ड अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | २६३७ | २९० | १८९ | ७१४ | ४०३२ | ६८२१ | ७५१ | ५३०४ | ८०० | *२१५३८* |
| | २ | वार्ड अधिकारी यांच्याकडून तपासणी झालेल्या अर्जाची संख्या | २६३७ | २९० | १८९ | ७१४ | ४०३२ | ६८२१ | ७५१ | ५३०४ | ८०० | *२१५३८* |
| | ३ | वार्ड अधिकारी यांनी ठरविलेल्या पात्र लाभार्थ्याच्या अर्जाची संख्या | ७१५ | ८२ | ११९ | ६२५ | १६६६ | ३९५९ | १६४ | ९१६ | ५४४ | *८७९०* |
| | ४ | वार्ड अधिकारी यांनी ठरविलेल्या एकुण अपात्र लाभार्थी संख्या | १९२२ | २०८ | ७० | ८९ | २३६६ | २८६२ | ५८७ | ४३८८ | २५६ | *१२७४८* |
| | | *पहिला हफ्ता (वैयक्तीक)* | | | | | | | | | | |
| ब | ५ | RTGS साठी पाठविण्यात आलेल्या लाभार्थ्याची संख्या | ७०२ | ४१ | ४८ | ५९८ | १३५६ | ३४५८ | १३६ | ६२७ | ५३१ | *७४९७* |
| | ६ | RTGS झालेल्या लाभार्थ्याची संख्या | ६७९ | ४० | ४७ | ५५१ | १२९४ | ३४१८ | १३२ | ६०३ | ४९९ | *७२६३* |
| | ७ | RTGS न झालेल्या लाभार्थ्याची संख्या | २३ | ०१ | ०१ | ४७ | ६२ | ४० | ०४ | २४ | ३२ | *२३४* |
| | ८ | RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | *००* |
| | | *पहिला हफ्ता (क्रेडाई संस्था)* | | | | | | | | | | |
| क | ९ | क्रेडाई संस्था औरंगाबाद RTGS झालेली संख्या | १३ | ४१ | ७१ | २७ | ३१० | ५०१ | २८ | २८९ | १३ | *१२९३* |
| | १० | क्रेडाई संस्था औरंगाबाद RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | *००* |
| | | *एकुण पहिला हफ्ता (ब + क, वैयक्तीक व क्रेडाई संस्था)* | | | | | | | | | | |
| ड | ११ | वैयक्तीक व क्रेडाई संस्था एकूण RTGS झालेली संख्या | ६९२ | ८१ | ११८ | ५७८ | १६०४ | ३९१९ | १६० | ८९२ | ५१२ | *८५५६* |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | *दुसरा हफ्ता* | | | | | | | | | | |
| ई | १२ | RTGS करिता शिफारस केलेल्या लाभार्थ्यांची संख्या | ४९१ | ३१ | ४९ | १९९ | ८५९ | २२१७ | ६६ | ५२१ | २७१ | *४७०४* |
| | १३ | RTGS झालेल्या लाभार्थ्यांची संख्या | ४७३ | ३१ | ४६ | १८७ | ८४५ | २२०१ | ६५ | ५११ | २६५ | *४६२४* |
| | १४ | RTGS न झालेल्या लाभार्थ्यांची संख्या | १८ | ०० | ०३ | १२ | १४ | १६ | ०१ | १० | ०६ | *८०* |
| | १५ | RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | *००* |
| | | *दुसरा हफ्ता (क्रेडाई संस्था)* | | | | | | | | | | |
| फ | १६ | क्रेडाई संस्था औरंगाबाद RTGS झालेली संख्या | ०० | १२ | ०० | ०० | ०० | ९० | ०० | ३३ | ०० | *१३५* |
| | १७ | क्रेडाई संस्था औरंगाबाद RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | *००* |
| | | *अनुदान वितरण* | | | | | | | | | | |
| | | एकुण प्राप्त अनुदान | | | | | | ७.८२२१ कोटी | | | | |
| | | पहिला हफ्ता | ८५५६ x ६०००/- | | | | | ५.१३३६ कोटी | | | | |
| | | दुसरा हफ्ता | ४७५९ x ६०००/- | | | | | २.८५५४ कोटी | | | | |
| | | एकुण | | | | | | ७.९८९० कोटी | | | | |
| | १८ | शौचालय बांधकाम पुर्ण झालेल्या लाभार्थ्यांची संख्या (क्रेडाई सह) | - | - | - | - | - | - | - | -- | - | *६४९६* |
| | १९ | शौचालय बांधकाम सुरु असलेली संख्या (क्रेडाई सह) | - | - | - | - | - | - | - | -- | - | *१०५२* |
| | २० | शौचालय बांधकाम सुरु न झालेले (क्रेडाई सह) | | | | | | | | | | *१००८* |
| | २१ | अपलोड झालेले फॉर्म | - | - | - | - | - | - | - | -- | - | *९३५८* |
| | २२ | अपलोड झालेले पब्लीक टॉयलेट | | | | | | | | | | *३१* |
| | २३ | वैयक्तीक शौचालय फोटो अपलोड | - | - | - | - | - | - | - | -- | - | *६१११* |
| | २४ | फोटो अपलोड न झालेले | | | | | | | | | | *३८५* |

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७३७:-**

**(टिप:-दि.२२.१०.२०१८ (दि.१९.१०.२०१८ ची तहकुब का.प.क्र.१२) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या निर्णयाप्रमाणे सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात आलेला प्रस्ताव)**

**प्रस्ताव**:-

शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण ४३ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक यांचे मानधन वाढ करण्याचा विषय प्रशासनातर्फे दिनांक २२.१०.२०१८ (दि.१९.१०.२०१८ ची तहकुब सभा का.प.क्र.१२) रोजीच्या स्थायी समिती सभेपुढे विषय क्रमांक-११४ अन्वये सादर करण्यात आलेला होता. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे या विषयावर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार प्रस्तूत प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आली.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण ४३ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक यांना सद्यस्थितीत प्रति तास रु.९०/- इतके मानधन देण्यात येते. सदर मानधन खुप तुटपुंजे असून त्यात वाढ करण्यात यावी. यासाठी संबंधीत कर्मचारी सातत्याने मानधन वाढ करणे बाबत मागणी करीत आहेत.

सद्यस्थितीत रु.९०/- प्रमाणे दररोज साधारण ४ तासिका याप्रमाणे ४३ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांवर दरमाह होणारा खर्च साधारणत: ९०X४X४३X२४=३,७१,५२०/- इतका आहे. वार्षिक खर्च साधारणत: ३,७१,५२०X१०=३७,१५,२००/- इतका आहे.

रु.१८०/- प्रमाणे दररोज साधारण ४ तासिका याप्रमाणे ४३ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांवर दरमाह होणारा खर्च साधारणत: १८०X४X४३X२४=७,४३,०४०/- इतका असेल. वार्षिक खर्च साधारणत: ७,४३,०४०X१०=७४,३०,४००/- इतका असेल.

सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात शिक्षण विभाग वेतनाकरीता रु.४०,४१,६०,०००/- (अक्षरी रुपये चाळीस कोटी एक्केचाळीस लाख साठ हजार) इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. आवश्यकता भासल्यास सुधारित अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करावी लागेल.

करीता, सन २०१८-१९ च्या द्वितीय सत्रापासून (दिवाळीच्या सुट्ट्यांनतर) घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक यांना प्रति तास रु.१८०/- इतकी मानधन वाढ करणे बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय स्थगित.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ७३८:-</u>** **(कार्यकारी अधिकारी-बांधकाम विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा दि.१९.०९.२०१५ विषय क्रमांक-१७३ अन्वये पवननगर सिडको एन-७ येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन बिल्डींग बांधणेसाठी र.रु.७०.०० लक्षची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा बोलाविण्यात आल्या असता, कंत्राटदार मे.नाज डेव्हलपर्स यांची निविदा सर्वात कमी दर म्हणजेच १७.११% कमी दराची असल्याने ती स्विकृत करून त्यांना अनामत रक्कम भरणा करणेचे पत्र दिले असता, प्रत्यक्ष बांधकामासाठी पुढील कार्यवाही करणेसाठी नियोजीत ठिकाणी जागा उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांचा भागात एन-७ परिसरात जागेचा आणखी शोध घेण्यात आला. परंतु बराच काळ शोध घेऊनही जागा उपलब्ध न झाल्यामुळे आणि सदरील काम हे एनयुएचएम निधी मधील असल्यामुळे हाती घेणे आवश्यक होते. परंतु जागा उपलब्ध होत नसल्यामुळे ही प्रस्तावित नवीन इमारत इतर वॉर्ड क्र.६१ मध्ये स्थलांतरीत करणेच्या जागीरदार मोहम्मद अय्युब यांचे मागणीनुसार तत्कालीन मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता यांनी वॉर्ड क्र.६१ मधील जुन्या आरोग्य केंद्रालगत उपलब्ध असलेल्या जागेची संयुक्तीक पाहणी केली आणि पवननगर सिडको, एन-७ ऐवजी वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी-सेंट्रलनाका परिसरात जुन्या जीर्ण झालेल्या दवाखान्याच्या इमारतीच्या पाठीमागील बाजुस नवीन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्याची जागा निश्चित करण्यात आली.

त्या जागेस व कंत्राटदार मे.नाज डेव्हलपर्स यांचेकडून १७.११% कमी दराने या नवीन प्रस्तावित जागेवर काम करून घेणेसाठी दिनांक २५.०३.२०१७ रोजी मा.आयुक्त यांची मान्यता झाली. त्यानुसार दिनांक ०१.०६.२०१७ रोजी संबंधीत कंत्राटदारास रितसर कार्यादेश देऊन कामास सुरूवात करण्यात आलेली असून हे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच या कामावर थर्ड पार्टी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना नियुक्त करण्यात आले आहे.

सदर कामाची जागा बदल झाल्यामुळे कुंपण भिंत, पेव्हर ब्लॉक तसेच इतर सर्व संबंधीत कामाच्या बाबी यामध्ये वाढ होत आहे. करीता, हे काम पुर्ण करणेसाठी प्रत्यक्ष परिस्थितीनुरूप सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून ते र.रु.८२,४६,७०२/- चे आहे.

प्रस्तावित कामातील अतिरीक्त बाबी अंदाजपत्रक दराने आणि परिशिष्ट-ब मधील बाबींची कामे ही मंजुर निविदा दर १७.११% कमी दराने अशी एकत्रित प्रत्यक्ष र.रु.७१,४१,७८१/- खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | बाब | रक्कम रुपये |
|---|---|---|
| a. | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम | ७०,००,०००/- |
| b. | निविदा रक्कम | ५५,३६,३५६/- |
| c. | निविदा अंतर्गत असलेल्या बाबी वर होणारा एकूण खर्च | ६४,५७,७५०/- |
| d. | अतिरीक्त बाबीवरील होणारा खर्च | १७,८८,९५२/- |
| e. | एकूण प्रकल्पावर अं.प.दराने होणारा खर्च (c+d) | ८२,४६,७०२/- |
| f. | निविदा दर हे १७.११% कमी दराने below असल्याने निविदा बाबी वरील खर्चात बचत () | ११,०४,९२१/- |
| g. | प्रत्यक्षात प्रकल्पावर होणारा खर्च (e-f) | ७१,४१,७८१/- |

करीता, सुधारित अंदाजपत्रक र.रु.८२,४६,७०२/- व प्रत्यक्षात होणारा खर्च र.रु.७१,४१,७८१/- यास मान्यतेस्तव वाढीव कामे मुळ परिशिष्ट-ब मधील बाबी १७.११% कमी दराने आणि अतिरीक्त बाबी अंदाजपत्रक दराने मे.नाज डेव्हलपर्स यांचेकडून करून घेणेस आणि कामाच्या परिसरात येणारी बायजीपुरा आरोग्य केंद्राची जुनी इमारत मा.महापौर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी व कार्यकारी अभियंता यानी संयुक्तीक पाहणी करून ठरविल्यानुसार याच एजन्सीमार्फत पाडून व्यर्थ साहित्यांची विल्हेवाट लावणेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पवननगर सिडको एन-७ येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन बिल्डींग प्रत्यक्ष बांधकामासाठी नियोजीत ठिकाणी व त्या परिसरात देखील जागा उपलब्ध नसल्यामुळे प्रस्तावित नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत पवननगर सिडको, एन-७ ऐवजी वॉर्ड क्र.६१-अल्तमश कॉलनी, सेंट्रल नाका परिसरात जुन्या जीर्ण झालेल्या दवाखान्याच्या इमारतीच्या पाठीमागील बाजुस नवीन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्याची जागा निश्चित केल्यानुसार, प्रत्यक्ष परिस्थितीनुरूप सुधारीत अंदाजपत्रक र.रु.८२,४६,७०२/- आणि प्रत्यक्षात होणारा खर्च र.रु.७१,४१,७८१/- यास मान्यता देण्यात येते. तसेच वाढीव कामे मुळ परिशिष्ट-ब मधील बाबी १७.११% कमी दराने आणि अतिरीक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने मे.नाज डेव्हलपर्स यांचेकडून करून घेणेस आणि कामाच्या परिसरात येणारी बायजीपुरा आरोग्य केंद्राची जुनी इमारत याच एजन्सीमार्फत पाडून व्यर्थ साहित्यांची विल्हेवाट लावण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७३९:-** **(शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पर्यटनास चालना मिळणेसाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विमानतळा समोर जिल्ह्यातील विविध ऐतिहासीक स्थळांची प्रतिकृती तयार करणेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१६-२०१७ अंतर्गत दिनांक २९.०३.२०१७ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून रुपये ४९,९८,६२३/- एवढ्या रकमेस मंजुरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त दर्शविल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील विमानतळासमोर जिल्ह्यातील विविध ऐतिहासीक स्थळांची प्रतिकृती तयार करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-२०१६ च्या दरसुची नुसार रक्कम रुपये ४९,९८,६२३/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च हा जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून होणार आहे. निविदा प्रक्रियेअंती मुबारक महेबुब

पठाण यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१३% कमी दराच्या निविदेस दिनांक ११.०१.२०१८ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक-२०६ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. तथापि, कमी दराच्या निविदेमुळे र.रु.६,०६,३३३/- एवढी बचत हेणार असल्याने आणि प्रत्यक्ष परिस्थिती करीता कामाच्या आवश्यकते प्रमाणे कामाचे वास्तुविशारद मे.डी.पी.डिझाईन यांनी सदरील कामाचे सुधारित अंदाजपत्रक र.रु.५४,२९,४३३/- तयार केले आहे. कमी दराच्या निविदेमुळे होणाऱ्या बचतीमधून सुधारीत अंदाजपत्रकातील वाढीव रकमेचा खर्च भागविता येईल व कामावर होणारा निव्वळ एकूण खर्च हा मंजुर अंदाजपत्रक रक्कमेच्या आत राहील.

| | |
|---|---|
| निविदेतील परिशिष्ट-ब नुसार स्थापत्य कामे | रुपये ३२,९०,५७४/- |
| अतिरीक्त बाबी | रुपये १३,२३,६५५/- |
| निविदेतील परिशिष्ट-ब नुसार विद्युतीकरण कामे | रुपये ५,८५,९०३/- |
| वास्तु विशारद शुल्क ४% (जीएसटी सहीत) | रुपये २,२९,३०१/- |
| एकुण | रुपये ५४,२९,४३३/- |

करीता, सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये ५४,२९,४३३/- चा प्रस्ताव **(र.रु.४,३०,८१०/- या वाढीव रकमेसह)** याच कामाचे कंत्राटदार श्री.मुबारक महेबुब पठाण यांचेकडून वर दर्शविलेल्या प्रमाणे काम करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पर्यटनास चालना मिळणेसाठी महानगरपालिका क्षेत्रातील विमानतळासमोर जिल्ह्यातील विविध ऐतिहासीक स्थळांची प्रतिकृती तयार करणे तसेच आवश्यकतेप्रमाणे वास्तुविशारद मे.डी.पी.डिझाईन यांनी तयार केलेले सुधारीत र.रु.५४,२९,४३३/- चे **(र.रु.४,३०,८१०/- या वाढीव रकमेसह)** अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते व सदरचे काम याच कामाचे कंत्राटदार श्री.मुबारक महेबुब पठाण यांचेकडून प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे काम करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०, रोजाबाग-भारतनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.१०, एन-१२, सिडको येथील लेक-व्ह्यु हौ.सोसायटी ते सलीम अली सरोवर पर्यंत संरक्षीत भींत बांधणे. Zone-04-Spill P.No.83, Sr.No.11 (र.रु.४९.९९ लक्ष) | १. वॉर्ड क्र.१०, भारतमातानगर येथील विनायक काळे ते राणे सर यांच्या घरासमोरील ओपन स्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.१० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.१० रोजाबाग येथील विविध ठिकाणच्या रोड side वर पेव्हर ब्लॉक बसविणे व ओपन स्पेस विकसीत करणे. पोलसह फिटींग बसविणे र.रु.२० लक्ष.<br>३. वॉर्ड क्र.१०, रोजाबाग येथील विविध ओपन स्पेसवर सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१० लक्ष. |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०, रोजाबाग-भारतनगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.१०, एन-१२, सिडको येथील लेक-व्ह्यु हौ.सोसायटी ते सलीम अली सरोवर पर्यंत संरक्षीत भींत बांधणे. Zone-04-Spill P.No.83, Sr.No.11 (र.रु.४९.९९ लक्ष) | १. वॉर्ड क्र.१०, भारतमातानगर येथील विनायक काळे ते राणे सर यांच्या घरासमोरील ओपन स्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.१० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.१० रोजाबाग येथील विविध ठिकाणच्या रोड side वर पेव्हर ब्लॉक बसविणे व ओपन स्पेस विकसीत करणे. पोलसह फिटींग बसविणे र.रु.२० लक्ष.<br>३. वॉर्ड क्र.१०, रोजाबाग येथील विविध ओपन स्पेसवर सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर, काबरानगर अंतर्गत इंदिरानगर, अल्ताफ कॉलनी, बिडी काबरानगर, सुतगिरणी क्वॉर्टर्स् ह्या भागामध्ये जवळपास ६०% पेक्षा जास्त अल्पसंख्यांक नागरीक असून हा भाग बऱ्याच वर्षापासून विकास कामांपासून वंचित आहे. करीता वॉर्डामध्ये विकास होणेसाठी शासनाच्या प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम अंतर्गत निधी प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | र.रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत गार्डन दुरूस्ती करणे. | रु.५० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत विविध विकास कामे करणे. | रु.१ कोटी |

**सुचक:-**श्रीमती सीमा काहानुलाल चक्रनारायण **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर, काबरानगर अंतर्गत इंदिरानगर, अल्ताफ कॉलनी, बिडी काबरानगर, सुतगिरणी क्वॉर्टर्स् ह्या अल्पसंख्यांक बहुल भागामध्ये शासनाच्या प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमाअंतर्गत खालील विकास कामांसाठी निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | र.रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु.५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत गार्डन दुरूस्ती करणे. | रु.५० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत विविध विकास कामे करणे. | रु.१ कोटी |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-२०१९ अर्थसंकल्प मध्ये लेखाशिर्षक पुस्तीकात आलेले काम हे शहरी भागात पुर्न:डांबरीकरण करणे या शिर्षकाने आले आहे. बजेट अंतर्गत विकास कामे SCR-Zone-08, P.No-33, अ.क्र.01 हे असून त्या ऐवजी वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत राहुलनगर, मामाचौक येथे आडव्या व लहान गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे हे काम करून देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल नवीद मं.अब्दुल रशीद **अनुमोदक:-**श्रीमती रेशमा अशफाक कुरैशी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१८-२०१९ अर्थसंकल्प मधील शहरी भागात पुर्न:डांबरीकरण करणे या शिर्षकाअंतर्गत विकास कामे SCR-Zone-08, P.No-33, अ.क्र.01 हे असून या कामाऐवजी वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत राहुलनगर, मामाचौक येथे आडव्या व लहान गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०५, राहुलनगर-सादातनगर हा अल्पसंख्यांक बहुल रहिवासीयांच्या वॉर्ड असल्यामुळे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०१८-सा.प्र./अल्पसंख्याक/ कावि-३१७ दिनांक २९.०९.२०१८ अन्वये १४ व्या वित्तआयोगा अंतर्गत केंद्र पुरुस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाकडून अल्पसंख्याक समुदायाचा विकासासाठी जास्तीत जास्त निधी राज्यासाठी उपलब्ध होणे शक्य आहे.

१. वॉर्ड क्र.१०५ मध्ये अलीमभाई पिठाची गिरणी ते गल्ली नं.१० हनफिया मस्जीद पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.३० लक्ष.
२. वॉर्ड क्र.१०५ मध्ये सादातनगर गल्ली नं.११ नुर मस्जीद पर्यंतच्या उभ्या व आडव्या गल्ल्यात कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.४० लक्ष.
३. वॉर्ड क्र.१०५ मध्ये मोहमंदी मस्जीद ते सत्तारभाई किराणा पर्यंत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२० लक्ष.
४. वॉर्ड क्र.१०५, राहुलनगर-सादातनगर मध्ये विविध गल्ल्यांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.२० लक्ष.

करीता, १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्रधानमंत्री जनविकास योजनेतून रु.६० लक्षचा निधी मिळण्यासाठी प्रस्ताव मंजुर करून जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन विभागाला पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल नवीद मं.अब्दुल रशीद **अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या १५ लक्ष लोकसंख्येसाठी जायकवाडी धरणावर अवलंबून ५६ दशलक्ष लि. व १०० दशलक्ष लि. क्षमतेच्या दोन योजना कार्यरत आहेत. शहराची आजची गरज २०२ दशलक्ष लि.प्रतिदीन आहे. तथापी, धरणात पाणी असूनही आवश्यक क्षमता महानगरपालिकेकडे नसल्यामुळे मागणी व उपलब्धतेतील मोठी तुट पाहता शहराला तीन दिवसाआड तर काही भागांना ४ ते ५ दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येतो. दोन्ही योजनाद्वारे दररोज १५० दशलक्ष लिटर पाणी उचल केली जाते. यानुसार शहरासाठी वार्षिक ५८ दशलक्ष घनमीटर (साधारणत:

२ टीएमसी वार्षिक) पाण्याचे आरक्षण मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद तसेच जलसंपदा विभागाकडे दरवर्षी नियमीत नोंदविण्यात येते.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जायकवाडी धरणामध्ये ११३.२८ दशलक्ष घनमीटर (साधारणतः ४ टीएमसी) पाण्याचे आरक्षण मंजुर आहे. समांतर जलवाहिनी प्रकल्प मंजुर झालेला आहे. त्यामध्ये महानगरपालिकेस योजना सुरु करतांना १०६.८० दशलक्ष घनमीटर व सन-२०३८ पर्यंत २००.७५ दशलक्ष घनमीटर पाणी आवश्यक आहे. पाणी पुरवठा प्राधान्य हे शासनाचे मुख्य धोरण असून औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना जायकवाडी धरणावर अवलंबून आहेत. यासाठी मंजुर आरक्षीत पाण्या व्यतिरीक्त ८७.४७ दशलक्ष घनमीटर पाण्याचे वाढीव आरक्षण करण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. प्रशासनाने त्यानुसार वैधानिक कार्यवाही करावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जायकवाडी धरणामध्ये ११३.२८ दशलक्ष घनमीटर (साधारणतः ४ टीएमसी) पाण्याचे आरक्षण मंजुर आहे. समांतर जलवाहिनी प्रकल्प मंजुर झालेला आहे. त्यामध्ये महानगरपालिकेस योजना सुरु करतांना १०६.८० दशलक्ष घनमीटर व सन-२०३८ पर्यंत २००.७५ दशलक्ष घनमीटर पाणी आवश्यक असल्याने पाणी पुरवठा प्राधान्य हे शासनाचे मुख्य धोरण असून औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना जायकवाडी धरणावर अवलंबून आहेत. यासाठी मंजुर आरक्षीत पाण्या व्यतिरीक्त ८७.४७ दशलक्ष घनमीटर पाण्याचे वाढीव आरक्षण करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन कार्यालय क्र.०७ अंतर्गत सन २०१८-१९ करीता स्पील ओव्हर कामाच्या यादीमध्ये पान क्र.Zone-07-Spill-P.No.167 व अ.क्र.21 वर दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १६७ | २१ | वॉर्ड क्र.९५, बालकृष्ण नगर, शिवनेरी कॉलनी व आदर्श कॉलनी मधील रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे. र.रु.१४.८४ लक्ष. |

**त्याऐवजी**

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १६७ | २१ | वॉर्ड क्र.९५, शिवनेरी कॉलनी, बालकृष्ण नगर अंतर्गत आदर्श कॉलनी येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे. र.रु.१४.८४ लक्ष. |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मोरे ज्योती राजाराम **अनुमोदक:-**श्रीमती विधाते अंकिता अनिल

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन कार्यालय क्र.०७ अंतर्गत सन २०१८-१९ करीता स्पील ओव्हर कामाच्या यादीमध्ये पान क्र.Zone-07-Spill-P.No.167 व अ.क्र.21 वर दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १६७ | २१ | वॉर्ड क्र.९५, बालकृष्ण नगर, शिवनेरी कॉलनी व आदर्श कॉलनी मधील रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे. र.रु.१४.८४ लक्ष. |

**त्याऐवजी**

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १६७ | २१ | वॉर्ड क्र.९५, शिवनेरी कॉलनी, बालकृष्ण नगर अंतर्गत आदर्श कॉलनी येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे. र.रु.१४.८४ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७४६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दारिद्रय रेषेखालील सन २००५ ची यादीतील लाभार्थी पूर्वी पासून एन.यु.एल.एम.अभियानाचा व प्रकल्प विभागातील योजनाचा लाभ घेत आहेत. परंतु एन.यु.एल.एम.विभागाने पत्र दिल्यानुसार फक्त एस.ई.सी.सी. सन-२०११ यादीतील लाभार्थीच एन.यु.एल.एम.अभियानाचा व प्रकल्प विभागातील योजनांचा लाभ घेवू शकतील त्यामुळे दारिद्रय रेषेखालील सन-२००५ च्या यादीतील लाभार्थी अनेक योजनांपासून वंचित राहतील व त्यांच्यावर अन्याय होणार आहे.

करीता, दारिद्रय रेषेखाली सन २००५ च्या यादीतील लाभार्थ्यांना सुध्दा एन.यु.एल.एम. अभियानाचा व प्रकल्प विभागातील योजनाचा लाभ देण्यात यावा म्हणून एस.ई.सी.सी. सन २०११ यादीतील लाभार्थीच एन.यु.एल.एम.अभियानाचा व प्रकल्प विभागातील योजनाचा लाभ घेवू शकतील, ही अट रद्द करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरीता अरुण बोर्डे

**अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद, श्रीमती तसनीम बेगम अब्दुल रऊफ

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दारिद्रय रेषेखाली सन २००५ च्या यादीतील लाभार्थ्यांना सुध्दा एन.यु.एल.एम.अभियानाचा व प्रकल्प विभागातील योजनाचा लाभ देण्यात यावा म्हणून एस.ई.सी.सी. सन-२०११ यादीतील लाभार्थीच एन.यु.एल.एम.अभियानाचा व प्रकल्प विभागातील योजनाचा लाभ घेवू शकतील ही अट रद्द करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७४७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, तत्कालीन आयुक्त, श्री.ओमप्रकाशजी बकोरीया यांना ए-१ च्या कामात काही शंका निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांनी ए-१ स्वरुपाची कामे बंद केलेली होती व झालेल्या कामाचे देयके थांबविली होती. परंतु, सर्वच गुत्तेदारांनी कामात हलगर्जीपणा केलेला नव्हता. त्यांची कामे पारदर्शक होती. त्युनी कामापुर्वीचे फोटो व काम झाल्यानंतरचे फोटो संचिकेला लावून दिले. परंतु आजपर्यंत त्यांची देयके अदा केलेली नाहीत. त्यामुळे अनेक गुत्तेदार कर्ज बाजारी झालेले आहेत.

तरी तत्कालीन आयुक्त श्री.ओमप्रकाशजी बकोरीया यांनी थांबविलेल्या ए-१ कामाच्या संचिकांची चौकशी करून काम केलेल्या गुत्तेदारांना त्यांची देयके अदा करणे प्रशासनातर्फे अपेक्षित होते. परंतु त्यावर आजपर्यंत कोणतीच कार्यवाही झालेली नाही.

करीता ए-१ कामाच्या संचिकांची प्रशासनाने सर्व स्तरावर चौकशी करणे व काम केलेल्या गुत्तेदारांना त्यांची देयके अदा करण्यास मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शेख जफर अख्तर **अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-११४ अंतर्गत जुनी म्हाडा कॉलनी मधील खुल्या जागेस "श्रीराम उद्यान" व नवीन म्हाडा कॉलनी मधील खुल्या जागेस "श्री साईबाबा उद्यान" असे नाव देण्यात यावे अशी या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करून जुनी म्हाडा कॉलनी मधील खुल्या जागेस "श्रीराम उद्यान" व नवीन म्हाडा कॉलनी मधील खुल्या जागेस "श्री साईबाबा उद्यान" असे नाव देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे **अनुमोदक:-**श्रीमती विमल जनार्दन कांबळे

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११४, देवळाई अंतर्गत देवळाई चौकातील देवळाई गांवाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील प्रवेशद्वारास "श्री.सदगुरु साईबाबा प्रवेशद्वार" हे नाव देण्यासाठी वॉर्डातील नगारीकांची मागणी होत आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे **अनुमोदक:-**श्रीमती विमल जनार्धन कांबळे

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६९ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| कामाचे पान क्रमांक व अ.क्र. | मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| एससीआर झोन-२, पान क्र. ०७, अ.क्र. १७ | १. प्रभाग क्र.६९ मध्ये विविध भागात कॉंक्रेटीकरण करणे. आर्थीक तरतुद रु.१५ लक्ष. | १. प्रभाग क्र.६९ मध्ये विविध भागात नविन ड्रेनेज लाईन टाकणे व मेनहोल चेम्बर बांधणे. आर्थीक तरतुद रु.१५ लक्ष या कामासाठी वळती करण्यात यावी. |

**सुचक:-**श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी **अनुमोदक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६९ येथे खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| कामाचे पान क्रमांक व अ.क्र. | मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| एससीआर झोन-२, पान क्र. ०७, अ.क्र. १७ | १. प्रभाग क्र.६९ मध्ये विविध भागात काँक्रेटीकरण करणे. आर्थीक तरतुद रु.१५ लक्ष. | १. प्रभाग क्र.६९ मध्ये विविध भागात नविन ड्रेनेज लाईन टाकणे व मेनहोल चेम्बर बांधणे. आर्थीक तरतुद रु.१५ लक्ष या कामासाठी वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगांव-ब्रिजवाडी अंतर्गत राजेंद्रनगर येथील मनपाच्या (मराठी व उर्दु) प्राथमिक व माध्यमिक शाळेचे नामकरण करण्याची नागरीकांची बऱ्याच वर्षाची मागणी असून मनपाच्या या शाळेला “शिक्षण महर्षी महात्मा ज्योतीबा फुले प्राथमिक व माध्यमिक शाळा” असे नामकरण करण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप

**अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ, श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा परिसर औरंगाबाद येथे खंडोबाचे ऐतिहासिक मंदिर असून १७६६ ला या मंदिराचा जिर्णोद्वार अहिल्याबाई होळकर यांनी केला आहे, या ठिकाणी प्रतिवर्षी मोठी यात्रा सुध्दा भरते व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन भाविक या ठिकाणी येत असतात, परंतु या मंदिराचा विकास अद्यापही करण्यात आलेला नाही. ते आहे त्याच स्थितीत आहे व त्याची पडझड सुध्दा होत आहे. करीता सदरील खंडोबा मंदीराला तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात यावा. जेणे करून शासनातर्फे या तिर्थक्षेत्राचा विकास केला जाईल व त्यामुळे परिसराचा सुध्दा विकास होईल व पर्यटक सुध्दा वाढेल.

करीता मा.सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी घेण्यात यावा व पारित करून शासनाकडे पाठविण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-** श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील स्पिल ओव्हर मधील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात झोन | १. प्रभाग क्र.११४ अंतर्गत गट नं.१५१ |

| | | |
|---|---|---|
| | क्र.०८, स्पील पान क्र.२३३ वरील अनुक्रमांक २८ वर वॉर्ड क्र.११४ अंतर्गत छत्रपतीनगर येथे ओमसाई अपार्टमेंट ते पोपळधर अपार्टमेंट येथे ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.२०.०० लक्ष | विजयनगर, संभाजीराजे परिसरातील खुल्या जागेला संरक्षित भिंत बांधणे व जागा विकसीत करणे. र.रु.२०.०० लक्ष. |
| ०२ | सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात झोन क्र.०८, स्पील पान क्र.२३४ वरील अनुक्रमांक ४५ वर वॉर्ड क्र.११४ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.१०.०० लक्ष | १. प्रभाग क्र.११४ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे **अनुमोदक:-**श्रीमती विमल जनार्धन कांबळे
मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ब्रिजवाडी, एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथे मुस्लीम समाजाचे २०० ते ३०० घरे आहेत हि वसाहत फार जुनी आहे. येथील नागरीकांना दफनविधी करण्यासाठी इतर ठिकाणी जावे लागत आहे. येथील रहिवासीयांच्या मागणी नुसार सदरील भागात गट नं.३० मध्ये शासनाची गायराण जागा आहे. सदरील गट नं.३० मधून मुस्लीम कब्रस्तानासाठी ०३ एक्कर गायरान जागा मिळण्यासाठी प्रस्ताव मंजुर करून पुढील कार्यवाहीस्तव मा.जिल्हाधिकारी कार्यालयास प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद **अनुमोदक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील युवकामध्ये चांगल्या आरोग्याच्या दृष्टीने व्यायामाची आवड निर्माण करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी औरंगाबाद शहरात महाराष्ट्र स्तरावर मा.महापौर श्री बॉडी बिल्डींग स्पर्धा घेण्यात यावी जेणेकरून युवकामध्ये उत्साह निर्माण होईल व चांगल्या आरोग्याच्या दृष्टीने व्यायामाची आवड निर्माण होईल. सदरील स्पर्धा आयोजीत करण्यास राज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी इच्छूक आहे व चांगल्या प्रकारची स्पर्धा आयोजीत करण्यास सोसायटी तयार आहे.

करीता, औरंगाबाद शहरात २६ जानेवारी-२०१९ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त मा.महापौर श्री बॉडी बिल्डिंग स्पर्धा राज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी यांच्यातर्फे आयोजीत करण्याची परवानगी व त्या अनुषंगाने येणाऱ्या संभावित खर्च रु.०५ लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शेख जफर अख्तर **अनुमोदक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, २६ जानेवारी-२०१९ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त मा.महापौर श्री बॉडी बिल्डिंग स्पर्धा राज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी यांच्यातर्फे आयोजीत करण्याची

परवानगी व त्यासाठी लागणाऱ्या रु.०५ लक्षच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र-८४, ज्ञानेश्वरी कॉलनी अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे सन-२०१८-१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पामधून लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.८४ अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांकडे पुतळ्यापासून हॉटेल एव्हान पर्यंत ३५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे. Water Work Spill P.No.286 (र.रु.१० लक्ष). | १. वॉर्ड क्र.८४ अंतर्गत सारा गार्डन, कासलीवाल गार्डन येथे सिमेंट रोडच्या बाजुला पेव्हर ब्लॉक बसविणे. (र.रु.१० लक्ष). |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कमलाकर शामराव जगताप **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र-८४, ज्ञानेश्वरी कॉलनी अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.८४ अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांकडे पुतळ्यापासून हॉटेल एव्हान पर्यंत ३५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे. Water Work Spill P.No.286 (र.रु.१० लक्ष). | १. वॉर्ड क्र.८४ अंतर्गत सारा गार्डन, कासलीवाल गार्डन येथे सिमेंट रोडच्या बाजुला पेव्हर ब्लॉक बसविणे. (र.रु.१० लक्ष). |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.महंमद जुनैद महंमद अकिल हे कल्याण डोंबीवली महानगरपालिकेत सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. श्री.महंमद जुनैद महंमद अकिल यांचे आई व वडील तसेच सर्व कुटूंब हे जुना बायजीपूरा, औरंगाबाद येथे वास्तव्यास आहेत. आपल्या महानगरपालिकेत शिक्षकाच्या जागा रिक्त असून त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेत आंतरजिल्हा बदली करून सहाय्यक शिक्षक या पदावर नियुक्त केल्यास त्यांना औरंगाबाद येथे राहून त्यांचे परिवारा सोबत राहणे शक्य होईल.

करीता, श्री.महंमद जुनैद महंमद अकिल, सहाय्यक शिक्षक कल्याण डोंबीवली,महानगरपालिका येथून औरंगाबाद महानगरपालिकेत सहाय्यक शिक्षक या पदावर आंतरजिल्हा बदली करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्री.कमलाकर शामराव जगताप

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४९ मधील जुना बाजार बारुदगरनाला येथील रहिवासी नामे नुरे मुजस्सम खालेद पिंजारी वय १० वर्ष हा परिवारातील एकुलता एक मुलगा होता. रस्त्यावर खेळत असतांना मोकाट फिरणारे कुत्र्याने चावा घेतल्याने त्याला गंभीर दुखापत झालेली होती. त्यामुळे त्याला

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे दाखल करण्यात आलेले होते. परंतु उपचार चालु असतांना दिनांक २७.११.२०१८ रोजी त्याचा मृत्यु झालेला आहे.

करीता, सदरील मुलगा हा गरीब कुटूंबातील होता व परिवारात एकुलता एक मुलगा होता त्यामुळे या गरीब कुटूंबीयास सहानुभूती व आर्थीक मदत म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रक्कम रुपये ०५ लक्षाची आर्थिक मदत करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्रीमती संगिता सुभाष वाघुले

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मधील जुना बाजार बारुदगरनाला येथील रहिवासी नामे नुरे मुजस्सम खालेद पिंजारी वय १० वर्ष यास मोकाट कुत्र्याने चावल्यामुळे मृत्यु झाल्याने त्याच्या कुटूंबीयास मनपातर्फे र.रु.०५ लक्षची आर्थिक मदत करण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७५९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७६, विष्णूनगर मधील सिंधी कॉलनी हा भाग अल्पसंख्याक असून शासनाच्या अल्पसंख्याक विकास योजनेअंतर्गत सदरील भागात रस्ते विकास कामासाठी शासनाकडून रु.५० लक्षचा निधी उपलब्ध करून द्यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती अंकिता अनिल विधाते **अनुमोदक:-**श्रीमती ज्योती राजाराम मोरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७६, विष्णूनगर मधील सिंधी कॉलनी या अल्पसंख्यांक बहुल वसाहतीमध्ये शासनाच्या अल्पसंख्याक विकास योजनेअंतर्गत सदरील भागात रस्ते विकास कामासाठी शासनाकडून रु.५० लक्षचा निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७६०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माजी महापौर स्व.श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचे शहराच्या विकासासाठी भरीव योगदान होते. त्यांनी विविध महत्वाच्या पदांवर अत्यंत निष्ठेने काम केले होते. त्यांचे सामाजिक योगदान पाहता व त्यांचे कार्य शहरवासियांच्या कायम स्मरणात रहावे. यासाठी उस्मानपुरा येथील गोपाळ टी कल्चरल हॉल समोरील असलेले आयलँड स्वखर्चाने विकसीत करण्याची ओबेरॉय परिवाराने परवानगी मागितलेली आहे. सदरील बेटाची देखभाल दुरूस्ती देखील त्यांच्यातर्फे करण्यात येणार आहे. मनपाचे नियम, वाहतुकीचे नियम व अटीस अधिन राहून ओबेरॉय परिवार यांना सदरील बेट कायम स्वरुपी देखभाल व दुरूस्तीसह विकसीत करण्यास परवानगी द्यावी. त्याचप्रमाणे ओबेरॉय परिवाराच्या मागणीनुसार सदरील बेटास “स.मनमोहनसिंग बी.करमसिंग ओबेरॉय चौक” असे नाव देण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरीता अरुण बोर्डे **अनुमोदक:-**श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा येथील गोपाळ टी कल्चरल हॉल समोरील असलेले आयलँड मनपाचे नियम व अटी तसेच वाहतुकीचे नियम व अटीस अधिन राहून ओबेरॉय परिवार यांना सदरील बेट कायम स्वरुपी देखभाल व दुरूस्तीसह विकसीत करण्यासाठी परवानगी देण्यात येते तसेच

या बेटास “स.मनमोहनसिंग बी.करमसिंग ओबेरॉय चौक” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७६१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील आणि त्यांनी कर्मभुमी म्हणून औरंगाबाद शहरासाठी संपूर्ण आयुष्य घालविणारे नामवंत साहित्यिक तथा अस्मितादर्शक त्रैमासिकाचे मुख्य संपादक, अखिल भारतीय विश्व साहित्य सभेचे पहिले अध्यक्ष आणि राष्ट्रीय पुरस्कृत सरकारचे पद्मश्री पुरस्कार प्राप्त जेष्ठ साहित्यीक डॉ.गंगाधर पानतावणे यांचे वयाच्या ८२ वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने त्यांनी आयुष्यभर दलित साहित्यातून, अस्मितादर्शक त्रैमासिकच्या माध्यमातून दलित, आदिवासी, भटके, मागासवर्गीयांसाठी साहित्य संमेलन भरवले. दरवर्षी विविध ठिकाणी राज्यातील तालूका व जिल्हास्तरीय त्याचप्रमाणे परप्रांतातही संमेलन भरवून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व लेखन करून तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कार्य आयुष्यभर केले. अस्मितादर्शक नियत कालिका चालवून नुकतेच रौप्य महोत्सव वर्ष (५० वर्ष) साजरे करण्यात आले.

डॉ.गंगाधर पानतावणे सरांनी अस्मितादर्शक या नियतकालिकाची निर्मिती करून साहित्याच्या कक्षा रुंदावल्याचे काम केले. त्यांनी जवळपास ३५ वैचारीक ग्रंथाची निर्मिती व विविध ठिकाणी २९ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेल्या डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या साहित्याचे वाचन करण्यासाठी नव्या पिढीचा प्रेरित केले. त्यांनी शासन व विविध विद्यापिठामध्ये वेगवेगळ्या कमीटीवर कार्य केलेले आहे. त्यांच्या निधनाने सच्चा आंबेडकरवादी लेखक साहित्यीक, विचारवंत आपल्यातून पोरका झालेला आहे. ही पोकळी कधीही भरून निघणारी नाही. अशा या थोर साहित्यीकाचे नाव सदैव अजरामर राहण्यासाठी त्यांचे स्मरण असावे यासाठी त्यांचे निवासस्थान “श्रावस्ती” मिलिंद महाविद्यालय, नागसेन परिसर, लिटल फ्लॉवर इंग्लीश हायस्कुल ते विद्यापीठ, जयसिंगपुरा या मार्गास अस्मितादर्शकार, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त “पद्मश्री डॉ.गंगाधर पानतावणे” यांचे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती प्रेमलता मिलिंद दाभाडे

**अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती विजया संजय बनकर, श्रीमती ज्योती जयेश अभंग.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिवंगत डॉ.गंगाधर पानतावणे यांचे निवासस्थान “श्रावस्ती” मिलिंद महाविद्यालय, नागसेन परिसर, लिटल फ्लॉवर इंग्लीश हायस्कुल ते विद्यापीठ, जयसिंगपुरा या मार्गास अस्मितादर्शकार, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त “पद्मश्री डॉ.गंगाधर पानतावणे” यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७६२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१७ मधील प्रमाणित दलित वसाहती मध्ये शासनाच्या दलित वस्ती विकास निधीतून विकास कामे करण्याकरीता दलित वस्तीचा निधी उपलब्ध करून विकास कामे करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

**अनुमोदक:-**श्री.राहूल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती बनकर विजया संजय, श्रीमती ज्योती जयेश अभंग.

मा.महापौर :विषय स्थगित.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७६३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार देऊन गौरविले जाते. क्रिडा क्षेत्रातील महाराष्ट्रातील हा सर्वोच्च बहुमान आहे. हा पुरस्कार प्राप्त करण्यासाठी खेळाडू अनेक वर्षे मैदानावर सातत्याने सराव करतात. ते त्यांच्या वैयक्तिक अभ्यासाकडे व भविष्याकडे देखील दुर्लक्ष करून महाराष्ट्र व देशाचा गौरव वाढविणेसाठी प्रयत्न करीत असतात. अशा नामांकीत खेळाडुंची दखल घेऊन विशेष बाब म्हणून सांगली व पुणे महानगरपालिकेने शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग ब,क व ड मध्ये थेट नोकरी दिलेली आहे. याचप्रमाणे आपल्याही महानगरपालिकेत औरंगाबाद शहरातील अशा प्रतिभावंत नावलौकीक मिळविलेल्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडुंना विशेष बाब म्हणुन त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार थेट नोकरी द्यावी व शासनाची मान्यता येईपर्यंत तात्काळ थेट अस्थायी सेवेत नियुक्ती देण्यात यावी व शासन मान्यता आल्यानंतर शासकीय सेवेत नियमीत कायमस्वरुपी करून घ्यावे आणि त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटवावा अशी मागणी महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनने केलेली आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील अर्ज केलेले शिवछत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू सागर मगरे, दिनेश वंजारे, स्नेहा ढेपे हे आहेत.

करीता, उपरोक्त प्रमाणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

**अनुमोदक:-**श्री.राजगौरव हरीदास वानखेडे, श्री.त्र्यंबक गणपत तुपे, श्री.दिलीप गंगाधर थोरात, श्री.मनोज बन्सीलाल गांगवे.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. विशेष बाब म्हणुन मंजुरी देण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार प्राप्त नामांकीत खेळाडुंची दखल घेऊन सांगली व पुणे महानगरपालिकेने शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग-ब, क, व ड मध्ये थेट नोकरी दिली आहे त्याच धर्तीवर, औरंगाबाद शहरातील प्रतिभावंत, नावलौकिक मिळविलेल्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार थेट नोकरी देण्यासंबंधी महाराष्ट्र फेन्सींग असोसीएशनने मागणी केल्यानुसार, औरंगाबाद जिल्ह्यातील अर्ज केलेले शिवछत्रपती पुरस्कार विजेते सागर मगरे, दिनेश वंजारे, स्नेहा ढेपे या खेळाडूंना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार विशेष बाब म्हणुन महापालिकेत थेट नोकरी देण्याबाबत कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | सन २०१८-१९ च्या अर्थ संकल्पात मा.स्थायी समितीने शिफारस केलेली नवीन कामे अंतर्गत अ.क्र.१६ एससीआर झोन क्रमांक-०७ पान क्र.३१ वर प्रभाग क्र.९९ अंतर्गत विविध खुल्या जागा विकसीत करणे. र.रु.२५ लक्ष. | १. प्रभाग क्रमांक-९९ अंतर्गत विविध विकास कामे करणे. र.रु.२५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ **अनुमोदक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामांचे लेखाशिर्ष बदलाण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | सन २०१८-१९ च्या अर्थ संकल्पात मा.स्थायी समितीने शिफारस केलेली नवीन कामे अंतर्गत अ.क्र.१६ एससीआर झोन क्रमांक-०७ पान क्र.३१ वर प्रभाग क्र.९९ अंतर्गत विविध खुल्या जागा विकसीत करणे. र.रु.२५ लक्ष. | १. प्रभाग क्रमांक-९९ अंतर्गत विविध विकास कामे करणे. र.रु.२५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७६५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२३ मधील रहिवासी श्री.शेख फेरोज शेख जफर दि.१०.०२.२०१८ रोजी फाजलपुरा भागातील रुपमहल या इमारतीत मोकाट व पिसाळलेला कुत्रा घुसला होता. या कुत्र्यामुळे लहान लहान बालकांना काही होऊ नये म्हणुन हा युवक कुत्र्यास बाहेर हाकलून काढण्याचे प्रयत्न करीत असतांना या मोकाट कुत्र्याने श्री.फेरोज खानवर हल्ला केला होता. सदरील युवक हा पळत पळत टेरीसवर जाऊन दार बंद करण्याचा प्रयत्न करीत असतांना कुत्राही टेरीसवर घुसला व त्याच्यापासुन संरक्षण करताना या युवकाचा तोल जाऊन रुपमहल इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरून पडून दुर्दैवी मृत्यु झालेला आहे.

तरी सदरील कुटूंबीयास पत्नी, ३ मुली व २ मुले, आई असा परिवार असून घरातील कमावता माणुस गेल्याने या कुटूंबीयावर उपासमारीची वेळ आलेली आहे. या कुटूंबीयास सहानुभूतीपुर्वक विचार करून मनपातर्फे र.रु.०५ लक्षची आर्थिक मदत करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती खान सायरा बानो अजमल **अनुमोदक:-**श्री.जमीर अहेमद कादरी

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२३ मधील मयत श्री.शेख फेरोज शेख जफर यांचेवर मोकाट कुत्र्याने हल्ला केल्याने व संरक्षणासाठी टेरीस वर जाऊन दार बंद करून कुत्र्याला हाकलण्याच्या प्रयत्नात रुपमहल इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरून पडून मृत्यु झाल्याने त्यांच्या कुटूंबीयास मनपातर्फे र.रु.०५ लक्षची आर्थिक मदत करण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७६६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१११, प्रियदर्शनी, इंदिरानगर येथील नागरीकांच्या सोईसाठी खालील कामे करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे. करीता खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नाव | नविन कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|---|
| SCR Zone No.08, P.No.36, Sr.No.09 | प्रभाग क्र.१११ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. आर्थीक | १. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ७.०० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत विविध ठिकाणी | ३.०० लक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| | तरतुद र.रु.१० लक्ष. | पेव्हर ब्लॉक दुरुस्ती करणे व ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे | |

**सुचक:-**श्रीमती सलीमा बाबुभाई कुरैशी **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१११, प्रियदर्शनी इंदिरानगर येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नाव | नविन कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|---|
| SCR Zone No.08, P.No.36, Sr.No.09 | प्रभाग क्र.१११ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. आर्थीक तरतुद र.रु.१० लक्ष. | १. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. | ७.०० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक दुरुस्ती करणे व ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे | ३.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती सविता देविदास बांबर्डे प्राथमिक पदवीधर के.प्रा.शाळा बाजार वाहेगांव ता.बदनापूर,जि.जालना यांचा औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेत एकतर्फी आंतरजिल्हा बदलीचा प्रस्ताव आहे. सदर प्रस्तावास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा भरती नियम १९६७ चे नियम ६(८) अन्वये संबंधीत शिक्षिकेस जिल्हा परिषदेने मान्यता दिलेली आहे.

श्रीमती सविता देविदास बांबर्डे यांनी औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेत बदली करणे बाबत विनंती केलेली आहे. तरी आंतरजिल्हा बदली नियमांतर्गत त्यांची बदली महानगरपालिकेच्या शाळेत करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सविता देविदास बांबर्डे प्राथमिक पदवीधर के.प्रा.शाळा बाजार वाहेगांव ता.बदनापूर,जि.जालना यांची आंतरजिल्हा बदली नियमांतर्गत त्यांची बदली औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८९, चिलकठाणा परिसरातील दलित वसाहतींमध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणेसाठी, ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

| अ.क्र. | कामाचे नाव | अपेक्षित निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा परिसरातील दलित वसाहतीतील बौध्दवाडा, अण्णाभाऊ साठेनगर, निर्मलनगर, ऋषिकेशनगर या परिसरातील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.३०.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा परिसरातील दलित वसाहतीतील बौध्दवाडा, अण्णाभाऊ साठेनगर, निर्मलनगर, ऋषिकेशनगर या परिसरात ड्रेनेज लाईन | रु.३०.०० लक्ष. |

| | | |
|---|---|---|
| | टाकणे. | |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-**श्री.गोकुलसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८९, चिलकठाणा परिसरातील दलित वसाहतींमध्ये खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | अपेक्षित निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८९, चिलकठाणा परिसरातील दलित वसाहतीतील बौध्दवाडा, अण्णाभाऊ साठेनगर, निर्मलनगर, ऋषिकेशनगर या परिसरातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. | रु.३०.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.८९, चिलकठाणा परिसरातील दलित वसाहतीतील बौध्दवाडा, अण्णाभाऊ साठेनगर, निर्मलनगर, ऋषिकेशनगर या परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.३०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील चिकलठाणा येथील प्रस्तावित कचरा प्रक्रिया केंद्राच्या उत्तर बाजुने बायपास रस्त्याला येऊन मिळणाऱ्या चिकलठाणा जिल्हा सामान्य रुग्णालय ते सावंगी बायपास ह्या कच्च्या स्वरुपातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी अंदाजपत्रक रु.२.५० कोटीचे तयार केलेले आहे. सदर अंदाजपत्रकात रस्त्याची लांबी साधारणपणे २.५ किमी व रुंदी ५.०० मीटर असून रस्त्यासाठी मजबुतीकरण व डांबरीकरण बाबींचा समावेश करून कामाचे सा.बां.वि.दरसुची २०१८-१९ नुसार अंदाजपत्रकानुसार सदरील कामासाठी अपेक्षीत खर्च रु.२.५० कोटी आहे. करीता सदरील कामासाठी अंदाजपत्रकीय तरतुद उपलब्ध करून देणेस्तव आणि अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :सदरील कामासाठी घनकचरा व्यवस्थापन खर्च (शासन अनुदान) या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुद उपलब्ध करून देण्यात येईल. निधी उपलब्ध झाला नाही तर मनपा फंडातून सदरील काम करण्यात येईल. विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील चिकलठाणा येथील प्रस्तावित कचरा प्रक्रिया केंद्राच्या उत्तर बाजुने बायपास रस्त्याला येऊन मिळणाऱ्या चिकलठाणा जिल्हा सामान्य रुग्णालय ते सावंगी बायपास ह्या कच्च्या स्वरुपातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी रु.२.५० कोटीच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील कामासाठी घनकचरा व्यवस्थापन खर्च (शासन अनुदान) या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुद उपलब्ध करून देण्यात येईल. निधी उपलब्ध झाला नाही तर मनपा फंडातून सदरील काम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-१०, सिडको, टी.व्ही.सेंटर येथे खेळाचे मैदानासाठी (PG-४) जागा राखीव असून या खेळाच्या मैदानाच्या लगत रस्त्याच्या उत्तर व पुर्व बाजूने एन-५ सिडको येथील व्यापारी संकुलाच्या धर्तीवर ५० दुकाने बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या कामाअंतर्गत आतापर्यंत ४६ दुकानांचे RCC बांधकाम पुर्ण करण्यात आले असून या दुकानास शटर्स

लावण्यात आले आहे. तसेच या कामाअंतर्गत ४ दुकानांचे जोत्यापर्यंतचे बांधकाम पुर्ण करून RCC Coloumn उभे करण्यात आले आहेत. आतापर्यंत या कामावर रु.३,२८,८३,४८३/- एवढा खर्च ५ व दरम्यान देयकापर्यंत करण्यात आला आहे. तसेच या कामाअंतर्गत अंर्तभागातून स्टेडीयमच्या पायऱ्या कॉंक्रीटमध्ये तयार करण्यात आल्या आहेत.

पुर्व गणकपत्रानुसार या कामाचे अंदाजपत्रक रु.३,७७,४४,०००/- एवढी होती. त्यामध्ये या कामावर नेमण्यात आलेले वास्तू विशारद यांचे सेवाशुल्क व या स्टेडीयमच्या शॉपींग सेंटर मध्ये दुकानाच्या विद्युतीकरणाची तरतुदीचा समावेश आहे. हे काम करीत असतांना परिस्थिती नुसार काम करून घेण्यात येत असल्याने तसे करणे अपरिहार्य करणे आवश्यक असल्याने तसे काम करून घेण्यात आले आहे. त्यामुळे या कामाच्या अंदाजपत्रकातील विविध बाबीमध्ये २५% पेक्षा अधिक वाढ होत आहे. या कामाचे मुळ अंदाजपत्रक हे सा.बां.विभागाच्या सन २०१४-१५ च्या दरसुचीवर आधारीत होते. कामात होत असलेल्या वाढीचा निश्चित अंदाज घेऊन या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून ते विद्युतीकरण खर्चासह रु.५,०१,९६,१८१/- एवढे होत आहे. आतापर्यंत या कामाअंतर्गत वरील परिच्छेदात नमुद प्रमाणे काम करण्यात आले आहे. या ठिकाणी काम करीत असतांना अस्तित्वातील रस्त्याची उंचीच्या प्रमाणात स्टेडियम शॉपींग कॉम्प्लेक्सचे काम करणे आवश्यक असल्याने जोत्याची उंची वाढवून त्यानुसार काम करण्यात आले आहे. स्थळावरील परिस्थीतमुळे स्टेडियमच्या आतील बाजुस असलेल्या पायऱ्याखाली उत्तर बाजुस पुर्व-पश्चिम असे तीन मोठे हॉल भुमजल्यामध्ये निर्माण झाले आहेत. सदरचे हॉलही महानगरपालिकेची विनासायास संपत्ती निर्माण झाली असून याचा फायदा भविष्यात या मैदानावर खेळावयास येणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेच्या दरम्यान राहण्यासाठी, चेंजिंग रुम वापरण्यासाठी व इतर मनपा उपयोगी कामासाठी करता येऊ शकेल. या शिवाय मिळालेल्या उंचीचा फायदा घेत आतील भागामध्ये स्टेडियमची भविष्यातील गरज विचारात घेऊन RCC मध्ये पाण्याचा हौद तयार करण्यात आला आहे. या ठिकाणी काम करीत असतांना या स्टेडियमच्या उत्तर व पुर्व बाजुने महावितरणाची लघु उच्चदाब वाहिनी आल्याने व त्या कारणाने समोरील सामासिक अंतरामध्ये वाढ करून घ्यावी लागली. या ही कारणाने कामामध्ये अनुषंगिक वाढ झाली आहे. सदरचा प्रकल्प हा या वाणिज्य संकुलातील दुकाने पुढील ३० वर्षासाठी लिज डीड द्वारे देण्यात येणार असून याच्या जाहीर लिलाव बोलीतून जमा झालेल्या निधीतून स्वतंत्र बँक खात्याद्वारे करण्यात येत आहे. त्यामुळे या कामाचा कोणताही वाढीव प्रत्यक्ष आर्थिक भार महानगरपालिकेवर पडत नसून कामावर होणारा खर्च वगळता मोठी रक्कम या पुढील विकास कामासाठी महानगरपालिकेला मिळणार आहे.

या कामाचे स्थापत्य विषयक कामाचे सुधारीत अंदाजपत्रक, विद्युत विषयक कामाचा खर्च व वास्तू विशारद यांचे शुल्क यासह एकूण खर्च रु.५,०१,९६,१८१/- एवढा येत असून कामाची निविदा अ.प.दरापेक्षा ७.२९% कमी दराची असल्याने प्रत्यक्षात या कामावर रु.४,६७,३६,६९८/- एवढाच खर्च पडणार आहे. या संकुलातील संपुर्ण दुकाने विक्रीतून एकूण उत्पन्न रु.१२.७५ कोटी एवढे प्राप्त होणार असून बहुतांश गाळेधारकांनी आवश्यक रक्कमेचा भरणा महानगरपालिकेकडे केला आहे.

सदर वाढीव कामाबात या कामाचे कंत्राटदार मे.एम.ए.सिद्यीकी यांना विचारणा करण्यात आली असता त्यांनी या कामामध्ये होणाऱ्या वाढीचे काम या कामाच्या मुळ मंजुर दरसुची सन २०१४-१५ च्या आधारे तयार करण्यात आलेले सुधारीत अंदाजपत्रकावर मुळ मंजुर निविदा दराने म्हणजेच अ.प.दरापेक्षा ७.२९% कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. या कामाच्या सुधारीत अंदाजपत्रक रु.५,०१,९६,१८१/- यास प्रशासकीय स्तरावरील मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरील प्रकल्प वाढीव कामासह ३१ मार्च २०१९ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

करीता या कामाच्या सुधारीत अंदाजपत्रक रु.५,०१,९६,१८१/- व सदरचे कामाचे मुळ कंत्राटदार मे.एम.ए.सिद्यीकी यांचेकडून निविदा भरलेल्या दराने म्हणजेच अं.प.दरापेक्षा ७.२९% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-१०, सिडको, टी.व्ही.सेंटर येथे खेळाचे मैदानासाठी (PG-४) जागा राखीव असून या खेळाच्या मैदानाच्या लगत रस्त्याच्या उत्तर व पुर्व बाजूने एन-५ सिडको येथील व्यापारी संकुलाच्या धर्तीवर ५० दुकाने बांधण्यासाठीच्या कामाच्या मुळ अंदाजपत्रकातील विविध बाबींमध्ये स्थळावरील परिस्थिती नुसार बदल होत असल्याने २५% पेक्षा अधिकची वाढ होत आहे. असे असले तरी यामुळे भुमजल्यामध्ये पुर्व पश्चिम असे तीन मोठे हॉल, तळमजल्यामध्ये पाण्याचा हौद इत्यादी अधिकची संपत्ती निर्माण होत आहे. त्यामुळे या कामाच्या खर्चात वाढ होत असून सदरचा खर्च या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक, विद्युत विषयक कामाचा खर्च व या कामी नियुक्त वास्तुविशारद यांचे सुधारीत सेवा शुल्क यासह एकुण अंदाजपत्रक रु.५,०१,९६,१८१/- एवढा होत आहे. सदरचे वाढीव काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे.एम.ए.सिद्यीकी यांचेकडून मुळ मंजुर निविदा दर म्हणजेच अ.प.दरापेक्षा ७.२९% कमी दराने करून घेण्यास यासाठीचा खर्च सदर कामी उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्यात दुकानांच्या जाहीर लिलावातून संकीलत होणाऱ्या रक्कमेतून करण्यास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा दि.१०.०५.२०१६ मधील विषय क्र.४३३ नुसार मंजूर ठरावाप्रमाणे शहरातील रस्ते चांगल्या प्रतीचे कॉंक्रीटद्वारे अथवा डांबरीकरणाद्वारे पुर्नबांधणी करणे करीता ढोबळ मानाने र.रु.१५० कोटीच्या खर्चास मान्यता झाली आहे.

सदरील कामे डिफर्ड पेमेंट तत्वावर महानगरपालिकेच्या स्वत:च्या निधीतून हाती घेणेस व डिफर्ड पेमेंटचा कालावधी ०३ वर्षाचा ठेवण्यात यावा. सदरील कामांच्या योग्य समन्वय रहावा आणि कामे दर्जेदार व्हावीत या करीता संपुर्ण प्रकल्प किंमत र.रु.१५० कोटीची एकच एकत्रित निविदा करून कामे करून घ्यावी. तसेच सभेने मान्यता दिलेल्या रस्त्याच्या यादी मधील कामे करण्यासाठी शासनाकडून निधी/अनुदान प्राप्त करणेसाठी प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव शासनाकडे सादर करून निधी प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावेत. शासन अनुदान/निधी प्राप्त झाल्यानंतर त्यातून सदर कामांचा खर्च भागविणे उक्त ठरावात मंजुरी आहे.

औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोईसुविधांचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत शासनाकडून अनुदान मागणी करण्यात आल्यानूसार र.रु.१५० कोटी (रु.एकशे पन्नास कोटी) पैकी मंजुर रु.१०० कोटी अनुदानामधून रस्त्यांच्या विकास कामांना सुधारित यादीस मा.सर्वसाधारण सभा (का.प.क्र.४४) दि.२०.०७.२०१७ रोजी विषय क्र.११८६ यास मंजुरी प्राप्त आहे. यामध्ये नमुद तळटिपनुसार सदर यादीतील रस्त्यांचा एकूण ५० कामांपैकी ज्या रस्त्यांच्या कामास शासन अनुदान मिळणार नाही. अशा रस्त्यांची कामे डिफर्ड पेमेंट तत्वावरील रस्त्यांच्या कामांसाठी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात यावी. असेही मंजुर ठरावात नमुद आहे.

तसेच दि.२०.०७.२०१७ रोजी (का.प.क्र.४४) नुसार संपन्न झालेल्या या सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्तावित विषय क्र.११९२/२ मंजुर ठरावानुसार औरंगाबाद शहरातील रस्ते विकसीत करण्यासाठी प्रस्तावामधील नमुद रस्त्यांच्या र.रु.५० कोटी डिफर्ड पेमेंट धर्तीवर विकसीत करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या यादीत समावेश केलेला आहे.

उक्त मान्यतेनुसार डिफर्ड पेमेंट धर्तीवर महानगरपालिका फंडातून औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांच्या व्हाईट टॉपींग कॉँक्रीट कामांचे अंदाजपत्रक राज्य दरसुची २०१७-२०१८ नुसार पॅकेज डी-१ करीता र.रु.३०,२७,३५,८२४/- व पॅकेज डी-२ करीता र.रु.२७,८३,४८,६४९/- चे तयार करून यास शासन निर्णयानुसार बी-२ स्वरुपात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असता, पॅकेज डी-१ निविदेस पहिल्या वेळी प्रतिसाद मिळाला व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.५० टक्के जास्त दराने प्राप्त झाली. तथापि, सदर दर जास्तीचे असल्याने एल-१ निविदाधारक यांना दर वाटाघाटी करीता बोलाविले असता, त्यांनी यामध्ये १ टक्के दर कपात व १२ टक्के जी.एस.टी.ची मागणी केली. हे मागणी सुध्दा शासन निर्णयानुसार संयुक्तीक नसल्यामुळे संबंधीत एल-१ निविदाधारक यांची निविदा नाकारण्यात आली आहे.

पॅकेज डी-२ करीता निविदा मागविल्या असता, पहिल्यावेळी फक्त ०२ निविदास्पर्धक आल्यामुळे व नियमानुसार स्पर्धात्मक ०३ निविदा प्राप्त नसल्यामुळे दुसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या व यास निरंक प्रतिसाद मिळाल्यामुळे पुन्हा तिसऱ्यांदा निविदा मागविली असता यासही निरंक प्रतिसाद मिळाला.

दरम्यान दि.१९.०९.२०१८ रोजी नव्याने राज्य दरसुची लागू झाल्याने व बी-२ स्वरुपात निविदा या बाबनिहाय दरानुसार मागविण्यात आल्यामुळे येणाऱ्या निविदाधारकांचे भरणा दर हे अवाजवी, असमतोल व वस्तुनिष्ठ प्राप्त होत नाहीत. त्यामुळे बी-२ निविदा प्रक्रिया ही मुल्यांकनास क्लिष्ठ असून यामध्ये कालापव्य होतो. त्यामुळे प्रशासनाने पुन्हा राज्य दरसुची सन २०१८-२०१९ नुसार उक्त नमुद पॅकेज डी-१ व पॅकेज डी-२ चे अंदाजपत्रक नव्याने तयार केले असून बी-२ ऐवजी बी-१ स्वरुपात निविदा मागविण्याचे ठरविले आहे. यानुसार निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करण्यात आला आहे.

करीता, यापुर्वी उक्त नमुद प्रमाणे मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.११८६, ४३३, ११९२/२ नुसार मंजुर ठरावास अधिन राहून औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांचे व्हाईट टॉपींगद्वारे कॉँक्रीट करणे या कामाचे राज्य दरसुची सन २०१८-२०१९ नुसार तयार करण्यात आलेले डी-१ पॅकेजचे अंदाजपत्रक र.रु.३६,३४,७०,७२२/- व डी-२ पॅकेज अंदाजपत्रक र.रु.३४,१५,५०,८२९/- असे एकूण र.रु.७०,५०,२१,५५१/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व यास अधिन राहून या कामाची निविदा बी-२ ऐवजी बी-१ स्वरुपात काढण्याच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.११८६, ४३३, ११९२/२ नुसार मंजुर ठरावास अधिन राहून औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांचे व्हाईट टॉपींगद्वारे कॉँक्रीट करणे या कामाचे राज्य दरसुची सन २०१८-२०१९ नुसार तयार करण्यात आलेले डी-१ पॅकेजचे अंदाजपत्रक र.रु.३६,३४,७०,७२२/- व डी-२ पॅकेज अंदाजपत्रक र.रु.३४,१५,५०,८२९/- असे एकूण र.रु.७०,५०,२१,५५१/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व यास अधिन राहून या कामाची निविदा बी-२ ऐवजी बी-१ स्वरुपात काढण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७७२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरास जायकवाडी जलाशयातून ५६ द.ल.लि. व १०० द.ल.लि. या दोन मुख्य योजनांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. दोन्ही योजना पुर्ण क्षमतेने चालवून शहरास दररोज १२० ते १२५ द.ल.लि.पाणी उपलब्ध होत आहे. शहराची आजची लोकसंख्या अंदाजे रु.१५ लक्ष असून निकषाप्रमाणे १३५ लिटर प्रतिदिन प्रती माणसी शहराची पाण्याची निव्वळ गरज २०३ द.ल.लि.प्रतिदिन इतकी आहे. यासाठी जायकवाडी उद्‌भव येथे प्रतिदिन २४० द.ल.लि.इतका पाणी उपसा करणे आवश्यक आहे. मागणी व पुरवठा यामध्ये असलेली तफावत पाहता

शहरास सन २०१२ पासून दोन दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत होता. आज रोजी शहरातील काही भागाला तीन दिवसाआड तर काही भागाला चार ते पाच दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे. कारण आवश्यक क्षमतेची पाणीपुरवठा योजना महानगरपालिकेकडे नसल्यामुळे निकषानुसार १३५ लि.प्रती दरडोई प्रतिदिन पाणी पुरवठा करणे शक्य नाही

शहरातील वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेसाठी महानगरपालिकेने तज्ञ सल्लागार यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांच्या सल्ल्याने पाणीपुरवठा योजनेमध्ये सुधारणा करणेसाठी उपाययोजना राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंतच्या पहिल्या टप्प्यामध्ये मुख्य जलवाहिनीवरील गळत्या दुरूस्त करणे व जलशुध्दीकरण केंद्र येथे रि-सायकल युनीट मध्ये सुधारणा करून दररोज साधारणत: ४ द.ल.लि. पाणी वाढलेले आहे. दुसऱ्या टप्प्याने शहरातील वितरण व्यवस्थेचा अभ्यास सुरू आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेची समांतर जलवाहिनी योजना संचलन व देखभाल दुरूस्ती आणि योजनेची नवीन कामे करण्यासाठी कन्सेशनर यांना दिनांक ०१.०९.२०१४ रोजी हस्तांतरीत करण्यात आली होती. तथापि, कन्सेशनर यांनी कामाची गती समाधानकारक न ठेवल्याने व काही इतर कारणांनी हा प्रकल्प महानगरपालिकेने दिनांक ०१.१०.२०१६ रोजी रद्द केलेला आहे. तेव्हापासून महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेचे संचलन व देखभाल दुरूस्ती करीत आहे. कन्सेशनर यांनी त्यांच्या दोन वर्षाच्या कालावधीत शहरातील वितरण व्यवस्थेत साधारणत: ९० कि.मी.लांबीच्या जलवाहिन्या टाकल्या आहेत. महानगरपालिकेने योजना ताब्यात घेतल्यानंतर यातील बहुतांश भागातील जलवाहिन्या टाकल्या आहेत. महानगरपालिकेने योजना ताब्यात घेतल्यानंतर यातील बहुतांश भागातील जलवाहिन्या कार्यान्वीत करण्यात आल्या असून त्यातून पाणीपुरवठा सुरू झाल्याने शहरास पाणी कमी पडत आहे. या शिवाय नागरीकांकडून वेगवेगळ्या वार्डामध्ये नो-नेटवर्क एरिया मध्ये जलवाहिन्या टाकून कार्यान्वीत करणे बाबत मागणी होत आहे. उपलब्ध असलेल्या पाण्यातून नवीन जलवाहिन्याद्वारे पाणी पुरवठा करावा लागत असल्याने प्रत्येक टप्प्यामध्ये शेवटच्या घरांना पाणी कमी किंवा मिळत नसल्याच्या तक्रारीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे ज्या नागरीकांना सध्या योग्य दाबाने पाणी पुरवठा होत आहे, त्यांचे पाणी कमी होऊ शकते.

जो पर्यंत शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची कामे पुर्ण होऊन शहरात वाढीव पाणी उपलब्ध होत नाही तो पर्यंत शहर व सिडको परिसरातील नो नेटवर्क एरिया मध्ये नवीन जलवाहिन्या टाकल्यास त्याचा पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेवर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता आहे.

करीता, मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ सादर.

मा.महापौर :विषय नामंजुर करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो.

**<u>विषय क्रमांक ७७३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारचे व्यवसाय, उद्योगधंदे चालु असून या आस्थापनांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३७७, ३७८ व ३८६ प्रमाणे महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे. तसेच अशा आस्थापनाधारकांकडून परवाना शुल्क वसुल करणे अत्यावश्यक आहे.

तरी या बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७८ अन्वये महानगरपालिका हद्दीत व्यवसाय करणाऱ्या आस्थानांना व्यवसाय सुरू करून व्यवसाय चालु ठेवण्यासाठी परवाना पध्दत सुरू करण्यास मान्यतेसाठी सादर. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

१९४९ चे कलम ३८६ (२) अन्वये महानगरपालिकेच्या मान्यतेने परवाना शुल्क/फी निर्धारित करण्याची तरतुद आहे. तरी परवाना शुल्क / फी निर्धारित करणे बाबत सभेला निर्णय घेता येईल.

या बाबत औरंगाबाद महानगरपालिकेने खालील प्रमाणे आस्थापनाचे क्षेत्र पातळीवर परवाना शुल्क आकारणी करता येईल. शासनातर्फे विविध क्षेत्रासाठी सिटी सर्व्हे नंबर नुसार दिनांक ११.११.२०१४ रोजीच्या सर्वसाधारण सभेसमोर प्रशासकीय प्रस्ताव ठराव क्रमांक-६४३ परवाना शुल्क वसुलीबाबत ठेवण्यात आला होता. परंतु सदर प्रस्ताव हा क्षेत्रफळनिहाय जटील प्रक्रिया असल्याने मीरा भाईंदर महानगरपालिकेने केलेले दर निश्चिती केलेल्या परवाना शुल्क अंमलबजावणीच्या धर्तीच्या खालील तक्त्याप्रमाणे प्रत्येकवर्षी वर्गवारी निश्चित करून आस्थापनेसाठी आकारणी करण्यात आलेली आहे व उर्वरित मिळकती करीता प्रत्येक वर्षी वर्गवारी निश्चित करून आस्थापनेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने केलेल्या दर निश्चितीनुसार खालील तक्त्यात

| अ.क्र. | नाहरकत दाखल्याचा विषय | नविन दाखला फी | नुतनीकरण फी |
|---|---|---|---|
| १ | विद्युत पुरवठा दाखला (कारखाने करीता) | ७०००/- | ३०००/- |
| २ | व्यवसाय चालु करणेस दाखला (कारखाना, फुड प्रोसेसिंग, मिठाई व इतर बेकरी)<br>५०० चौ.फुट ते २००० चौ.फुट<br>२००१ चौ.फुट पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या आस्थाना | ५५००/-<br>११,०००/- | २५००/-<br>५०००/- |
| ३ | टेलिफोन बुथ करीता ना हरकत दाखला (रस्ता सोडुन) | १००/- | १००/- |
| ४ | चुना तयार करणे व प्लॉस्टर ऑफ पॅरिस पासुन वस्तु तयार करणे. | १०००/- | ५००/- |
| ५ | चर्मकार नाहरकत दाखला | १००/- | १००/- |
| ६ | बार ॲण्ड रेस्टॉरंट दाखल<br>५००० चौ.फुट पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या आस्थापना | १५०००/-<br>३०,०००/- | ७५००/-<br>१५,०००/- |
| ७ | रूग्णालय सुरू करणेस दाखला (५ खाटे) | ५५००/- | २५००/- |
| ८ | उपहार गृहे / चायनिज सेंटर | ५०००/- | २५००/- |
| ९ | खानावळ | १५००/- | ५००/- |
| १० | ऑईल मिल | ५५००/- | २५००/- |
| ११ | लॉजिंग / बोर्डींग | ३०,०००/- | १५,०००/- |
| १२ | सौदर्य प्रसाधने बनविणे / ब्युटी पार्लर / सलुन<br>घरगुती पार्लर | २०००/-<br>१०००/- | १०००/-<br>५००/- |
| १३ | शितपेय गृहे | १०००/- | २५०/- |
| १४ | केटरिंग केटर्स | ३०००/- | १५००/- |
| १५ | रेडिमेंट स्टोअर्स / बुटचप्पल व्यवसाय | २०००/- | १०००/- |
| १६ | मेडीकल स्टोअर्स | ५५००/- | २५००/- |
| १७ | इलेक्ट्रीक हार्डवेअर / स्पेअरपार्ट, इलेक्ट्रीक वस्तुंची जुळवणी व उत्पादन | २०००/- | १०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | डांबर व डांबर पासुन वस्तु तयार करणे | ५०००/- | २५००/- |
| १९ | फोटो स्टुडिओ / व्हिडीओ शुटींग | २०००/- | ७५०/- |
| २० | बिल्डींग मटेरियल सप्लायर्स | ५०००/- | २५००/- |
| २१ | मटन / चिकन / बीफ शॉप | २५००/- | १२५०/- |
| २२ | १० किंवा अधिक इतकी गुरे ठेवण्याचा तबेला | ३०००/- | १२५०/- |
| २३ | २१ ते ३५ इतकी गुरे ठेवण्याचा तबेला | ५०००/- | २०००/- |
| २४ | ३६ ते ५० इतकी गुरे ठेवण्याचा तबेला | ७५००/- | ३०००/- |
| २५ | ५१ ते १०० इतकी गुरे ठेवण्याचा तबेला | ७५००/- | ३५००/- |
| २६ | १०० पेक्षा अधिक गुरे ठेवण्याचा तबेला | १०,०००/- | ५०००/- |
| २७<br>अ. | भांडी कारखाने (१० पेक्षा जास्त कर्मचारी)<br>भांडी पॉलिश (बफींग) करण्याचे कारखाने | ५०००/-<br>२५००/- | २५००/-<br>१२५०/- |
| २८ | इतर लहान कारखाने (१० पेक्षा कमी कर्मचारी) | ३०००/- | १५००/- |
| २९<br>अ | इलेक्ट्रॉनिक वस्तु शोरूम<br>२००० चौ.फुटा पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे शोरूम | १०,०००/-<br>२०,०००/- | ५०००/-<br>१०,०००/- |
| ३०<br>अ | वाहनांचे शोरूम<br>२००० चौ.फुटा पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे शोरूम | १०,०००/-<br>२०,०००/- | ५०००/-<br>१०,०००/- |
| ३१ | सोने / चांदीचे शोरूम<br>२००० चौ.फुटा पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे शोरूम | १०,०००/-<br>२०,०००/- | ५०००/-<br>१०,०००/- |
| ३२ | फोटो स्टुडिओ / व्हिडीओ शुटींग | १५००/- | ७५०/- |
| ३३ | पान बिडी शॉप | ५००/- | २५०/- |
| ३४ | पिठाची चक्की / मसाला चक्की, मसाल्याचे पदार्थ तयार करणे व पॅकींग करणे. | ३०००/- | १०००/- |
| ३५ | इतर सर्व साधारण दाखले | १०००/- | ५००/- |
| ३६ | विधवा / अपंग चालवत असलेल्या व शासनाची सबसीडी मिळत असलेल्या आस्थापना | ५००/- | २५०/- |
| ३७ | व्यवसाय चालु करणेस दाखला<br>१.दुध डेअरी | २०००/- | १०००/- |
| ३८ | बुथ करीता परवानगी<br>१.दुध व दुग्धजन्य पदार्थाची विक्री, २.कम्युनिकेशन सेंटर (स्टॉल वगळुन)<br>३.इतर वस्तुचे स्टॉल | ५००/-<br>२०००/-<br>१०००/- | ३००/-<br>७५०/-<br>५००/- |
| ३९ | हॉटेल<br>१.५०० चौ.मी. चटाई क्षेत्रापर्यत<br>२. ५०१ ते २००० चौ.मी. पर्यंत चटाई क्षेत्रापर्यत<br>२००१ चौ.मी. पेक्षा जास्त | ३०००/-<br>५०००/-<br>७०००/- | १५००/-<br>२५००/-<br>३०००/- |
| ४० | सलुन / ब्युटी पार्लर,<br>१.नॉन एसी | १५००/-<br>२५००/- | ५००/-<br>१०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | २.एसी | | |
| ४१ | रेडीमेंट कपडयाचे दुकाने<br>१.५०० चौ.मी. चटाई क्षेत्रा करीता<br>२.५०१ ते पुढील चौ.मी. पर्यंत चटाई क्षेत्रापर्यत | २०००/-<br>२५००/- | १०००/-<br>१५००/- |
| ४२ | औषध होलसेल विक्रेते | २०००/- | १०००/- |
| ४३ | गॅरेज<br>१.१०० ते ५०० चौ.फुट चटई क्षेत्रा करीता<br>२.५०१ ते १००० चौ.फुट चटई क्षेत्रा पासुन पुढील<br>३.१००० चौ.फुट चटई क्षेत्रा पासुन पुढील | ३०००/-<br>४०००/-<br>८०००/- | १५००/-<br>२०००/-<br>४०००/- |
| ४४ | विविध प्रकारच्या लाध्या साठविणे | ५०००/- | २५००/- |
| ४५ | सोने, चांदी तयार करण्याचे वर्कशॉप | ५०००/- | २५००/- |
| ४६ | किराणा सामान विक्री<br>१.किरकोळ विक्री<br>२.घाऊक विक्री | २०००/-<br>३०००/- | १०००/-<br>१५००/- |
| ४७ | कापड विक्री<br>१.२५० चौ.फुट करीता<br>२.२५१ व पुढील चौ.फुट करीता<br>३.मिल्स् शोरूम | २०००/-<br>४०००/-<br>७०००/- | १०००/-<br>२०००/-<br>२५००/- |
| ४८ | टेलरिंग काम | २०००/- | १०००/- |
| ४९ | क्लब हाऊस | ३०,०००/- | १५,०००/- |
| ५० | लिकर शॉप<br>१.वाईन शॉप<br>२.बिअर विक्री | १०,०००/-<br>४०००/- | ५०००/-<br>२०००/- |
| ५१ | व्हिडीओ गेम | ५०००/- | २४००/- |
| ५२ | पेट्रोल पंप | २०,०००/- | ५०००/- |
| ५३ | बेकरी<br>१.बेकरी उत्पादन तयार करणे<br>२.बेकरी उत्पादन विक्री करणे | ५०००/-<br>२५००/- | २५००/-<br>१०००/- |
| ५४ | खाजगी क्लासेस<br>१.२५० चौ.फुट करीता<br>२.२५१ व पुढील चौ.फुट करीता | १५००/-<br>३०००/- | १०००/-<br>१५००/- |
| ५५ | ऑफीस<br>इस्टेड एजंट, वकील, वास्तु विशारद, पत संस्था, विकासक<br>५०० चौ.फुट<br>५०१ ते १००० चौ.फुट<br>१००१ ते २००० चौ.फुट<br>२००१ चौ.फुट पेक्षा जास्त | २०००/-<br>५०००/-<br>४०००/-<br>७५००/- | १०००/-<br>२५००/-<br>२०००/-<br>३०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५६ | स्टेशनरी | २०००/- | १०००/- |
| ५७ | केबल ऑपरेटर | १०,०००/- | ५०००/- |
| ५८ | ठेकेदार आस्थापना | ५०००/- | २५००/- |
| ५९ | प्रिंटीग प्रेस<br>१.२५० चौ.फुट चटई क्षेत्रा करीता<br>२.२५१ पासुन पुढील चटई क्षेत्रा करीता | २५००/-<br>३०००/- | १२५०/-<br>१५००/- |
| ६० | समारंभ / कार्यक्रम हॉल / लॉन<br>अ.५००० पेक्षा कमी<br>ब.५००१ चौ.फुट पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या आस्थापना | ७५००/-<br>१५,०००/- | ५०००/-<br>१०,०००/- |
| ६१ | मोबाईल गॅलरी | ३०००/- | १५००/- |
| ६२ | शेअर व्यवसाय | ५०००/- | २०००/- |
| ६३ | बँकींग आस्थापना | ५०००/- | २५००/- |
| ६४ | मोटर ड्रायविंग ट्रेनिंग स्कुल | ३०००/- | १५००/- |
| ६५ | सिजनल व्यवसाय | २०००/- | १०००/- |
| ६६ | फर्निचर विक्री<br>१.५०० चौ.फुट चटई क्षेत्राकरीता<br>२.५०१ पासुन पुढील चौ.फुट चटई क्षेत्राकरीता | ५०००/-<br>१०,०००/- | २५००/-<br>५०००/- |
| ६७ | आईस्क्रीम पार्लर | २५००/- | ७५०/- |
| ६८ | सिनेमागृह<br>१.सर्वसाधारण सिनेमागृह<br>२.मल्टीप्लेक्स सिनेमागृह | १०,०००/-<br>३०,०००/- | ५०००/-<br>१५,०००/- |
| ६९ | इंटरनेट सर्व्हिस | ५०००/- | २५००/- |
| ७० | सायबर कॅफे | ५०००/- | २५००/- |
| ७१ | कॉम्प्युटर क्लासेस | ५०००/- | २५००/- |
| ७२ | ऑनलाईन लॉटरी सेंटर | ५०००/- | २५००/- |
| ७३ | व्हिडीओ थिएटर | ५०००/- | २५००/- |
| ७४ | भंगार विक्री दुकाने | ३०००/- | १५००/- |
| ७५ | सर्व प्रकारच्या धांतुचे औत | १०००/- | ५००/- |
| ७६ | सुत कापड रंगविण्याचा व्यवसाय | ५००/- | २५०/- |
| ७७ | वेस्त कपडयापासुन वस्तु तयार करणे | ५००/- | २५०/- |
| ७८ | विटा व कौले तयार करणे | ५०००/- | २५००/- |
| ७९ | कोळसा व दगडी कोळसा व त्याची विक्री, जळाऊ लाकुड व वखार | ५०००/- | २५००/- |
| ८० | सिमेंट व सिमेंटच्या वस्तु तयार करणे व विक्री करणे | ३०००/- | १५००/- |
| ८१ | काडयाच्या पेटी, अगरबत्ती तयार करणे व विक्री करणे. | ५००/- | २५०/- |
| ८२ | कागद व कागदापासुन वस्तु तयार करणे, त्याचा | ३०००/- | १५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | साठा करणे, स्टेशनरी विक्री | | |
| ८३ | विडी, विडीचे पाने, पतकीर, सिगारेट साठा व उत्पादन विक्री | १०००/- | ५००/- |
| ८४ | साबन, द्रव्यरूप, साबन धुतण्याची पावडर साठी उत्पादन व विक्री | ५००/- | २५०/- |
| ८५ | कापुस साफ करणे, कापसापासुन वस्तुंची निर्मिती करणे<br>निवासी जागेत | ५००/- | २५०/- |
| ८६ | कुंकु तयार करणे | २५०/- | १५०/- |
| ८७ | जर्मनच्या वस्तु तयार करणे, त्याचे उत्पादन विक्री व त्यापासुन उत्पादित वस्तुंची निर्मिती व विक्री | २५०/- | १५०/- |
| ८८ | अल्युमिनियम जर्मन सिलव्हर, हिंडोलियम करणे, वहया पुस्तके बाईडिंग, वर्क लिफाफे, पत्रिका, गिफ्ट व प्रेझेंटेशन आर्टीकल्स् | ५००/- | २५०/- |
| ८९ | वर्तमान पत्र मुद्रण व प्रकाशन | २००/- | १००/- |
| ९० | चामडे व चामडयांच्या वस्तु तयार करणे, साठा व विक्री | ५००/- | २५०/- |
| ९१ | रबराच्या व प्लास्टीकच्या वस्तु तयार करणे व त्याची विक्री करणे. | १०००/- | ५००/- |
| ९२ | नॉन मेटॅलिक खनिज, वस्तु धांतुचे फर्निचर, स्थिर वस्तु यांची निर्मिती साठा व विक्री | १०००/- | ५००/- |
| ९३ | धातुंना मुलामा देणे, चकाकी आणणे, धार करणे, वेल्डींग ॲण्ड फेब्रिकेशन, लोखंडी खिडक्या जाळया तयार करणे | ३०००/- | १५००/- |
| ९४ | विजेचे उपकरणे, रेडीओ, टी.व्ही, फ्रीज, पंखे, घडयाळ इत्यादीची दुरूस्ती व विक्री | १५००/- | १०००/- |
| ९५ | वाहतुकीचे साधने उदा.मालगाडी, हातगाडी इत्यादी वस्तुंची निर्मीती विक्री | १५००/- | १०००/- |
| ९६ | मोटारी, मोटर सायकल यांची विक्री व देखभाल दुरूस्ती | ५०००/- | २५००/- |
| ९७ | क्रिडा व व्यायाम साधनेची निर्मिती दुरूस्ती व विक्री | १५००/- | १०००/- |
| ९८ | वाद्य निर्मिती, विक्री व दुरूस्ती | ५००/- | २५०/- |
| ९९ | सर्व प्रकारचे जनरल स्टोअर्स | ५००/- | २५०/- |
| १०० | कुलपे, स्टो, शिवण यंत्रे इत्यादी घरगुती वस्तुंची दुरूस्ती व विक्री | ५००/- | २५०/- |
| १०१ | चष्म्याची विक्री व दुरूस्ती | २०००/- | १०००/- |
| १०२ | लॉन्ड्री व्यवसाय | ५००/- | २५०/- |
| १०३ | झेरॉक्स मशीन विक्री, कम्प्युटर्स विक्री दुरूस्ती | ५०००/- | २५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १०४ | सर्व प्रकारचे पोल्ट्री फॉर्म | १०००/- | ५००/- |
| १०५ | टु स्टार हॉटेल<br>थ्री स्टार हॉटेल<br>फोर स्टार हॉटेल<br>फाईव्ह स्टार हॉटेल | १०,०००/-<br>१५,०००/-<br>२०,०००/-<br>२५,०००/- | ५०००/-<br>७५००/-<br>१०,०००/-<br>१२,५००/- |
| १०६ | हॉटेल विथ लॉजिंग बोर्डींग | ५०००/- | २५००/- |

वरील प्रमाणे एकुण ०१ ते १०६ एवढया आस्थापना आहेत. यापेक्षा जास्त आस्थापना वाढविण्याचा अधिकार व त्याचे दर ठरविण्याचा अधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना असतील. तसेच नगर रचना विभागाकडून विविध परवाने देण्यात येत असतात. उदा.पेट्रोलपंप, हॉटेल्स्, गोडाउन इत्यादी व तसेच अन्न, औषध प्रशासनाकडून अन्न भेसळ परवाना व औषधी परवाना देण्यात येत असतो. तसेच महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून विविध क्लिनिक/दवाखाने, हॉस्पीटल्स्/ रूग्णालय, मुख्य पशु संवर्धन विभागाकडून मटन,बीफ,मत्स्य इत्यादी परवाने देण्यात येत असतात. यासाठी महानगरपालिकेने एक खिडकी योजने अंतर्गत सर्व परवानासाठी लागणारे कागदपत्र जमा करणे व त्याची माहिती संकलन करणे. यासाठी संगणक प्रणाली तयार करून त्याची माहिती संकलन (डाटा इंट्री) इत्यादी कार्यवाहीच्या अनुषंगाने वर्तमान पत्रामध्ये जाहिर प्रगटन प्रसिध्द करून अन्न औषध प्रशासन व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या कार्यालयाकडून वितरीत होणारे विविध परवाने देतांना महानगरपालिकेचे परवाना व्यवसाय दाखला घेणे बंधनकारक असेल. इत्यादीच्या अनुषंगाने प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७७४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्ता वेगवेगळ्या सामाजिक संस्था/संघटना/व्यक्ती यांचेकडून भाडेतत्वावर देणे बाबत या पुर्वीच्या मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७५३, दिनांक २०.०२.२०१५ अन्वये मंजुर करण्यात आला होता.

तथापि, त्यानुषंगाने सदरील मांलमत्ता संबंधीत सामाजिक संस्था/संघटना/व्यक्ती यांना भाडेतत्वावर देण्यासाठी निकष आणि दर या बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व नगर विकास विभागाचे वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, शासन आदेश यांचा सखोल अभ्यास करून धोरण ठरविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

१. श्री.श्रीकृष्ण भालसिंग - अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती मंजुषा मुथा - उपआयुक्त (महसूल)
३. श्री.एम.बी.काझी - दक्षता कक्ष प्रमुख
४. श्री.ए.बी.देशमुख - उपअभियंता, नगर रचना विभाग

दि.२१.०८.२०१८ रोजी समितीच्या बैठकीमध्ये मालमत्ता विभागातील विविध ठिकाणी असलेल्या खुल्या जागा, सभागृह, खेळाचे मैदान, व्यापारी संकुलातील गाळे, रेखांकनातील खुल्या जागा, वाहनतळ, आठवडी बाजार, नाट्यगृह व स्लम भागातील सभागृह या संदर्भांत आढावा घेण्यात आला. बैठकीत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात आलेले आहे.

**खेळाचे मैदाने -** महानगरपालिका क्षेत्रातील रेखांकनातील खुले मैदाने व सिडको रेखांकनातील खेळाचे मैदान हे सिध्द शिघ्र गणकानुसार भाडेतत्वावर देता येऊ शकत नाही. असे खेळाचे मैदाने

हे ज्या उद्देशासाठी ठेवण्यात आलेले आहे. त्याच उद्देशासाठी म्हणजेच नियमानुसार खेळण्याच्या वापरासाठी मैदानासाठी जर खेळण्याच्या प्रयोजनासाठीच मागणी असल्यास उदा. क्रिकेट टुर्नामेंट, खो-खो, कबड्डी इत्यादी किंवा खेळण्याच्या स्पर्धांसाठी भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी असल्यास त्यासाठी सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे त्या त्या मैदानसाठी भाडे आकारणी करून प्रतीदिन प्रमाणे आकारणी करून फक्त खेळण्याच्या प्रयोजनासाठी राखिव असल्याने त्याच उद्देशासाठी असल्याने त्याच वापरासाठीच देण्यात यावे. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या शालेय इमारती व त्या समोरील मैदाने शैक्षणिक समारंभ, स्वागत समारंभ, धार्मिक कार्यक्रम व सामाजिक कार्यक्रमांसाठी मागणी असल्यास त्यास मुख्याध्यापक व शिक्षण अधिकारी यांच्या शिफारसीनुसार सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे प्रती दिन प्रमाणे भाडे आकारणी करून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देण्यात यावे. असे समितीचे मत आहे.

- **व्यापारी संकुले -** औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे विविध ठिकाणी असलेले एकुण २४ व्यापारी संकुले आहे. त्यामध्ये एकुण ४६८ गाळे आहेत. त्यापैकी रिक्त असलेले गाळे सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे भाडे आकारणी करून निविदा पध्दतीने देणे बाबत, तसेच ज्या गाळेधारकांकडे महानगरपालिकेच्या भाडे रक्कम थकीत असलेल्या थकबाकीधारकांचे गाळे सील करून त्यासाठी जाहिर लिलाव पध्दतीने सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानूसार प्रथम तीन वर्षांसाठीचा करारनामा करणेसाठी फेर निवीदापध्दतीने गाळे भाडयातत्वावर देणेसाठीची कार्यवाही करावी. तसेच सदरची कार्यवाही ही करारनामा संपण्याच्या एक महिनापुर्वीच सर्व प्रक्रीया पार पाडणे आवश्यक आहे.

- **सभागृह -** महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी रेखांकनातील खुल्या जागेमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातुन मा.आमदार, मा.खासदार, लोकप्रतिनिधी यांच्या निधीतुन बांधण्यात आलेले सभागृह हे स्थानिक रेखांकनातील नागरीकांच्या सोई करीता बांधण्यात आलेले आहेत. ते सभागृह ज्या रेखांकनात अस्तित्वात आहे. त्याच रेखांकनातील/स्थानिक रहिवासी/ यांचे सुविधेकरीता बांधण्यात आलेले आहे. त्याच रेखांकनातील नागरीकांचा सदरील सभागृह वापरण्याचा अधिकार असुन सामाजिक, बहुऊद्देशिय कार्यासाठी प्रथम प्राधान्याने देण्यात यावे. त्यासाठी प्रती माह भाडे रू.१०००/- प्रमाणे भाडे आकारणी करून सदर हॉलची देखभाल दुरूस्ती व विद्युत देयक रेखांकनातील रहिवास्यांनी / संस्थांनी करावयाची आहे.

  सदरील रेखांकनातील नागरिकांनी सभागृहाची मागणी केल्यास, त्या रेखांकनातील स्थानिक ८०% रहिवाशांचे/रेखांकनातील सोसायटी संस्थांचा ठराव व नागरीकांचे ना हरकत घेवुन सभागृह भाडेतत्वावर देता येईल. तसेच जे स्थानिक नागरीक रेखांकनातील रहिवासी सभागृहासाठीचा भाडेपट्टा करारनामा करतांनाच सदर सभागृहांचे देखभाल दुरूस्ती (मेंन्टेंनन्स्), विद्युत देयक (लाईटबील), सुरक्षा, साफसफाई, रंगरंगोटी संबधीत भाडेपट्टाधारकाने किंवा करारनामा करणाऱ्यांना देय असेल. अशी अट टाकण्यात यावी. परंतु व्यावसायिक उद्देशाकरीता सभागृह/हॉल भाडयाने द्यावयाचे झाल्यास त्यास चालू वर्षाच्या सिध्द शिघ्र गणकानुसार व्यावसायीक वापराच्या संबंधाने भाडे आकारणी करण्याच्या अटीस अधीन राहून भाडेपट्याने देण्यात यावे.

- **रेखांकनातील खुल्या जागा -** औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील जुन्या शहरामध्ये एकुण ५८३ रेखांकनातील खुल्या जागा, सिडको रेखांकनातील खुल्या जागा एकुण ४०७ व नव्यानेच औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ झालेले सातारा देवळाई रेखांकनातील खुल्या जागा,

ग्रामपंचायत सातारा धार्मिक स्थळे व इतर सार्वजनिक मिळकत, ग्रामपंचायत सातारा देवळाई इमारत, सभागृह, अंगणवाडी असे एकुण ४८० असे सर्व एकत्रित १४७० विविध ठिकाणी असलेल्या रेखांकनातील खुल्या जागेच्या मिळकत पत्रिका, ७/१२ उताऱ्यामध्ये महानगरपालिकेचे नांव लागलेले नाही. त्यापैकी सिडको वगळता उर्वरित जागेवर म्हणजेच एकुण १०६३ जागेवर महानगरपालिकेचे नाव लावणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

- **नाटयगृह -** औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिकेचे ०१ संत एकनाथ रंग मंदीर असून सिडको कार्यालयाकडून महानगरपालिकेस जगतगुरू संत तुकाराम महाराज नाटयगृह हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. संत एकनाथ रंगमंदिर हे महापालिकेच्या अधिपत्तयाखाली ठेवून संत तुकाराम नाट्यगृह सिडको या नाट्यगृहाचे खाजगीकरण करण्यात यावे व भाडे करार करतेवेळेस ०३ वर्षाच्या कालावधीसाठीचा असावा या अटीस अधीन राहून भाडेपट्टयाने देण्यात यावे. यासाठी E.O.I. मागविण्यात यावे.

- **वाहनतळ -** औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे सद्या अस्थित्वात असलेले **१.**पैठणगेट वाहनतळ, **२.**गुलमंडी वाहनतळ, **३.**सलीमअली सरोवर वाहनतळ, **४.**नागेश्वरवाडी वाहनतळ, **५.**संत एकनाथ रंग मंदीर तळघरात असलेले वाहनतळा यासाठी निविदा प्रक्रिया करून जागेच्या क्षेत्रफळानूसार वाहनतळामध्ये येणारे वाहने दोनचाकी व चारचाकी याचे सर्वेक्षण करून वाहनतळात येणाऱ्या वाहनांसाठी कालमर्यादा ठेऊन त्यानूसार आधारभुत किंमत निश्चित करून निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

  तसेच औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या जागेचे सर्वेक्षण करून वाहनतळासाठी जागा निश्चिती करून त्यास झोननिहाय वेगवेगळे दर लावण्यात यावे. तसेच औरंगाबाद शहरामध्ये एकुण ०७ ठिकाणी उड्डाणपुले असून उड्डाणपुला खालील जागेत अनाधिकृतरित्या वाहने उभी केली जातात. त्यासंबंधाने दि.२९.०३.२०१८ ठराव क्र.३२० मध्ये झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमधील ठरावाची अंमलबजावणी करणेसाठी उड्डाणपुलाखालील जागेत वाहनतळे सुरू करणेसाठी प्रायोगिक तत्वावर देण्यात यावी. सदरील वाहनतळाचा व्यवसायीक वापरानुसार दर ठरविण्यात यावा. पार्कीगचा दर हा महानगरपालिका निश्चित करेल. तसेच सुशिक्षित बेरोजगार, अंध, अपंग, विधवा महिलांसाठी व्यापारी संकुल व मागणीनुसार त्यांच्या उपजिविकेच्या साधनासाठी जागेची मागणी केल्यास त्यांना सिध्द शिघ्र गणकानुसार भाडे आकारणी करून जागा, गाळे, भाडेतत्वावर देणेसाठी प्राधान्य देण्यात यावे.

- **आठवडी बाजार -** औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे ०२ आठवडी बाजार असून **१.**जाफरगेट आठवडी बाजार, **२.**चिकलठाणा आठवडी बाजार हे दोन्ही बाजार सद्या निविदा पध्दतीने ठेकेदार नेमुन चालविण्यासाठी देण्यात आलेले आहे. हे दोन्ही बाजार बी.ओ.टी. तत्वावर देण्यात यावे. परंतु सदर जागा ही महानगरपालिकेच्या नावे असणे आवश्यक आहे. तसेच त्या ठिकाणी आठवडी बाजाराच्या जागेमध्ये किती व्यापारी किरकोळ दुकाने लावून व्यवसाय करणेसाठी बसतात, त्यांच्या दुकानाचे आकार उदा.भाजीपाल्यावाले, पाल लावून बसणारे व्यापारी, कपडे विक्रेते, फळ विक्रेते, अन्न धान्य विक्रेते, फरसाण विक्रेते, मासे विक्रेते, मटन विक्रेते, चिकन विक्रेते व किरकोळ व्यापारी यांच्या बसण्याच्या जागेंचा प्रत्यक्ष सर्वे करून त्या बाबतच्या क्षेत्रफळ निहाय आसनव्यवस्थे बाबतचा सर्वे करण्यात यावा. त्यानुसार आधारभुत किंमत काढुन निविदा काढण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालमत्ता संबंधीत समाजिक संस्था/संघटना/व्यक्ती यांना भाडेतत्वावर देण्यासाठी निकष आणि दर याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व नगर विकास विभागाचे वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, शासना आदेश यांचा सखोल अभ्यास करून धोरण ठरविण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीने दि.२१.०८.२०१८ रोजी समितीच्या बैठकीमध्ये मालमत्ता विभागातील विविध ठिकाणी असलेल्या खुल्या जागा, सभागृह, खेळाचे मैदान, व्यापारी संकुलातील गाळे, रेखांकनातील खुल्या जागा, वाहनतळ, आठवडी बाजार, नाट्यगृह व स्लम भागातील सभागृह या संदर्भाने सुचविण्यात आलेली कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५३ मधील मनपा अर्थसंकल्प २०१७-१८ मधील खालील विकास कामांचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधांसाठी बदलण्यात यावे.

| पान क्रमांक व अनुक्रमांक | मनपा अर्थसंकल्प २०१७-१८ मधील मंजुर काम | नवीन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| Zone-02-Spill P.No.30 | वॉर्ड क्र.५३ अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | वॉर्ड क्र.५३ अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्याच्या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. रु.३०.०० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती बबीता विजय चावरीया **अनुमोदक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५३ येथे खालील विकास कामांचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधांसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| पान क्रमांक व अनुक्रमांक | मनपा अर्थसंकल्प २०१७-१८ मधील मंजुर काम | नवीन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| Zone-02-Spill P.No.30 | वॉर्ड क्र.५३ अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | वॉर्ड क्र.५३ अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्याच्या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. रु.३०.०० लक्ष |

**विषय क्रमांक ७७६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५३ मधील औरंगपुरा-दलालवाडी येथे दलित वस्ती अंतर्गत खालील कामे करण्यासाठी निधी उपब्लध करून देण्यात यावा.

| क्रमांक | कामाचे स्वरुप | तरतुद लक्ष |
|---|---|---|
| १. | दलालवाडी अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग व नवीन ड्रेनेज लाईन कामे. | रु.२०.०० लक्ष |
| २. | जरीपुरा अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग व नवीन ड्रेनेज लाईन कामे | रु.२०.०० लक्ष |
| ३. | पैठणगेट बुध्दवाडा अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग व नवीन ड्रेनेज लाईन कामे | रु.२०.०० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती बबीता विजय चावरीया **अनुमोदक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५३,औरंगपुरा-दलालवाडी येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामे करण्यासाठी निधी उपब्लध करून देण्यास मंजुरी देण्यात येते.

| क्रमांक | कामाचे स्वरुप | तरतुद लक्ष |
|---|---|---|
| १. | दलालवाडी अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग व नवीन ड्रेनेज लाईन कामे. | रु.२०.०० लक्ष |
| २. | जरीपुरा अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग व नवीन ड्रेनेज लाईन कामे | रु.२०.०० लक्ष |
| ३. | पैठणगेट बुध्दवाडा अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग व नवीन ड्रेनेज लाईन कामे | रु.२०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद डिस्ट्रिक हौसी वेट लिफ्टिंग असोसीएशन गेल्या १० वर्षापासून कार्यरत असून असोसिएशन मार्फत जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावर अनेक खेळाडू तयार केलेले असून या खेळाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी असोसिएशन मार्फत अनेक उपक्रम राबविले जातात.

यावर्षी औरंगाबाद डिस्ट्रिक हौसी वेट लिफ्टिंग असोसिएशन तर्फे दिनांक २६ ते २८ डिसेंबर-२०१८ या दरम्यान राज्यस्तरीय खुली वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आहे. सदरील स्पर्धेमध्ये राज्यभरातून औरंगाबाद जिल्ह्यासह ४०० ते ४५० मुले व मुली सहभाग घेणार असून सदरील स्पर्धेकरीता अंदाजीत र.रु.५ लक्ष (अक्षरी पाच लाख रुपये) एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरील स्पर्धेची आर्थिक स्थिती पाहता एवढा खर्च करणे शक्य नाही.

करीता, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे ही स्पर्धा राज्यस्तरीय वरिष्ठ वेटलिफ्टिंग स्पर्धा करणे करीता रु.५ लक्ष स्पर्धेकरीता खर्च करून ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य

**अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे,श्री.विकास रतनलाल जैन,श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप,

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद डिस्ट्रिक हौसी वेट लिफ्टिंग असोसिएशन तर्फे दिनांक २६ ते २८ डिसेंबर-२०१८ या दरम्यान आयोजीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय खुल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये राज्यभरातून औरंगाबाद जिल्ह्यासह ४०० ते ४५० मुले व मुली सहभाग घेणार असून सदरील स्पर्धेकरीता औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रु.५ लक्ष स्पर्धेकरीता खर्च करण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शहागंज भागात ऐतिहासीक चमन (उद्यान/बगीचा) आहे. ऐतिहासीक घड्याळा शेजारी असलेले चमन यास ऐतिहासिक असा इतिहास आहे. तमाम शहरवासीयांच्या भावना या चमनशी जोडलेल्या आहेत.

काही वर्षापूर्वी सदरील ठिकाणी महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम सुरु करण्यात आले होते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याजवळ स्वच्छतागृह असु नये म्हणून सदरील शौचालयाच्या बांधकामास शहरातील स्वातंत्र्य सैनिकांनी, गुजराती समाजातील मान्यवरांनी तसेच विविध सामाजिक संस्थाकडून प्रखर विरोध करण्यात आला होता. त्यामुळे सदरील शौचालयाचे बांधकाम अर्धवट स्थितीत बंद करण्यात आले आहे. या चमन मध्ये भारताचे लोहपुरुष सरदार

वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याचा प्रस्ताव यापूर्वीच सर्वसाधारण सभेमध्ये पारीत झालेला आहे. त्यानुसार सदरील पुतळा तयार करण्यात आला असून तो सध्या चमन मध्ये ठेवण्यात आलेला आहे.

सदरील पुतळ्याच्या चौथऱ्याची जागा अर्धवट असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी येत असल्याने अर्धवट अवस्थेत असलेले स्वच्छतागृहाचे बांधकाम (कॉलम) निष्कासित करणे आवश्यक आहे.

तरी सध्या शहागंज चमन मध्ये ठेवण्यात आलेला ब यांचा पुर्णाकृती पुतळा नियोजीत जागी चमन मध्ये उभारण्यासाठी चमन मधील अर्धवट स्थितीतील असलेल्या स्वच्छतागृहाचे बांधकाम निष्काशित करण्यात यावे व पुतळा उभारणीच्या कामातील अडसर दुर करावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-**कु.यशश्री लक्ष्मीनारायण बाखरीया **अनुमोदकः-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज भागातील ऐतिहासीक घड्याळा शेजारी असलेले चमन मध्ये सरदार वल्लभभाईंचा पुतळा उभारण्याच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार पुतळ्यासाठी लागणारा चौथरा (बेसमेंट) बांधावयाचा असल्याने या ठिकाणी अर्धवट अवस्थेतील स्वच्छतागृहाचे बांधकाम (कॉलम) निष्कासित करुन लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणीतील अडसर दूर करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रिलायन्स मॉल गारखेडा येथील मनपाच्या हिश्यातील गाळ्यांमध्ये सद्यस्थितीत सुका कचरा भरुन ठेवण्यात येत आहे. सदर ठिकाणी मागील काही दिवसांपुर्वी आग लागली होती. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून सदरील कचरा तात्काळ उचलण्यात यावा. तसेच सदर ठिकाणी असलेले गाळे हे शहरात एम.पी.एस.सी. व युपीएससी च्या विद्यार्थ्यांचे परिक्षेसाठी मार्गदर्शन करणारे संस्थांना नाममात्र भाडेतत्वावर चालविण्यासाठी देण्यात यावे. जेणेकरून या शहरातून या परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ते लाभदायी ठरेल. बरेचसे विद्यार्थी हे आर्थिकदृष्ट्या मागास असून शहरात एमपीएससी व युपीएससीच्या परिक्षेच्या तयारीसाठी येत असतात. त्या विद्यार्थ्यांना कुठेतरी चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण मिळावे, कमी पैशात मिळावे ही धारणा यामागे आहे.

करीता, रिलायन्स मॉल गारखेडा येथील मनपाच्या हिश्यातील गाळे शहरातील एमपीएससी व युपीएससीची तयारी करण्याऱ्या विद्यार्थ्यांसाठी विनामुल्य क्लासेस घेणाऱ्या (संस्थांना) क्लासेस धारकांना नाममात्र भाडेतत्वावर देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-**श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य **अनुमोदकः-**श्री.दिलीप गंगाधर थोरात

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठरावः-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७८०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माजी महापौर स्व.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचे शहराच्या विकासासाठी भरीव योगदान होते. त्यांनी विविध महत्वाच्या पदांवर अत्यंत निष्ठेने काम केले होते. त्यांचे सामाजिक योगदान पाहता व त्यांचे कार्य शहरवासीयांच्या कायम स्मरणात रहावे म्हणुन ओबेरॉय परिवारातर्फे विकसीत करण्यात येणाऱ्या उस्मानपुरा गोपाळ टी समोरील चौकामध्ये स्व.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्याची मागणी ओबेरॉय परिवारातर्फे करण्यात आलेली आहे. पुतळा

उभारणीसाठी लागणारा खर्च ओबेरॉय परिवार स्वत: करणार आहेत. तरी त्यांनी सदरील चौकामध्ये पोलीसांची व जिल्हाधिकारी यांची पुर्व परवानगी/नाहरकत घेण्याच्या अटीवर ओबेरॉय परिवार यांना स्व.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यास परवानगी मिळण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७८१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा शाळा क्र.५६ ऊर्दु मेहरून जळगाव येथे मागील ७ वर्ष १० महिन्यापासून ऊर्दु भाषेचे उपशिक्षक म्हणुन कार्यरत असलेले श्री.साजेद खान जावीद खान हे मुळ औरंगाबाद येथील रहिवासी असून त्यांचे आई-वडील वयोवृध्द असल्याने त्याची वृध्दापकाळात आरोग्याची व औषधोपचाराची सर्वस्वी जबाबदारी संबंधीतांवर आहे. संबंधीतांची एकतर्फी आंतरजिल्हा बदली करण्यासाठी सर्वसाधारण सभा जळगाव महानगरपालिकेने प्रस्ताव मंजुर केलेला आहे.

तरी वरील बाबींचा सहानुभूतीपुर्वक विचार करून सध्या औरंगाबाद महानगरपालिकेत ऊर्दु भाषेच्या शिक्षकाची आवश्यकता असल्याने संबंधीतांची एकतर्फी बदलीचा प्रस्ताव मंजुर करून त्याची सेवा औरंगाबाद महानगरपालिकेकडे वर्ग करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्री.अजीम अहेमद रफिक

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.साजेद खान जावीद खान, मनपा शाळा क्र.५६ ऊर्दु मेहरून जळगाव यांना एकतर्फी आंतरजिल्हा बदली अंतर्गत ऊर्दु भाषेचे शिक्षक म्हणुन औरंगाबाद महानगरपालिकेकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-०२, हर्सुल परिसरातील गट क्रमांक १५२/२ या परिसरातील कॉलनीस राजे छत्रपती कॉलनी असे नाव देण्यात यावे. अशी या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करून गट क्र.१५२/२ मधील कॉलनीस “राजे छत्रपती कॉलनी” असे नाव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-०२, हर्सुल परिसरातील गट क्रमांक १५२/२ या परिसरातील कॉलनीस “राजे छत्रपती कॉलनी” मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती नसरीन बानो उमर खान ह्या वॉर्ड क्र.६१ अंतर्गत रहिमनगर, रहिमानिया कॉलनी, जसवंतपुरा येथील रहिवासी असून भिवंडी मनपा प्राथमिक शिक्षण विभागात उर्दु माध्यम शाळेमध्ये उपशिक्षक या पदावर कार्यरत आहे. त्यांचा मुलगा मतीमंद असून मुलावर आयकॉन हॉस्पीटल मध्ये Integrated Centre of Child Neuro development या

आजारावर उपचार चालु आहे. त्यांचे सासु सासरे वयस्कर असून त्यांच्या देखभालीसाठी व प्रकृती खराब असल्याने त्यांची काळजी घेणारे कोणीही नाही त्यामुळे श्रीमती नसरीन बानो उमरखान यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पदस्थापना मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.खान अय्युब म.हुसेन खान **अनुमोदक:-** श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६१ अंतर्गत रहिमनगर, रहिमानिया कॉलनी, जसवंतपुरा येथील रहिवासी असलेल्या व सध्या भिवंडी, मनपा प्राथमिक शिक्षण विभाग, उर्दु माध्यम शाळेमध्ये उपशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती नसरीन बानो उमर खान यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गोमुख परिसराचा विकास तथा नहर-ए-अंबरीचे Interpretation Centre उभारणे या कामाचे अंदाजपत्रक INTACH या संस्थेने तयार करून सादर केलेले आहे. औरंगाबाद शहर हे ऐतिहासीक शहर आहे. मलिक अंबर या वास्तु शिल्पी व अभियंत्यांनी जुन्या औरंगाबाद शहरासाठी पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण केली. सावंगी येथून यापाण्याचा स्त्रोत घेतला असून गुरुत्वीय बलाच्या सायफन तंत्राने मातीपासून तयार केलेल्या पाईप द्वारे पाणी गोमुख येथे आणण्यात आले व संपूर्ण शहरात त्याचा २४ तास पाणी पुरवठा करण्याची भुमिगत व्यवस्था निर्माण केली. हा एक वैज्ञानिक अविष्कार असून याला अनन्य साधारण महत्व आहे. अश्या ऐतिहासीक व्यवस्था प्रणालीची माहिती पुढील पीढीस व्हावी यासाठी Interpretation Centre उभारणे व गोमुख परिसराचा मुगल गार्डन पध्दतीने विकास या बाबींचा या प्रकल्पात समावेश आहे व सदर अंदाजपत्रकास आर्थिक तरतुद उपलब्ध असून दिनांक १७.११.२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तावित कामाचा समावेश सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ हेरीटेज वास्तु संवर्धन या लेखाशिर्षामध्ये करण्यात आली आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.९२,०३,९६२/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गोमुख परिसराचा मुगल गार्डन पध्दतीने विकास तथा नहर-ए-अंबरीचे Interpretation Centre उभारणे या कामाचे INTACH या संस्थेने अंदाजपत्रक तयार केले असून या बाबींचा या प्रकल्पात समावेश असून सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ हेरीटेज वास्तु संवर्धन या लेखाशिर्षामध्ये या कामाचे र.रु.९२,०३,९६२/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ऐतिहासिक वारसा स्मारक महेमूद गेटचे संवर्धन करणे या कामाचे अंदाजपत्रक INTACH या संस्थेने तयार करून सादर केलेले आहे. औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असून या शहरात विविध ऐतिहासिक वास्तू आहेत. त्यापैकी महेमुद गेट, पानचक्की या ऐतिहासिक स्थळा लगत असल्याने यास विशेष महत्व आहे. सदर गेट विजापूर वास्तुकले प्रमाणे बांधण्यात आले आहे. पानचक्कीला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. सदर वास्तु

शेजारीच असल्याने या वास्तुंचे संवर्धन केल्यास इतिहासप्रेमी पर्यटकांसाठी नविन पर्यटन स्थळ होऊ शकते. यासाठी या गेटचे संवर्धन करणे आवश्यक आहे व सदर अंदाजपत्रकास आर्थिक तरतुद उपलब्ध असून दिनांक २०.११.२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तावित कामाचा समावेश सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ **हेरीटेज वास्तु संवर्धन** या लेखाशिर्षामध्ये करण्यात आली आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.७२,३६,४४८/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ऐतिहासिक वारसा स्मारक महेमूद गेटचे संवर्धन करणे या कामाचे सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ **हेरीटेज वास्तु संवर्धन** या लेखाशिर्षामध्ये करण्यात आली असून या कामाचे र.रु.७२,३६,४४८/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६७७ दि.११.०९.२०१८ नुसार मनपा हद्दीत उपद्रवी नागरीकांना शिस्त लावण्यासाठी माजी सैनिकांचा समावेश असणारे नागरी मित्र पथक निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर दिव्यांग व्यक्तींचा समावेश असणारे एक पथक निर्माण करण्याचा मनोदय आहे. त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. सदर पथक प्रायोगीक तत्वावर महानगरपालिकेच्या एका झोनसाठी निर्माण करण्यात येणार असून त्यात जास्तीत जास्त १० दिव्यांग व्यक्तींचा समावेश असेल.
२. पथकातील सदस्य दिव्यांग असल्याने त्यांना परिणामकारक कार्यवाही करण्याकरीता एक चार चाकी वाहन उपलब्ध करून द्यावे लागेल.
३. दिव्यांग नागरीक मित्र पथकासाठी मासीक अंदाजे रु.२,००,०००/- (दोन लक्ष रुपये फक्त) खर्च अपेक्षीत आहे.
४. दिव्यांग नागरीक मित्र पथकातील सदस्यांचे कामाचे स्वरुप, जबाबदारी, सुविधा व मोबदला हा माजी सैनिकांच्या निर्माण करण्यात आलेल्या नागरीक मित्र पथकाप्रमाणेच असेल.
५. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि-२० दिनांक २८.१०.२०१५ या मा.शासन निर्णयाप्रमाणे मनपा अर्थसंकल्पात दिव्यांग कल्याणासाठी निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. त्या निधीमधून या दिव्यांग नागरीक मित्र पथकाचा वाहन खर्च, सदस्यांचा मोबदला इ.खर्च अदा करण्यात येईल.

प्रकरणी नमुद करण्यात येते की, दिव्यांग व्यक्तींचा कामाप्रती असणारी सकारात्मक दृष्टीकोन तसेच शहर स्वच्छ करण्याच्या मोहिमेत सहभाग देण्याची त्यांची तळमळ याचा विचार करता असे पथक निर्माण झाल्यास शहर स्वच्छतेत सुधारणा होईल. यापुर्वी माजी सैनिकांच्या निर्माण करण्यात आलेल्या नागरीक मित्र पथकाचे काम समाधानकारक आढळून आले आहे.

तरी, सदर बाबीस व होणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता मिळणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा हद्दीत उपद्रवी नागरीकांना शिस्त लावण्यासाठी माजी सैनिकांचा समावेश असणारे नागरी मित्र पथक निर्माण करण्यात आले त्याच धर्तीवर दिव्यांग व्यक्तींचा कामाप्रती असणारा सकारात्मक दृष्टीकोन तसेच शहर स्वच्छ करण्याच्या मोहिमेत सहभाग देण्याची त्यांची तळमळ याचा विचार करता प्रस्तावात नमुद १ ते ५ बाबी विचारात घेवून असे पथक निर्माण झाल्यास शहर स्वच्छतेत सुधारणा होईल या करीता दिव्यांग व्यक्तींचा समावेश असणारे एक पथक निर्माण करण्यास व त्यासाठी होणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८७:-** **(शिक्षण विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विद्यार्थ्यांचे मन शाळेत रमावे, उपस्थिती व गुणवत्ता वाढावी व आनंददायी पध्दतीने शिकणे व शिकवणे व्हावे तसेच खेळासाठी जागा व मैदान उपलब्ध व्हावे या उद्देशाने मनपा शाळांना बालोद्यान विकसीत करण्या संदर्भात आवाहन करण्यात आले होते. या आवाहनास उत्तम प्रतिसाद देत शाळा प्रकल्पात सहभागी झाल्या. वृक्षारोपण, बोलक्या भिंती, चित्रे, खेळणी, डोंगर, खेळाचे मैदान, स्वच्छ परिसर, झुला, झाडांची सजावट नकाशे इ.द्वारे शाळेचा चेहरा-मोहरा बदलला. हा सर्व बदल शिक्षक विद्यार्थी यांनी घडवून आणला यासाठी श्रमदान केले व आर्थिक तरतुदही उभी केली. मोहिमेत सर्वच शाळांनी सहभाग घेतला तरी परंतु चांगले काम करून दाखवणाऱ्या कमाल ५० शाळांना प्रती शाळा एक लक्ष रुपये पारितोषिक म्हणून देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्यार्थ्यांचे मन शाळेत रमावे, उपस्थिती व गुणवत्ता वाढावी व आनंददायी पध्दतीने शिकणे व शिकवणे व्हावे तसेच खेळासाठी जागा व मैदान उपलब्ध व्हावे या उद्देशाने मनपा शाळांना बालोद्यान विकसीत करण्या संदर्भात केलेल्या मोहिमेत चांगले काम करून दाखवणाऱ्या कमाल ५० शाळांना प्रती शाळा एक लक्ष रुपये पारितोषिक देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महिला व बालकल्याण समिती, महानगरपालिका औरंगाबाद तर्फे महानगरपालिका हद्दीतील आरोग्य केंद्र, महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक शाळा, आठवडी बाजार येथील स्वच्छतागृह, महानगरपालिका मुख्य कार्यालय, वॉर्ड कार्यालय, सांस्कृतीक हॉल, नाट्यगृह इत्यादी ठिकाणी येणाऱ्या महिलांसाठी स्वच्छतागृहांमध्ये सॅनीटरी नॅपकीन व्हेंडिंग मशीन व डिस्पोझल मशीन बसविणे प्रस्तावीत आहे.

सदर प्रस्तावीत कामांकरीता जी.एम.पोर्टलवर माहितीनुसार सॅनीटरी नॅपकीन व्हेंडींग मशीन डिस्पोझल मशीन प्रति नग रु.६२,१७४/- आहे. वरील प्रमाणे १०० ठिकाणी सॅनीटरी नॅपकीन व्हेंडिंग मशीन बसविण्याचे निश्चित केले आहे. याप्रमाणे १०० मशीन खरेदी करण्याकरीता रु.६२,१७,४००/- अंदाजित खर्च अपेक्षीत आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका महिला व बालविकास विभाग या लेखाशिर्षकातून सन २०१८-२०१९ अर्थसंकल्पीय निधीतून शहरात विविध ठिकाणी मनपा मालकीच्या इमारतीमध्ये असणाऱ्या महिला स्वच्छतागृहात सॅनिटरी नॅपकीन व्हेंडींग मशीन व डिस्पोझल मशीन बसविणे या कामासाठी रु.६२ लक्षच्या निधी मिळणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, या देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी हे सर्वात प्रदिर्घ काळ खासदार राहण्याचा विक्रम असलेले आणि एकूण ५० वर्षे खासदारपद भुषविलेले तसेच १९५२ ते २००८ पर्यंत म्हणजे ५६ वर्षे सक्रिय राजकारणात राहीलेले आणि देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून निर्भयतेने पोखरण येथे अणु चाचणी घेणारे माजी पंतप्रधान आणि नावाप्रमाणेच अटल अढळ आणि अचल होते. त्यांच्या या कार्याकडे पाहून राष्ट्रभक्ती या शब्दाचा अर्थ कळतो अशा आदर्श, सत्यवचनी, कर्तव्य कठोर पण तितक्याच निर्मळ मनाच्या थोर नेत्याचा आदर्श कायम नजरेसमोर रहावा या करीता या थोर नेत्याचे स्मारक औरंगाबाद या ऐतिहासीक शहरात उभारण्यात यावे व यासाठी महानगरपालिकेची अथवा शासनाची योग्य अशी पाच एकर जागा निश्चित करून या जागेवर स्मारक उभारणे व त्यासाठी र.रु.२५ कोटीची महाराष्ट्र शासनाकडे मागणी करणे व छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (क्रांतीचौक) यांची उंची वाढविणेसाठी र.रु.५.०० कोटी करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.राजु रामराव शिंदे, श्री.गजानन रामकिसन बारवाल.

**अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.त्र्यंबक गणपत तुपे.

मा.महापौर :विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**विषय क्रमांक ७९०:-** **(कार्यकारी अभियंता पा.पु.)**

**(टिप:- सोमवार दिनांक ०६.०८.२०१८ (का.प.क्र.१८) रोजीच्या सर्वसाधारण सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्रमांक-५८०)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरास १२१९ मीमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनी द्वारे पाणी पुरवठा होतो. सदर जलवाहीनी जायकवाडी ते फारोळा जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत रस्त्याच्या बाजूने टाकण्यात आलेली आहे. भविष्यामध्ये औरंगाबाद पैठण राज्य रस्ता क्र.३० चे रुंदीकरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात येत आहे. संबंधीत विभागाने औरंगाबाद ते पैठणकडे जातांना राज्य रस्ता क्र.३० च्या उजव्या बाजुला बिडकीनपुढे हॉटेल आनंद रेस्टॉरंट समोर १२१९ मीमी व्यासाची मुख्य पोलादी अशुध्द जलवाहीनी भविष्यात रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होत असल्यामुळे १६० मी.लांबीचा पुरवठा गृहीत धरुन एकत्रित रु.४८,६३,१००/- किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. या प्रस्तावाला दि.१९.०७.२०१७ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.४५ नुसार मान्यता घेऊन निविदा कार्यवाही करण्यात आली. सर्व प्रक्रिया पार पाडून प्राप्त झालेली निविदा नुर कन्स्ट्रक्शन यांची स्थायी समिती ठराव क्र.२४.०१.२०१८ विषय क्र.२४९ अन्वये मान्यता घेऊन नुर कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देण्यात आले. प्रत्यक्षात काम करत असतांना ३२० मीटर लांबीचे पाईप बाधीत होत असल्याचे दिसून आले. १६० मीटर लांबीचे पाईप खात्यामार्फत पुरवठा करून एकूण ३२० मीटर पाईप अंथरण्याचे काम केल्यास कामाचे जास्तीचे परिमाण (Excess Quantity) प्रत्यक्ष कामानुसार मंजुर निविदा दराने कंत्राटदाराला अदा करावे लागेल. यासाठी लागणाऱ्या रु.१५,२६,७८६/- खर्चाच्या अंदाजपत्रकास देखील सक्षम मान्यता घेतली आहे.

वरील बाबीमुळे मुळ अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमाणे वाढ झालेली आहे.

१. स्विकृत निविदा रक्कम - रुपये ५९,२८,२९२/- (२८% जास्त दराने)
२. अतिरीक्त बाब रक्कम - रुपये ५,३८,२४५/-
३. वाढीव परिमाणासाठी लागणारा खर्च रक्कम - रुपये १५,२६,७८५/-
४. एकूण अपेक्षित खर्च (१+२+३) - रुपये ७९,९३,३२२/-

करीता, र.रु.७९,९३,३२२/-चे सुधारित अंदाजपत्रक व प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद ते पैठणकडे जातांना राज्य रस्ता क्र.३० च्या उजव्या बाजुला बिडकीनपुढे हॉटेल आनंद रेस्टॉरंट समोर १२१९ मीमी व्यासाची मुख्य पोलादी अशुध्द जलवाहीनी भविष्यात रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होत असल्यामुळे १६० मी.लांबीचा पुरवठा गृहीत धरुन स्विकृत निविदा दरानुसार रु.५९,२८,२९२/- चे काम हाती घेण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात काम करतांना ३२० मीटर लांबीचे पाईप बाधीत होत असल्याने १६० मीटर लांबीचे पाईप खात्यामार्फत पुरवठा करून एकूण ३२० मीटर पाईप अंथरण्याचे काम करण्यास तसेच जास्तीचे परिमाण (Excess Quantity) प्रत्यक्ष कामानुसार मंजुर निविदा दराने मे.नुर कन्स्ट्रक्शन या मुळ कंत्राटदाराला अदा करण्यासाठी लागणाऱ्या रु.१५,२६,७८६/- इतक्या खर्चासह एकूण या कामाच्या अपेक्षीत सुधारित रु.७९,९३,३२२/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यांत्रिकी विभागातील जुने भंगार साहित्य व वापरात नसलेली २७ जुनी वाहनांची नोंदणी रद्द करुन भंगार म्हणुन विक्री करणे आहे. या संदर्भाने लिलाव करणे बाबत मुख्यत्वे दोन विषय पुढील प्रमाणे आहेत.

**अ) यांत्रिकी विभागाकडे असलेले भंगार साहित्याची विक्री.**
**ब) २७ वाहनांचे रजिस्ट्रेशन रद्य करुन भंगार म्हणुन विक्री करणे.**

प्रकरणी विभागा मार्फत लिलाव संदर्भाने प्रस्तावित प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी जाक्र/मनपा/यांत्रिकी/२७७७/२०१८ दि.३१.१०.२०१८ अन्वये समिती गठीत करण्यात आली. सदर समितीची बैठक दिनांक २८.११.२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे संपन्न झाली. सदर बैठकीत उपरोक्त अ व ब विषयान्वये खालील मुददे गठीत समितीची मान्यता अथवा सुचना प्राप्त करणेसाठी प्रस्तावित करण्यात आले होते.

१. या विभागाकडे असलेले भंगार साहित्य विक्री करणे, बाजार भावा प्रमाणे असलेल्या दरास अथवा समितीने सुचविल्यानुसार दरा संदर्भाने मान्यता घेणे.
२. मा.मोटार वाहन निरिक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय औरंगाबाद यांनी दिलेल्या अहवालानुसार २७ वाहनांचे रजिस्ट्रेशन रद्य करुन भंगार म्हणुन विक्री करणे.
३. मा.मोटार वाहन निरिक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय औरंगाबाद यांनी दिलेल्या अहवालानुसार वाहनांचे स्क्रॅप दर किंवा समिती सुचवेल त्यानुसार वाहनांच्या भंगाराचे दर निश्चित करणे.
४. वरील प्रमाणे भंगार साहित्य विक्री करणेसाठी लिलाव प्रक्रिया राबविणेसाठी Auctioner नियुक्त करणे.

सदर बैठकीस खालील प्रमाणे स.स्थायी समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र** | **स. सदस्यांची व अधिकारी यांची नांवे** | **पदनाम** |
|---|---|---|
| १ | श्रीमती दिपाराणी देवतराज | मुख्यलेखापरिक्षक तथा समिती अध्यक्ष |
| २ | स.सौ. जयश्री सुरेंद्र कुलकर्णी | स.स्थायी समिती सदस्य तथा समिती सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री सिध्दांत संजय शिरसाठ | स.स्थायी समिती सदस्य तथा समिती सदस्य |
| ४ | श्री सुरेश केंद्रे | मुख्यलेखाधिकारी तथा समिती सदस्य |
| ५ | श्री. एम.बी.काझी | विभाग प्रमुख (यांत्रिकी) तथा समिती सदस्य |
| ६ | श्री.डि.के.पंडित | प्र. उपअभियंता (यांत्रिकी ) तथा समिती सदस्य सचिव |

प्रकरणात यांत्रिकी विभागाकडे असलेले जुने भंगार साहित्य जसे एम.एस.स्क्रॅप,मोटार स्पेअरपार्टस,रिकामे लोखंडी ऑईल बॅरल व वापरलेले जुने विविध साईजचे टायर्स यांचा भंगार म्हणुन विक्री बाबातच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन भंगार साहित्य कोणत्या स्वरुपाचे आहे या बाबत सर्व समिती सदस्यांना उपअभियंता यांत्रिकी यांनी सविस्तरपणे सांगितले व बाजारभावा प्रमाणे भंगार साहित्यासाठी असलेल्या दरा बाबत चर्चा झाली व चर्चेच्या अंती बाजारभावा प्रमाणे प्रस्तावित काही दरात समितीने पुढील प्रमाणे वाढ सुचविली.

| **अ.क्र** | **भंगार साहित्य** | **भंगार साहित्य साठा** | **बाजारातील स्क्रॅप एजन्सी द्वारा प्राप्त कोटेशन नुसार विभागाने प्रस्तावित केलेले उच्चतम दर** | **बाजार भावानुसार प्राप्त होणारी रक्कम** | **बैठकी दरम्यान समितीने सुचित केलेले दर** | **समितीने सुचविलेल्या दरा नुसार प्राप्त होणारी रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम.एस.स्क्रॅप (समाविष्ठ असलेले विविध वाहनांचे बॉडी पत्रा,चॅनल्स,अँगल्स,हॅन्डकार्टस,सायकल रिक्षा,एम.एस बिन्स, टँकर जेटींगचे होजेस पाईप्स,एम.एच २०/२०७८ वॉटर टँक क्षमता ०१ नग ८००० लि, क्षमता ०१ नग एम.एस.टँक ३००० लि.क्षमता-०१ नग ८००० लि.क्षमता-०१ नग इत्यादी) | ५००० किलो अंदाजित (प्रत्यक्ष लिलावावेळी भंगार साहित्यसाठा मधील वाढ व घटच्या वजनानुसार) | १५/- प्रति किलो | ७५०००.०० | किमान रु.१८/- प्रति किलो अधिक जीएसटी | ९००००.०० अधिक जीएसटी |
| २ | मोटार स्पेअरपार्ट भंगार : १)विविध वाहनांचे निकामी पार्टस लॉट २)जेसीबी इंजिन ०१ नग एम.एच.२०/५७५८ किर्लोस्कर मेक ३)व्हॅक्युम पंप ०२ नग एम.एच.२०/ए५७४९ | ६००० किलो अंदाजित (प्रत्यक्ष लिलावावेळी भंगार साहित्यसाठा मधील वाढ व घटच्या वजनानुसार) | १५.५० प्रति किलो | ९३०००.०० | किमान रु.१८/- प्रति किलो अधिक जीएसटी | १०८०००.०० अधिक जीएसटी |
| ३ | रिकामे लोखंडी ड्रम २०० लि. | ८० नग (प्रत्यक्ष लिलावावेळी साहित्य साठयातील असलेल्या नगानुसार) | १६०.०० प्रतिनग | १२८००.०० | प्रस्ताविता प्रमाणे १६०/- प्रतिनग अधिक जीएसटी | १२८००.०० अधिक जीएसटी |
| ४ | जुने खराब टायर्स विविध | १०३६ नग (२२९४२ | ०४.०० प्रति | ९१७६८.०० | प्रस्ताविता | ९१७६८.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | साईज | किलो) अंदाजीत (प्रत्यक्ष लिलावावेळी साहित्य साठयातील असलेल्या नगानुसार) | किलो | | प्रमाणे ०४/- प्रतिनग अधिक जीएसटी | अधिक जीएसटी |
| | | | एकुण रक्कम | २७२५६८.०० | | ३०२५६८.०० |

त्या प्रमाणे मा. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने यांत्रिकी विभाग,महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडे असलेली वापरात नसलेली जुनी वाहनांचे रजिस्ट्रेशन रद्द करुन सदर वाहने भंगार म्हणुन विक्री करणे बाबत अहवाल दिलेला असुन सदर २७ वाहनांचे प्रत्येकी अपेक्षीत भंगार दर नमुद केलेले आहे. त्यानुसार सर्व समिती सदस्यांनी प्रस्तावित २७ वाहनांच्या सद्यस्थिती बाबत सविस्तर माहिती घेतली, वाहन लिलावा बाबत असलेले शासन निर्णय त्यानुसार वाहन नोंदणी रद्य करुन भंगार म्हणुन विक्री करावयाच्या कार्यपध्दती बाबत माहिती घेवुन सदर वाहनांची भंगार म्हणुन विक्री करतांना रु.१८/- प्रतिकिलो अधिक जीएसटी दर आकारणी करणे बाबत सुचित केले.

| Sr.No. | Vehicle No. | Type of Vehicle | Model Year | Age of Vehicle | Tentitevely Scrap Value of each Vehicle Rs. | Rate Suggested by Committe |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | MH20/AG-111 | Accent car | 2001 | 17 | 11000.00 | Rs.18/- Per KG + GST |
| २. | MH20/E-5986 | Amb car(Petrol) | 2001 | 17 | 12000.00 | |
| ३. | MH20/E-5987 | Amb car (Petrol) | 2001 | 17 | 12000.00 | |
| ४. | MH20/E-3306 | Maruti-800 (Petrol) | 1996 | 22 | 8500.00 | |
| ५. | MH20/E-1860 | Maruti-800 (Petrol) | 1996 | 22 | 8500.00 | |
| ६. | MH20/E-1870 | Maruti-800 (Petrol) | 1996 | 22 | 8500.00 | |
| ७. | MH20/U-9518 | Maruti-800 (Petrol) | 2000 | 18 | 9000.00 | |
| ८. | MH20/U-9519 | Maruti-800 (Petrol) | 2000 | 18 | 9000.00 | |
| ९. | MH20/U-9574 | Maruti-800 (Petrol) | 2001 | 17 | 9000.00 | |
| १०. | MH20/U-9575 | Maruti-800 (Petrol) | 2001 | 17 | 9000.00 | |
| ११. | MH20/U-517 | Maruti-Jypsy (Petrol) | 1998 | 20 | 22500.00 | |
| १२. | MH20/U-5051 | Maruti-Jypsy (Petrol) | 1997 | 21 | 24500.00 | |
| १३. | MH20/U-923 | Mahindra Jeep | 1997 | 21 | 13500.00 | |
| १४. | MCA/2532 | Tata-1210-compactor | 1988 | 30 | 70000.00 | |
| १५. | MH20/A-5600 | Bajaj Herse van | 1993 | 25 | 15000.00 | |
| १६. | MH20/A-5347 | Toyoto Fire Ambulance | 1992 | 26 | 16500.00 | |
| १७. | MH20/A-2075 | Tata-1210 Water Tanker | 1986 | 32 | 55000.00 | |
| १८. | MH20/A-2076 | Tata-1210 Water Tanker | 1986 | 32 | 55000.00 | Rs.18/- Per KG + GST |
| १९. | MH20/A-2078 | Tata-1210 Water Tanker | 1986 | 32 | 55000.00 | |
| २०. | MH20/A-5767 | Tata-1210 Water Tanker | 1993 | 25 | 57000.00 | |
| २१. | MH20/A-5766 | Tata-608 Water Tanker | 1993 | 25 | 56000.00 | |
| २२. | MH20/A-5441 | Tata-709 Water Tanker | 1996 | 22 | 54000.00 | |
| २३. | MH20/A-5440 | Tata-709 Water Tanker | 1996 | 22 | 54000.00 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २४. | MWP/3856 | Fire Trolley Tanker | 1982 | 26 | 22000.00 | |
| २५. | MWP/3859 | Fire Trolley Tanker | 1982 | 26 | 22500.00 | |
| | वाहन भंगार विक्रीतून प्राप्त होणारी अंदाजीत रक्कम | | | | 689000.00 | |

मा. प्रादेशिक परिवहन कार्यालया मार्फत प्राप्त अहवालानुवार २५ वाहनांचे भंगार विक्रीतुन रु ६८९०००.०० रक्कम प्राप्त होणे अपेक्षीत आहे. तथापी समितीने सुचविलेल्या दरानुसार सदर भंगार विक्रीतुन प्रत्यक्षे लिलावा वेळी वाहनांच्या वजनानुसार अधिकची रक्कम प्राप्त होऊ शकते.

**सदर बैठकीत पुढील प्रमाणे प्रस्तावित मुद्यांवर समितीने मान्यता दिली.**

१. सर्व प्रथम वरील २५ वाहनांचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडुन नोंदणी रद्य करणे बाबत कार्यवाही करावी.
२. यांत्रिकी विभागाकडे असलेले जुने भंगार साहित्य जसे एम.एस.स्क्रॅप, मोटार स्पेअर पार्टस व जुनी वाहने भंगार म्हणुन विक्री करतांना विक्री दर किमान रु १८/- प्रति किलो अधिक जीएसटी असा असावा.
३. जुने टायर्सचा प्रति किलो विक्री दर रु ०४/- अधिक जीएसटी असा कायम ठेवावा. तर लोखंडी रिकामे बॅरलचा प्रतिनग रु १६०/- अधिक जीएसटी निश्चित करावा.
४. वरील सर्व भंगार साहित्याची विक्री ई-लिलाव पध्दतीने करण्यात यावी.
५. ई-लिलाव पध्दतीने विक्री करण्यासाठी अधिकृत शासनमान्य लिलावकाराची (Auctioner) नियुक्ती करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, यांत्रिकी विभागातील जुने भंगार साहित्य व वापरात नसलेली २५ जुनी वाहनांची नोंदणी रद्द करुन भंगार म्हणुन विक्री करणे साठी गठीत करण्यात आलेल्या समितीने घेतलेल्या बैठकीत प्रस्तावातील नमुद अ.क्र.१ ते ५ मुद्यास दिलेल्या मान्यतेस तसेच समितीने केलेल्या सुचनांचा विचार करून प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत नागरीकांच्या सोईसाठी खालील कामे करणे आवश्यक असून लेखाशिर्ष बदलुन तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

करीता खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|---|
| SCR-Zone 01-P-No.02 Sr.No.16 | वॉर्ड क्र.१४ विविध भागात कॉंक्रीटची कामे करणे. तरतुद र.रु.२५.०० लक्ष | १. वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत आर्च आंगण गट नं.१०७ येथे विहीरीचे काम करणे. | १०.०० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत गुलमोहर कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | १५.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-**श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./पा.क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|---|
| SCR-Zone 01-P-No.02 Sr.No.16 | वॉर्ड क्र.१४ विविध भागात काँक्रीटची कामे करणे. तरतुद र.रु.२५.०० लक्ष | १. वॉर्ड क्र..१४ पडेगाव अंतर्गत आर्च आंगण गट नं.१०७ येथे विहीरीचे काम करणे. | १०.०० लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत गुलमोहर कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | १५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९१, जयभवानी नगर १३ वी स्कीम येथे काँक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन २०१७-१८ च्या दरसुचीनुसार र.रु.६९,०७,९०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील “नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग” या लेखाशिर्षकामधून रु.४६ लक्ष प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच “वॉर्ड अंतर्गत विकास कामे” या लेखाशिर्षका अंतर्गत रु.५६ लक्ष प्रस्तावित करण्यात आले आहे.

करीता, अंदाजपत्रक रु.६९,०७,९०५/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९१, जयभवानी नगर १३ वी स्कीम येथे “वॉर्ड अंतर्गत विकास कामे” या लेखाशिर्षकाअंतर्गत काँक्रीट रस्ता तयार करण्याच्या रु.६९,०७,९०५/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, (१) वॉर्ड क्र.१०८, सिल्कमिल्स कॉलनी अंतर्गत शाहशोक्ता कॉलनी मधील कब्रस्तान ते हारुण किराणा पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटींग करणे असे काम प्रस्तावित असून सहा कामाचे कार्यादेश मिळाले आहे. (२) हमालवाडा अंतर्गत शाहशोक्ता कॉलनी परिसरातील रस्त्यांचे काँक्रीटींग करणे. या कामाची दर निश्चीत झालेली आहे. परंतु सदरील दोन्ही ठिकाणी पाण्याची जलवाहिनी टाकायचे आहे. करीता, सदर वसाहतीतील लोकांची मागणी आहे की, जलवाहिनी टाकल्यानंतर काँक्रीटींगचे काम करावे.

करीता सदर प्रस्तावित कामाऐवजी (१) वॉर्ड क्र.१०८, सिल्कमिल्स कॉलनी येथे मोहम्मद रियाजोद्दीन यांच्या घरापासून ते मुसाभाई टेलर यांच्या घरापर्यंत काँक्रीटींग करणे, (२) वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत गुलशन कॉलनी येथील इम्तियाज कुरेशी यांच्या घरापासून ते हमिद खान यांच्या घरापर्यंत काँक्रीटींग करणे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मुल्ला सलिमा बेगम खाजोद्दीन **अनुमोदक:-**श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, (१) वॉर्ड क्र.१०८, सिल्कमिल्स कॉलनी येथे मोहम्मद रियाजोद्दीन यांच्या घरापासून ते मुसाभाई टेलर यांच्या घरापर्यंत काँक्रीटींग करणे तसेच (२) वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत गुलशन कॉलनी येथील इम्तियाज कुरेशी यांच्या घरापासून ते हमिद खान यांच्या घरापर्यंत काँक्रीटींग करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा, वॉर्ड क्र.०१, हर्सुल, वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसारवाडी, वॉर्ड क्र.१९, प्रगती कॉलनी हे वॉर्ड दलित वस्ती असलेले वॉर्ड असून सदर वॉर्डात ७०% पेक्षा जास्त दलित लोक राहतात. गेल्या २० वर्षापासून ही वस्ती विकास कामापासून वंचित आहे.

करीता, या भागाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शासनाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव मंजुर करून पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत किंमत |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा येथील श्री.संजय जाधव यांच्या घरापासून ते श्री.सांडू साळवे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद. | रु.३,३५,६६४.०० |
| २. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा येथील श्री.भिमराव जोंधळे यांच्या घरापासून ते श्री.रतन जाधव यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद. | रु.३,३५,९२०.०० |
| ३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा येथील श्री.राजेंद्र जाधव यांच्या घरापासून ते श्री.परवीन नरवडे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद. | रु.३,३५,९२०.०० |
| ४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा येथील समाज मंदिर पासून ते श्री.कमलाकर तुपे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद. | रु.३,३५,९२०.०० |
| ५. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा येथील मयंक प्रोव्हिजन पासून ते श्री.के.डी.पगारे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद. | रु.३,३५,८०४.०० |
| ६. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा येथील श्री.डांगे यांच्या घरापासून ते श्री.एस.डी.पगारे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,४८१.०० |
| ७. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा येथील श्री.अविनाश दाभाडे यांच्या घरा पासून ते श्री.अविनाश मगरे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,६६६.०० |
| ८. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा येथील श्री.दिवे यांच्या घरापासून ते जेतवन संस्कारपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,६६६.०० |
| ९. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.०१, हर्सुल येथील श्री.बशीर यांच्या घरापासून ते श्री.आबेदभाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,६६४.०० |
| १०. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.०१, हर्सुल येथील श्री.गुलाबभाई यांच्या घरापासून ते श्री.सय्यद गणी यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता | रु.३,३५,९२०.०० |

| | | |
|---|---|---|
| | तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | |
| ११. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.०१, हर्सुल येथील श्री.सय्यद रिजवान यांच्या घरापासून ते श्री.शाहेद भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,९२०.०० |
| १२. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.०१, हर्सुल येथील लोकसेवा दुध डेअरीपासून ते यासीन मस्जिद पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,७९१.०० |
| १३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.०१, हर्सुल येथील शाहेद किराणा पासून ते श्री.शफिक भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,७९१.०० |
| १४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.०१, हर्सुल येथील पटेल किराणा पासून ते श्री.जावेदभाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,७९८.०० |
| १५. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.०१, हर्सुल येथील श्री.शेख अलीम यांच्या घरापासून ते श्री.शेख फेरोज यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,७२४.०० |
| १६. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.०१, हर्सुल येथील श्री.सय्यद भाई यांच्या घरापासून ते श्री.सय्यद खलील यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,३७८.०० |
| १७. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसारवाडी येथील जिया मेडिकल पासून ते श्री.हाशिम पटेल यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,७२४.०० |
| १८. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसारवाडी येथील श्री.रफिकभाई यांच्या घरापासून ते फारुक किराणा पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,७२४.०० |
| १९. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसारवाडी येथील श्री.नजीर खान यांच्या घरापासून ते शफिक किराणा पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,८३३.०० |
| २०. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसारवाडी येथील श्री.शब्बीर खान यांच्या घरापासून ते श्री.सईद भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,८३३.०० |
| २१. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसारवाडी येथील श्री.जहीर भाई यांच्या घरापासून ते श्री.आरीफ पठाण यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,८३३.०० |
| २२. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसारवाडी येथील श्री.जकी पटेल यांच्या घरापासून ते श्री.रामदास जगताप यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,८३३.०० |
| २३. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसारवाडी | रु.३,३५,८३३.०० |

| | | |
|---|---|---|
| | येथील श्री.नामदेव भोसले यांच्या घरापासून ते श्री.कचरु बनकर यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | |
| २४. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४, आरतीनगर, मिसारवाडी येथील श्री.लताबाई सुकाशे यांच्या घरापासून ते श्री.इब्राहिम शाह यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,९३८.०० |
| २५. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१९, प्रगती कॉलनी येथील राजगृह इमारत ते श्री.अज्जु भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,९२०.०० |
| २६. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१९, प्रगती कॉलनी येथील श्री.ढाकरके यांच्या घरापासून ते प्रगती सनराईज शाळेपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,९२०.०० |
| २७. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१९, प्रगती कॉलनी येथील श्री.गवई यांच्या घरापासून ते श्री.निमाले यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,७९१.०० |
| २८. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१९, प्रगती कॉलनी येथील श्री.झियाउद्दीन यांच्या घरापासून ते श्री.निकाळजे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,७९१.०० |
| २९. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१९, प्रगती कॉलनी येथील श्री.आंभोरे यांच्या घरापासून ते श्री.सईद भाई यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,६६४.०० |
| ३०. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१९, प्रगती कॉलनी येथील श्री.बशारत खान यांच्या घरापासून ते बुऱ्हाणी नॅशनल हायस्कुल यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. ता.जि.औरंगाबाद | रु.३,३५,६६४.०० |

करीता,प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहिम अहेमद **अनुमोदक:-**श्रीमती शेख नरगीस सलिम

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५०, कोतवालपुरा, वॉर्ड क्र.०१, हर्सुल, वॉर्ड क्र.३४, आरतीनगर मिसारवाडी, वॉर्ड क्र.१९, प्रगती कॉलनी या वॉर्डात ७०% पेक्षा जास्त दलित वसाहती असल्याने या सर्व वॉर्डात प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.१ ते ३० तील विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करण्यासाठी शासनाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.अन्सारी अबरार अहेमद अकबर अहेमद हे सिल्लोड जि.औरंगाबाद येथील रहिवासी असून ते मनपा शाळा क्र.६४, नारपोली, भिवंडी, जि.ठाणे येथे सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे आई-वडील वृध्दावस्थेत व वयस्कर असून त्यांच्या देखभालीसाठी व त्यांची प्रकृती खराब असल्याने त्यांची काळजी घेणारे कोणीही नाही. त्यामुळे

श्री.अन्सारी अबरार अहेमद अकबर अहेमद यांची औरंगाबाद महानगरपालिका येथे सेवा वर्ग करून घेण्यास ना-हरकत प्रमाणपत्राची गरज आहे.

करीता, एकतर्फी आंतरजिल्हा बदली अंतर्गत श्री.अन्सारी अबरार अहेमद अकबर अहेमद यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पदस्थापना मिळणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

**अनुमोदक:-**श्रीमती तसनीम बेगम अब्दुल रऊफ, श्री.खान अय्युब म.हुसेन खान

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अन्सारी अबरार अहेमद अकबर अहेमद, सहाय्यक शिक्षक, मनपा शाळा क्र.६४, नारपोली, भिवंडी, जि.ठाणे यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गावठान मुकूंदवाडी (गाव) येथील अस्तित्वात असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याची दुरूस्ती करणे व इतर कामे करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविणे तसेच सदर कामासाठी तरतुद उपलब्ध असून या कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता झाली आहे. तसेच तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झालेली असून या कामासाठी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

**अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद, श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी,

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गावठान मुकूंदवाडी (गाव) येथील अस्तित्वात असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याची दुरूस्ती करणे व इतर कामे करण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध वार्डातील विकास कामे करणे अत्यंत गरजेचे असुन सदरील कामे आमदार श्री.संजय सिरसाट साहेब, यांनी सुचविलेली असुन त्या कामांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित र. |
|---|---|---|
| १. | शिवशंकर कॉलनी वॉर्ड क्र.७४ महुनगर येथे कर्मवीर शाळेपासुन ते श्री.निकाळजे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| २. | ईटखेडा वॉर्ड क्र.१०७ अंतर्गत सोनकांबळे यांच्या घरापासुन ते श्री.इंगळे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीककरण करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ३. | हमालवाडा रेल्वेस्टेशन वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत महुनगर येथे रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ४. | बन्सीलालनगर बनेवाडी वॉर्ड क्र.१०४ येथे श्री.पठारे यांच्या घरापासुन ते | रु.०५.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | श्री.इंगळे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | |
| ५. | राहुलनगर सादात नगर वॉर्ड क्र.१०५ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोरील परिसरात सुशोभिकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| ६. | कबीरनगर वॉर्ड क्र.१०२ छोटा मुरलीधरनगर अंतर्गत वाल्मीक मंदिरा समोरच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| ७. | शिवाजीनगर वॉर्ड क्र..११२ अंतर्गत ११ वी योजना मनपा आरोग्य केंद्रापासुन ते प्रियदर्शनी कॉलनी पर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ८. | एकनाथनगर वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत द्वारकापुरी येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.१०.०० लक्ष |
| ९. | रमानगर वॉर्ड क्र.७२ अंतर्गत स्मशानभुमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण व सुशोभिकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| १०. | सातारा गांव वॉर्ड क्र.११५ अंतर्गत शाक्यनगर येथे स्मशानभुमीची दुरुस्ती व सुशोभीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| ११. | पडेगांव वॉर्ड क्र.१४ अंतर्गत श्री.कांबळे यांच्या घरापासुन ते श्री.हिवराळे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| १२. | ज्योतीनगर वॉर्ड क्र.१०० अंतर्गत चौसर/येथे रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| १३. | वॉर्ड क्र.७५ बौध्दनगर उत्तमनगर अंतर्गत अजिक्य ज्वेलर्स पासुन ते नाल्यापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| | **एकुण** | **रु.१००.०० लक्ष** |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्रीमती लता मगन निकाळजे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध वार्डातील खालील विकास कामे करणेसाठी निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित र. |
|---|---|---|
| १. | शिवशंकर कॉलनी वॉर्ड क्र.७४ महुनगर येथे कर्मवीर शाळेपासुन ते श्री.निकाळजे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| २. | ईटखेडा वॉर्ड क्र.१०७ अंतर्गत सोनकांबळे यांच्या घरापासुन ते श्री.इंगळे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीककरण करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ३. | हमालवाडा रेल्वेस्टेशन वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत महुनगर येथे रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ४. | बन्सीलालनगर बनेवाडी वॉर्ड क्र.१०४ येथे श्री.पठारे यांच्या घरापासुन ते श्री.इंगळे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| ५. | राहुलनगर सादात नगर वॉर्ड क्र.१०५ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर | रु.०५.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | पुतळ्या समोरील परिसरात सुशोभिकरण करणे. | |
| ६. | कबीरनगर वॉर्ड क्र.१०२ छोटा मुरलीधरनगर अंतर्गत वाल्मीक मंदिरा समोरच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| ७. | शिवाजीनगर वॉर्ड क्र.११२ अंतर्गत ११ वी योजना मनपा आरोग्य केंद्रापासुन ते प्रियदर्शनी कॉलनी पर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१०.०० लक्ष |
| ८. | एकनाथनगर वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत द्वारकापुरी येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.१०.०० लक्ष |
| ९. | रमानगर वॉर्ड क्र.७२ अंतर्गत स्मशानभुमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण व सुशोभिकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| १०. | सातारा गांव वॉर्ड क्र.११५ अंतर्गत शाक्यनगर येथे स्मशानभुमीची दुरुस्ती व सुशोभीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| ११. | पडेगांव वॉर्ड क्र.१४ अंतर्गत श्री.कांबळे यांच्या घरापासुन ते श्री.हिवराळे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| १२. | ज्योतीनगर वॉर्ड क्र.१०० अंतर्गत चौसर/येथे रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०५.०० लक्ष |
| १३. | वॉर्ड क्र.७५ बौध्दनगर उत्तमनगर अंतर्गत अजिंक्य ज्वेलर्स पासुन ते नाल्यापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| | **एकुण** | **रु.१००.०० लक्ष** |

**<u>विषय क्रमांक ७९९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत असून या मध्ये राज्यातील २४ जिल्हयातील १० जिल्हा मुख्यालय, २८ गट व ३४ शहरामध्ये आयोगाच्या उर्वरीत कालावधीमध्ये सन २०१८-१९ व २०१९-२०२० या दोन वर्षाच्या कालावधीत केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यात येणार आहे. यामध्ये औरंगाबाद जिल्हयाचा सुध्दा समावेश करण्यात आला आहे. सदर योजना हि अल्पसंख्यांक समाजाच्या हिताच्या दृष्टीने महत्वाची योजना असून, या कार्यक्रमांअंतर्गत केंद्र शासनाकडून अल्प संख्यांक समाजाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश समाजातील अल्पसंख्यांक वर्गाला सुविधा उपलब्ध करुन देणे असून त्यांच्या उध्दारा संबधीत प्रस्ताव या योजनेतून अपेक्षित आहेत. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध वार्ड कार्यालयाकडून प्राप्त खालील नमूद कामे या योजने अंतर्गत प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.१०३ वेदांतनगर येथे रेखांनातील खुल्या जागेत रिक्रीयशन हॉल बांधणे. | ४,०७,६४,२६२/- |
| ०२ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत सहारा कॉलनी येथील जब्बार किराणा जवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९८,०७०/- |
| ०३ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत एकतानगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची कामे करणे. | २४,९७,२४०/- |

| | | |
|---|---|---|
| ०४ | वॉर्ड क्र. १०७ विटखेडा अंतर्गत हमीदीया गार्डन येथे शेख नईम यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९४,९८०/- |
| ०५ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत एकतानगर येथे श्री.भोळे यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९७,३७०/- |
| ०६ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत प्रतिज्ञानगर रस्त्याचे कॉक्रीटींग करणे | २४,९८,३७५/- |
| ०७ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत एकता नगर येथे श्री.ताहेर खान यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९७,७१०/- |
| ०८ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत एकतानगर येथे श्री.बिलावर यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९९,११०/- |
| ०९ | वॉर्ड क्र.३५ अजीज कॉलनी नारेगाव येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे | ४९,९९,४६१/- |
| १० | वॉर्ड क्र.३५ अजीत कॉलनी नारेगाव विविध सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | ४९,७१,४११/- |
| ११ | वॉर्ड क्र.६३ चिश्तीया कॉलनी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१०/- |
| १२ | वॉर्ड क्र.६३ चिश्तीया कॉलनी येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,९७,९९९/- |
| १३ | वॉर्ड क्र.३३ मिसारवाडी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१६/- |
| १४ | वॉर्ड क्र.३३ मिसारवाडी दारुल विखर मस्जीद येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,४५,४०६/- |
| १५ | वॉर्ड क्र.३४ कादरीया कॉलनी मिसारवाडी येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,४५,४०६/- |
| १६ | वॉर्ड क्र.३४ कादरीया कॉलनी मिसारवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे | २४,७३,०१७/- |
| १७ | वॉर्ड क्र.३७ हिना नगर चौधरी कॉलनी चिकलठाणा येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१२/- |
| १८ | वॉर्ड क्र. ३७ हिना नगर चौधरी कॉलनी चिकलठाणा येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,९९,५००/- |
| १९ | वॉर्ड क्र.१३ शाक्य नगर,शिवनिर्मल कॉलनी जवळ पेठेनगर भावसिंगपुरा येथे कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,९९,५००/- |
| २० | वॉर्ड क्र.१३ शाक्य नगर, शिवनिर्मल कॉलनी जवळ पेठेनगर भावसिंगपुरा येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१०/- |
| | **एकुण** | **९,२९,७१,५५६/-** |

वरील नमूद कामांचे प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे, त्यांचे मंजुरी नंतर कामाची निविदा काढणे व आवश्यक वाटल्यास योग्य ते अनुषंगीक बदल करणे इत्यादी अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्री.गोकुलसिंग संपतसिंग मलके, श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम शेख,
**अनुमोदक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी, श्रीमती संगिता सुभाष वाघुले, श्रीमती वैशाली कारभारी जाधव, श्रीमती आशा विजय निकाळजे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमांअंतर्गत केंद्र शासनाकडून अल्पसंख्यांक समाजाच्या हिताच्या दृष्टिने विविध विकास कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध वार्डांमध्ये सदरील योजने अंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी नमूद कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे, त्यांचे मंजुरी नंतर कामाची निविदा काढणे व आवश्यक वाटल्यास योग्य ते अनुषंगीक बदल करणे इत्यादी अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | कामाचे नाव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.१०३ वेदांतनगर येथे रेखांकनातील खुल्या जागेत रिक्रीयेशन हॉल बांधणे. | ४,०७,६४,२६२/- |
| ०२ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत सहारा कॉलनी येथील जब्बार किराणा जवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९८,०७०/- |
| ०३ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत एकता नगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची कामे करणे. | २४,९७,२४०/- |
| ०४ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत हमीदीया गार्डन येथे शेख नईम यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९४,९८०/- |
| ०५ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत एकतानगर येथे श्री.भोळे यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९७,३७०/- |
| ०६ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत प्रतिज्ञानगर रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९८,३७५/- |
| ०७ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत एकतानगर येथे श्री.ताहेर खान यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९७,७१०/- |
| ०८ | वॉर्ड क्र.१०७ विटखेडा अंतर्गत एकतानगर येथे श्री.बिलावर यांच्या घराजवळील रस्त्याचे कॉक्रीटींग करणे. | २४,९९,११०/- |
| ०९ | वॉर्ड क्र.३५ अजीज कॉलनी नारेगाव येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे | ४९,९९,४६१/- |
| १० | वॉर्ड क्र.३५ अजीज कॉलनी नारेगाव येथे विविध सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | ४९,७१,४११/- |
| ११ | वॉर्ड क्र.६३ चिश्तीया कॉलनी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१०/- |
| १२ | वॉर्ड क्र.६३ चिश्तीया कॉलनी येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,९७,९९९/- |
| १३ | वॉर्ड क्र.३३ मिसारवाडी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१६/- |
| १४ | वॉर्ड क्र.३३ मिसारवाडी येथील दारुल विखर मस्जीद येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,४५,४०६/- |
| १५ | वॉर्ड क्र.३४ कादरीया कॉलनी मिसारवाडी येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,४५,४०६/- |
| १६ | वॉर्ड क्र.३४ कादरीया कॉलनी मिसारवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१७/- |
| १७ | वॉर्ड क्र. ३७ हिनानगर चौधरी कॉलनी चिकलठाणा येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१२/- |
| १८ | वॉर्ड क्र.३७ हिनानगर चौधरी कॉलनी चिकलठाणा येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,९९,५००/- |

| | | |
|---|---|---|
| १९ | वॉर्ड क्र.१३ शाक्य नगर, शिवनिर्मल कॉलनी जवळ पेठेनगर भावसिंगपुरा येथे कॉक्रीट रस्ते तयार करणे. | २४,९९,५००/- |
| २० | वॉर्ड क्र.१३ शाक्य नगर, शिवनिर्मल कॉलनी जवळ पेठेनगर भावसिंगपुरा येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | २४,७३,०१०/- |
| | **एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रुपये** | **९,२९,७१,५५६/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.११ मधील रहिवासीयांच्या सुविधेसाठी महानगरपालिका अर्थसंकल्प २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्रंमाक व अ.क | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| जीबीआर-झोन-०४ पान क्र.४३ अ.क्र.३४ | वार्ड क्र.११ हर्षनगर भागात कॉंक्रेटिंग करणे. आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष. | वार्ड क्र.११ अंतर्गत व्हि.आय.पी रोडवर विद्युत पोलसह पथदिवे लावणे, केबल टाकणे व पोल शिफ्टींग करणे या कामासाठी सदर रु.२५ लक्षची आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. |

**सुचक:-**श्री.खान अय्युब म.हुसेन खान **अनुमोदक:-**श्री.अब्दुल म.नाविद अब्दुल रशीद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.११ मधील रहिवासीयांच्या सुविधेसाठी महानगरपालिका अर्थसंकल्प २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| पान क्रंमाक व अ.क | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| जीबीआर-झोन-०४ पान क्र.४३ अ.क्र.३४ | वार्ड क्र.११ हर्षनगर भागात कॉंक्रेटिंग करणे. आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष. | वार्ड क्र.११ अंतर्गत व्हि.आय.पी रोडवर विद्युत पोलसह पथदिवे लावणे, केबल टाकणे व पोल शिफ्टींग करणे या कामासाठी सदर रु.२५ लक्षची आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करुन प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात जीबीआर झोन क्रमांक ०८ पान क्र ८५ वरील अनुक्रमांक ३१ वर प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत शिवनगर पिठाची गिरणी ते केशवनगरी रस्त्याचे उद्यान पर्यंत कॉंक्रीटीकरण करणे रक्कम | १.प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत मेडीकल हौसीग सोसायटी येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे रक्कम रुपये १५.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | रुपये १५.०० लक्ष | |
| ०२ | सन २०१८-२०१९ च्या अर्थ संकल्पात विकास योजने अंतर्गत भूखंड संरक्षण जीबीआर झोन क्रमांक ०८ पान क्र ८८ वरील अनुक्रमांक १२ वर प्रभाग क्रमांक ११० अंतर्गत पृथ्वीराजनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष | प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत पृथ्वीराजनगर मधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष |
| ०३ | सन २०१८-२०१९ च्या अर्थ संकल्पात जीबीआर झोन क्रमांक ०८ पान क्र ८७ वरील अनुक्रमांक १० वर प्रभाग क्रमांक ११० अंतर्गत विविध ठीकाणी थ्री सेट फोर सेट लावणे रक्कम रुपये ५०.०० लक्ष | ०१. प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे रक्कम रुपये ४०.०० लक्ष<br>०२. मयुरबन कॉलनी अंतर्गत राजनगर मधील रस्त्याचे कॉक्रीटी करण करणे १०.०० लक्ष |
| ०४ | सन २०१८-२०१९ च्या अर्थ संकल्पात झोन क्रमांक ०८ अंतर्गत स्पिल ओव्हर कामाची यादी पान क्रमांक २६७ अनुक्रमाक २८ मयुरबन कॉलनी अंतर्गत विविध विकास कामे करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष | प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत पृथ्वीराजनगर मधील उर्वरीत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे व मयुरबन कॉलनी अंतर्गत विविध ठीकाणी रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात जीबीआर झोन क्रमांक ०८ पान क्र ८५ वरील अनुक्रमांक ३१ वर प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत शिवनगर पिठाची गिरणी ते केशवनगरी रस्त्याचे उद्यान पर्यंत कॉँक्रीटीकरण करणे रक्कम रुपये १५.०० लक्ष | १. प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत मेडीकल हौसीग सोसायटी येथील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे रक्कम रुपये १५.०० लक्ष |
| ०२ | सन २०१८-२०१९ च्या अर्थ संकल्पात विकास योजने अंतर्गत भूखंड संरक्षण जीबीआर झोन क्रमांक ०८ पान क्र ८८ वरील अनुक्रमांक १२ वर प्रभाग क्रमांक ११० अंतर्गत पृथ्वीराजनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष | प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत पृथ्वीराजनगर मधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ०३ | सन २०१८-२०१९ च्या अर्थ संकल्पात जीबीआर झोन क्रमांक ०८ पान क्र ८७ वरील अनुक्रमांक १० वर प्रभाग क्रमांक ११० अंतर्गत विविध ठीकाणी थ्री सेट फोर सेट लावणे रक्कम रुपये ५०.०० लक्ष | ०१. प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे रक्कम रुपये ४०.०० लक्ष ०२. मयुरबन कॉलनी अंतर्गत राजनगर मधील रस्त्याचे कॉक्रीटी करण करणे १०.०० लक्ष |
| ०४ | सन २०१८-२०१९ च्या अर्थ संकल्पात झोन क्रमांक ०८ अंतर्गत स्पिल ओव्हर कामाची यादी पान क्रमांक २६७ अनुक्रमाक २८ मयुरबन कॉलनी अंतर्गत विविध विकास कामे करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष | प्रभाग क्रमांक ११० मयुरबन कॉलनी अंतर्गत पृथ्वीराजनगर मधील उर्वरीत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे व मयुरबन कॉलनी अंतर्गत विविध ठीकाणी रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे रक्कम रुपये २५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै.व्यंकटराव देशपांडे, मा.उच्च न्यायालय, मुंबई चे मुख्य न्यायमुर्ती पदी कार्यरत असतांना त्यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद स्थापन करण्यासाठी प्रयत्न केल्यामुळे औरंगाबाद शहरात खंडपीठ अस्तित्वात आले. त्यामुळे आपल्या मराठवाड्यातील ८ जिल्हे खान्देश मधील ३ व पश्चिम महाराष्ट्रातील १ जिल्हा औरंगाबाद खंडपीठास जोडल्या गेले. औरंगाबाद खंडपीठ स्थापन झाल्यामुळे सर्व सामान्य जनतेस न्याय मागणे सोपे झाले. औरंगाबाद खंडपीठ स्थापनेसाठी कै.व्यंकटराव देशपांडे यांचा सहभाग व प्रयत्नांची पराकाष्ठा असल्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ श्री.अतुल कराड अध्यक्ष, वकील महासंघ औरंगाबाद यांनीही वारंवार मागणी केल्यानुसार खंडपीठाच्या पुर्वेस लागून असणाऱ्या कामगार चौकापर्यंतच्या उत्तर-दक्षिण रस्त्यास “कै.व्यंकटराव देशपांडे, माजी मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय मुंबई मार्ग” असे नाव देण्यात यावे.

करीता. प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती माधुरी मिलींद देशमुख

**अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे, श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मा.उच्च न्यायालय खंडपीठाच्या पुर्वेस लागून असणाऱ्या कामगार चौकापर्यंतच्या उत्तर-दक्षिण रस्त्यास “कै.व्यंकटराव देशपांडे, माजी मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय मुंबई मार्ग” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.राजू शिंदे :यापूर्वी सन-२०१४ पासून आजपर्यत दिलेल्या चौकशीचे आदेश त्या सर्व प्रकरणाची चौकशीचा अहवाल मागवावा.

मा.महापौर :आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबर सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद